# संवाद

अन्नपूर्णा परिवाराचे त्रैमासिक

ऑगस्ट २०२१













# अनुक्रमणिका


* संपादकीय — *सुरेश धोपेश्वरकर*
* बँक खाजगीकरणाचे आत्मघातकी पाऊल — *देविदास तुळजापूरकर*
* फलज्योतिष शास्त्र का नाही? — *डॉ. नरेंद्र दाभोलकर*
* २५ वा तास — *सीमा घंगाळे*
* भारतीय संविधानाचे तत्वज्ञान — *डॉ. प्रवीण घोडेस्वार*
* समानता, समता बंधूभावाचे स्वप्न कधी पूर्ण होईल? — *साहेबराव ठाणगे*
* स्वातंत्र्य का? कायदेशीर आणीबाणी? — *सुबोध मोरे*
* कविता
* ऑनलाइन शिक्षण पद्धती
* कोरोना काळातील अडचणी
* ऑनलाईन शिक्षण-अडथळ्याची शर्यत — *वृषाली मगदूम*
* वर्कर्स फ्रॉम होम, युनाईट! यू हॅव नथिंग टु लूज बट युवर 'एलिनेशन'!! — *जयदेव डोळे*
* अन्नपूर्णा वार्तापत्र — *अंजली पाटील*



**संपादकीय मंडळ**

- **डॉ. मेधा पुरव-सामंत**
- **कॉ. सुरेश धोपेश्वरकर**
- **वृषाली मगदूम**
- **अंजली पाटील**
- **बाळासाहेब पिसाळ**

**पत्ता :** अन्नपूर्णा परिवार, सेक्टर १९ ई प्लॉट नं १८, कोपरी गाव, वाशी, नवी मुंबई.

**फोन :** ०२२-२७८४५६१७


**संपादकीय**

# स्वतंत्र भारताचा ७५ वा स्वातंत्र्यदिन

स्वतंत्र भारताला येत्या १५ ऑगस्ट रोजी ७४ वर्षे पूर्ण होत आहेत. ७५ वा स्वातंत्र्य दिना निमित्त अन्नपूर्णा परिवाराच्या सर्व सभासदांना हार्दिक शुभेच्छा.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र भारताने 'नियतीशी करार' केला आह अशा अत्यंत मार्मिक शब्दात स्वतंत्र भारताचा तिरंगा लाल किल्यावरून फडकवताना पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय जनतेस नवराष्ट्र उभारण्याचे आवाहन केले होते.

आपल्या विविध धर्माच्या, जातीच्या, भाषेच्या, संस्कृतीच्या, लोकाना या खंडप्राय देशांत एकत्र ठेवण्याचे अत्यंत अवघड काम आपण यशस्वी केले आहे. १३५ कोटी लोकसंख्येचा हा देश आहे.

देश आज अन्नधान्य निर्मितीमध्ये स्वयंपूर्ण झाला आहे. अंतराळात आपल्या देशाने प्रवेश केला आहे. राष्ट्रीय अर्थव्यवस्था आणि त्यासाठी विविध राष्ट्रीय संस्था याचे जाळे उभारण्यात आपण यशस्वी झालो आहोत.

परंतु राष्ट्रीय विकासाची फळें सर्वदूर पसरले शेवटच्या माणसापर्यंत पोहचविण्यात अजून आपणास संपूर्ण यश आलेले नाही. अजूनही कष्टकरी जनतेचा मोठा विभाग हा विकासापासून वंचित राहिला आहे.

कोरोना कालखंडात जनतेच्यासाठी असलेल्या आरोग्य व्यवस्थेचा अपुरेपणा उघडकीस आला आहे. प्राथमिक आरोग्य केन्द्रापासून सुपर स्पेशालीटी हॉस्पीटल यांची कमतरता - अपुरेपणा, जाणवत आहे.

सर्वसामान्य कष्टकरी/श्रमिक माणसास विकासाचा केंद्र बिंदू करण्याऐवजी समाजातील श्रीमंत माणसाला सुविधा सवलती देण्याचे राज्यकर्त्या वर्गाचे धोरण आहे.

आर्थिक विकास साधत असताना पर्यावरणाशी संतुलन राखून विकास करण्याचा प्रश्‍न फार तीव्रपणे सध्या पुढे

आला आहे. वरचेवर येणारे पूर, मुसळधार पाऊस, जंगलाना लागणारे वणवे हे चुकीच्या आर्थिक धोरणाची फळे आहेत. यामध्ये ताबडतोब सुधारणा झाली पाहिजे. स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी, हे माणसाचे मूलभूत अधिकार आहेत. त्यांना बाधा येईल अशा पद्धतीनें जास्त नफ्याच्या लालचीनें उद्योगपतींना झुकते माप देणारा, त्याचे काळेधंदे वाढविणारा विकासाचा मार्ग बदला यासाठी जन जागृती आणि जनआंदोलनाची अत्यंत गरज आहे. ही धोरणे आपण बदलू शकतो या आत्मविश्वासाने भारताचा ७५ वा स्वातंत्र्य दिन साजरा करू या.

कोरोना काळात आरोग्य व्यवस्थेप्रमाणेच शिक्षण व्यवस्थेतील गोंधळ, विषमता, विविध प्रश्न अत्यंत तीव्रपणे समोर आले आहेत. या विषयावर मुलांची मनोगते आणि प्रश्नाचे स्वरूप आणि संभाव्य सोडवणूक यासंबंधी वृषाली मगदूम यांचा लेख छापला आहे. विद्यार्थी-पालक-शिक्षक-शाळा कॉलेज यांचे व्यवस्थापन आणि शासन यांच्यामध्ये सातत्याने संवाद साधून शैक्षणिक धोरणाची आंखणी आणि अमंलबजाणी झाली पाहिजे. सामाजिक समतेचे, स्त्री, पुरष समानतेचे, पर्यावरणाच्या संवर्धनाची आर्थिक विषमता नष्ट करण्याची, सर्व माणसांवर आणि प्राणीमात्रावर प्रेम करावयास शिकविणारी, विज्ञाननिष्ट मन तयार करणारी शिक्षण पद्धती अत्यंत आवश्यक आहे. शासनाची आणि राज्यकर्त्यांची पाऊले जर यापासुन लांब जात असतील तर ती रोखली पाहिजेत.

सध्या दिल्लीतील केन्द्र सरकारची अनेक धोरणात्मक पाऊले स्वातंत्र्यानंतर जी संस्थात्मक रचना उभारण्यात आली त्याची तोडमोड करण्याच्या दिशेने पडत आहेत. संविधान आणि सार्वजनिक उद्योगधंदे - व्यवसाय ही ह्या हत्याची प्रमुख लक्ष्ये करण्यात आली आहेत.

संविधानाच्या माध्यमातून लोकशाही सुदृढ होते, सर्व सामान्य जनतेस विकासाच्या दिशे संबंधी, धोरणासंबंधी, राज्य कारभारासंबंधी जबाबदेही कारभार शासनास करावा लागतो. कायद्या समोर सर्व समान धर्मजाती निरपेक्ष समाज उभारला जात आहे किंवा नाही या संबंधी जनतेस जबाब द्यावा लागतो म्हणून संविधानास छुपा विरोध करणारा अजेंडा राज्यकर्त्यांतर्फे राबविण्यात येत आहे.

देशांतील सार्वजनिक उद्योग धनदांडग्या उद्योगपतीच्या अनिर्बंध विकासास चाप लावतात. त्याच्या मक्तेदाऱ्या निर्माण होण्यापासुन म्हणजेच त्याच्या भरमसाठ नफेखोरीस वेसण घालतात. म्हणून सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण करण्याचे धोरण राबविले जात आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकाचे खाजगीकरण देशाच्या आर्थिक विकासास मारक कसे आहे. हे सांगणारा देविदास तुळजापूरकर यांचा लेख छापला आहे.

१९ जुलै १९६९ रोजी १४ प्रमुख बँकाचे राष्ट्रीयकरण झाले म्हणून आपल्या अन्नपूर्णा संस्थेला बँकाकडून कर्ज मिळाले. त्यामुळे आपण आपल्या सभासदांना कर्ज वाटप करू शकतो.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकाचे खाजगीकरण झाल्यास गोरगरीबांना आणि त्याच्या अन्नपूर्णा सारख्या संस्थांना बँकांची कर्जे मिळण्यात अडचणी येतील. म्हणून सार्वजनिक बँकाच्या रक्षणासाठी बँक कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या लढ्यात आपण सहभागी झाले पाहिजे.

संविधानाचे रक्षण - सार्वजनिक उद्योग व्यवसायाचे रक्षण आणि आपल्या वैयक्तिक आणि कौटुंबिक विकासाचे प्रश्न एकमेकांवर अवलंबून आहेत. त्याचा सुटा सुटा विचार न करतां एकत्रित विचार करावयास शिकणे म्हणजे भारताचा ७५ वा स्वातंत्र्यदिन अर्थपूर्ण रितीने साजरा करणे होय. भारतीय स्वातंत्र्य आणि सर्व सामान्य कष्टकऱ्याचा विकास यांची सांगड घातल्यानेच भारतीय स्वातंत्र्य मजबूत होईल, असे अन्नपूर्णा परिवाराचे स्पष्ट मत आहे.

या अंकात संविधान आणि त्याला अनुसरून संबंधित विषयासंबंधी डॉ. प्रविण घोडेस्वार, घगाळे मॅडम, ठाणगे आणि सुबोध मोरे यांचे लेख आम्ही छापले आहेत. 'घरून काम' या विषयावर जयदेव डोळे याचा लेख छापला आहे.

संविधानाने वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अंधश्रद्धा या विरुद्ध सतत शिकवण दिली आहे. म्हणून शहिद डॉ. नरेन्द्र दाभोळकर यांचा फलज्योतिष शास्त्र का नाही हा विशेष लेख छापला आहे. वाचा, विचार करा, अंधश्रद्धाचे समाजाच्या मानगुटीवर सवार झालेले भूत उतरविण्याच्या कामात कर्ज घेऊन कुटुंबाचा विकास करीत कर्जाची परत फेड करताना वस्तीपातळीवर सक्रीय सहभागी व्हा असे नम्र आवाहन आहे.

अन्नपूर्णा परिवाराचे वार्तापत्र हे नेहमीचे सदर अंजली पाटील यांनी अत्यंत मार्मिक शब्दात सादर केले आहे.

संवादाच्या अंकावर वस्तीपातळीवर आणि आमच्याशी संवाद करा.

❖❖❖

# बँक खाजगीकरणाचे आत्मघातकी पाऊल

■ देविदास तुळजापूरकर

जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली लाहोर येथे १९२९ मध्ये पार पडलेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात पूर्ण स्वराज्याची घोषणा करण्यात आली होती व त्याच वेळी स्वातंत्र्योत्तर भारताचे आर्थिक धोरण काय असेल या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली होती. त्यात स्वातंत्र्यानंतर देशातील विमा तसेच बँकिंग उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्यात येईल असे नमूद करण्यात आले होते. १९५० मध्ये पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या स्वरूपात नियोजनबद्ध विकासाचा मार्ग भारताने स्वीकारला. १९५१ मध्ये पहिला ऑल इंडिया रुरल कर्जाचा सर्वे घेण्यात आला. या सर्वेक्षणाच्या पार्श्वभूमीवर १९५५ मध्ये स्टेट बँकेचे तर १९५९ मध्ये सहयोगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. पहिल्या तीन पंचवार्षिक योजनेत संरचना उद्योग तसेच पायाभूत उद्योगाच्या उभारणीत मोठी गुंतवणूक करण्यात आली. त्यातूनच सिमेंट, पोलाद, खते, बी-बियाणे, औषधांचे कारखाने उभारले गेले तसेच भाकरा नांनगल सारखी मोठी धरणे उभारली गेली पण सामान्य जनांच्या हातात खेळता पैसा नव्हता. त्यामुळे बाजारात यापैकी कुठल्याच उत्पादनाला मागणी नव्हती. अर्थव्यवस्था अवरुद्धतेतून वाटचाल करत होती. याच काळात भारतावर दोन युद्धे लादली गेली होती. एक पाकिस्तानने, तर दुसरे चीनने लादले होते. पाकिस्तान विरुद्धचे युद्ध आपण जिंकले होते, पण चीन बरोबरच्या युद्धात आपला पराभव झाला होता. युद्धावर झालेल्या खर्चामुळे अर्थव्यवस्था खिळखिळी झाली होती. याच काळात देशाला दोन मोठ्या दुष्काळांना सामोरे जावे लागले होते, ज्यात लाखो लोकांना आपले प्राण गमवावे लागले होते. देशाला भूक, गरिबी, दारिद्र्य यांनी वेढले होते. १४ ऑगस्टच्या रात्री देशाला उद्देशून केलेल्या आपल्या भाषणात (नियतीशी करार) पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय जनतेला जे स्वप्न दाखवले होते. ते भंगले होते. बंगालमध्ये एकीकडे नक्षलवादाचा तर दुसरीकडे आनंदमार्गीयांचा उगम झाला होता. दर दिवशी आर्थिक पेचप्रसंग अधिकाधिक गहिरा होत होता.

या पार्श्वभूमीवर तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी १४ मोठ्या खाजगी बँकाचे राष्ट्रीयीकरण केले. १९८० साली आणखी सहा खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. तरीदेखील ग्रामीण भागातील कर्जाच्या मागणी आणि पुरवठा यात असलेली तफावत भरून काढण्यासाठी १९७५ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातून प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना केली गेली. १९६४ मध्ये औद्योगिक विकासाला चालना मिळावी म्हणून आयडीबीआय स्थापना केली गेली, तर १९८१ मध्ये शेतीसाठी कर्ज तसेच ग्रामीण विकासाला मध्यवर्ती ठेवून नाबार्डची स्थापना केली गेली. यामुळे हरितक्रांती, धवलक्रांती शक्य झाली. देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनला. रोजगारनिर्मिती झाली. छोट्या उद्योगाला चालना मिळाली. सामान्य माणूस बँकिंगच्या म्हणजेच पर्यायाने विकासाच्या वर्तुळात ओढला गेला. शेती, पूरक उद्योगाला चालना मिळाली. पायाभूत उद्योगांची उभारणी खाजगी क्षेत्रात शक्य झाली. सामान्य माणसाची बचत औपचारिक बँकिंग व्यवस्थेत आली, जिचा वापर देशाच्या आर्थिक विकासासाठी हाती घेण्यात आलेल्या प्रकल्पात शक्य झाला. १९८० साली रिझर्व बँकेचे तत्कालीन गव्हर्नर आर. एन. मल्होत्रा यांनी बँकिंग उद्योगाबाबत संख्यात्मक विस्ताराकडून गुणात्मक सुधारणांकतडे वाटचाल ही भूमिका घेत हळूहळू बँकिंग विषयक धोरणांची दिशा बदलायला सुरूवात केली. अर्थातच यामागे आंतरराष्ट्रीय सावकार, जागितक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांचा दबाव होताच.

### नवीन बँकिंगविषयक धोरण

१९९१ साली विदेशी विनियमातील पेचप्रसंगावर मात करण्यासाठी सरकारने रचनात्मक दुरुस्तीचा कार्यक्रम (स्ट्रक्चरल ॲडस्टमेंट प्रोग्रॅम) स्वीकारला, याचाच एक भाग म्हणून आर्थिक धोरणात खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचा स्वीकार केला गेला. यानंतर त्याला पूरक असे बँकिंगविषयक धोरण असावे म्हणून तत्कालीन अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी आपल्या पहिल्या अर्थसंकल्पात नरसिंहम समितीच्या स्थापनेची घोषणा केली. या समितीने अवघ्या नव्वद दिवसात आपला अहवाल सादर केला, जो आंतरराष्ट्रीय सावकारांच्या आज्ञेबरहुकूम यांच्या शिफारशींची री ओढणारा होता. यानंतर नरसिंहम् समिती शिफारस दोनची आणि रिझर्व बँक, नियोजन आयोग म्हणजे नीती आयोग, भारत सरकार यांनी बँकिंगविषयक अनेक प्रश्नावर समितीचे गठन केले, त्यांच्या शिफारशी आल्या एकेक करत त्यांची अंमलबजावणी टप्प्या टप्प्यात केली गेली. यात नवीन अंकेक्षण पद्धती, दिशा निर्देशित गुंतवणूक (डायरेक्टेड इनव्हेस्टमेंट), दिशा निर्देशित कर्ज (डायरेक्टेड क्रेडिट) तसेच बँक खाजगीकरण या शिफारसींचा समावेश होता. तसेच ठेवी आणि कर्ज यावरील व्याजदरात स्वायत्तता आणि उदारीकरण, नवीन खाजगी बँकांना परवाने, विकासक बँकांचे व्यापारी बँकात रुपांतरण, सार्वजनिक क्षेत्रातील बँकातून एकत्रीकरण धोरण राबवून मोठ्या बँकांची निर्मिती इत्यादीचा समावेश देखील होता. एक-एक करत भारत सरकारने तज्ज्ञ समिती नेमून त्यांच्या शिफारशींच्या अंमलबजावणीचा आधार घेत हे बदल भारतीय बँकिंगमध्ये घडवून आणले आहेत.

### बहुमताचा अतिरेक

बँकांच्या मालकीहक्काशी संबंधित शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी कायद्यात दुरुस्ती आवश्यक आहे. आणि त्यासाठी लोकसभेत आवश्यक बहुमत १९९१ पासून कुठल्याच सरकार जवळ नव्हते, जे २०१४ मध्ये तसेच २०१९ मध्ये विद्यमान सरकारला उपलब्ध झाले आहे. हे लक्षात घेता या सरकारने आपल्या दुसऱ्या पाच वर्षाच्या मुदतीच्या दुसऱ्या वर्षातील अर्थसंकल्पात कोरोना महामारीच्या आपत्तीचे संधीत रुपांतर करत आत्मनिर्भरतेच्या घोषणेचा एक भाग म्हणून सार्वजनिक क्षेत्रातील बँकांपैकी आयडीबीआय आणि इतर दोन बँकांचे खाजगीकरण करण्यात येईल अशी घोषणा केली. याबरोबरच त्यांनी हेदेखील स्पष्ट केले की, हा पहिला टप्पा असेल आणि ही प्रकिया अशीच पुढे चालू ठेवत तीन ते चार बँका सार्वजनिक क्षेत्रात ठेवून इतर सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे खाजगीकरण करण्यात येईल.

### बँकांचा तोटा - जबाबदार थकीत कर्जे

हे करत असताना सरकारचा युक्तिवाद आहे की, सार्वजनिक क्षेत्रातील बँका सतत तोट्यात जात आहेत. ज्यामुळे वारंवार अर्थसंकल्पात तरतूद करून या बँकांना भांडवल उपलब्ध करून द्यावे लागत आहे ते रिझर्व बँकेच्या भांडवल पर्याप्ततेच्या निकषांची पूर्तता करण्यासाठ. रिझर्व बँकेचे तत्कालीन गव्हर्नर रघुराम राजन यांनी सार्वजनिक क्षेत्रातील बँकातून पाच कोटी रुपयांवरील कर्जाच्या गुणवत्तेची तपासणी केली आणि त्या प्रक्रियेत २०१५ साली जी थकीत कर्जे २.७८ लाख कोटी रुपयांची होती ती २०१६ साली ५.४० लाख कोटी, २०१७ साली ७.५० लाख कोटी, २०१८ साली ८.९५ लाख कोटी, २०१९ मध्ये ७.९० लाख कोटी रुपये तर २०२० मध्ये ७.२५ लाख कोटी रुपये एवढी झाली आहेत. या काळात बँकांनी ६.१० लाख कोटी रुपये राईट ऑफ केली आहेत म्हणजे या थकित कर्जातून ती वजा केली आहेत, या बँकेच्या ताळेबंदातून ती बाजूला सारण्यात आलेली आहेत. रिझर्व बँकेच्या फायनान्शिअल स्टॅबिलिटी रिपोर्टनुसार एकूण कर्ज रकमेत मोठ्या उद्योगांचा वाटा आहे ५५ टक्के. त्यातील ८० टक्के कर्जे थकीत आहेत. बँकांनी राईट ऑफ केलेल्या ६.६० लाख कोटी कर्जात सरासरी वसुली फक्त १० टक्के झाली आहे, असे माहितीच्या अधिकारात आता पृष्ठाभागावर आले आहे. यावर नामी उपाय योजना म्हणून ज्या दिवाळखोरी कायद्याकडे बघितले जात होते. त्या अंतर्गत रिझर्व बँकेने संदर्भित केलेल्या १२ खात्यात या बड्या उद्योगांकडून येणे रक्कम होती ४.४३ लाख कोटी रुपये. ज्यात वसुली होत आहे ती १.६३ लाख कोटी रुपये ज्यासाठी बँकांना २.८० लाख कोटी रुपये म्हणजे ६३ टक्के रकमेवर पाणी सोडावे लागत आहे.

याचाच अर्थ बँक खाजगीकरणाला जबाबदार बँकांच्या सततचा तोटा, याला कारणीभूत आहेत ती बड्या उद्योगाची बडी थकीत कर्जे! हे लक्षात घेता सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या खाजगीकरणाच्या प्रक्रियेत या बड्या उद्योगाच्या हाती का आपण या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडे असलेल्या ११२.६० लाख कोटी रुपये ठेवी सुपूर्द करणार आहोत? घाम गाळून जमा केलेल्या या बचत ठेवींच्या संरक्षणाची हमी ती कोण घेणार?

### खाजगी बँकांना वाचवले ते सार्वजनिक क्षेत्राने

तथाकथित सुधार कार्यक्रम राबविले गेले या नंतरच्या काळात केतन पारेख घोटाळ्यात अडकलेल्या नव्या जमान्यातील खाजगी बँकेला 'ग्लोबल ट्रस्ट बँके'ला सरकारने वाचवले ते सार्वजनिक क्षेत्रातील 'ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स'च्या मदतीने. अगदी नजीकच्या काळात बुडू पाहणाऱ्या येस बँकेला वाचवले ते सार्वजनिक क्षेत्रातील स्टेट बँकेने. बिगर बँकिंग वित्तीय संस्थेतील सगळ्यात मोठी आय. एल. अँड एफ. एल. एस. ला वाचवले ते सार्वजनिक क्षेत्रातील स्टेट बँक आणि एलआयसीने.

### बँक खाजगीकरण - राज्यघटनेशी छेडछाड

या संपूर्ण पार्श्वभूमीवर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे संभाव्य खाजगीकरण या प्रश्नाकडे बघितले गेले पाहिजे. निर्विवाद बहुमत आहे म्हणून एक किंवा दोन कायद्यात दुरुस्ती करून सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे खाजगीकरण विद्यमान सरकारला सहज शक्य आहे, पण बँका खाजगीकरणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घ्यायला हवी. भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे सोशालिस्ट रिपब्लिक म्हणजेच समाजवादी प्रजासत्ताक,

समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सरकारचे आर्थिक धोरण काय असले पाहिजे? मूलभूत हक्कात सर्व प्रकारच्या समतेचा, ज्यात आर्थिक समता पण आली, याचा पुरस्कार केला जातो. घटनेतील जनतेला दिलेल्या अधिकारात जर जगण्याच्या अधिकाराचा समावेश असेल तर ते साध्य करण्यासाठी कुठले आर्थिक धोरण सरकारने अंगीकारले पाहिजे? यासह सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या खाजगीकरण प्रश्नाकडे बघितले गेले पाहिजे. खाजगी क्षेत्रातील बँकांचा जनधन खात्यात वाटा आहेत ३%, पेन्शन खात्यात वाटा आहे २% सामाजिक सुरक्षितते अंतर्गत गरिबांसाठी काढण्यात येणाऱ्या जीवन विमा योजनेत वाटा आहे २%, पिक विमा योजनेत वाटा आहे २०%, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेत वाटा आहे ५%, प्रधानमंत्री पिक कर्ज योजनेत वाटा आहे ५%, फेरीवाल्यांसाठीच्या स्वनिधी कर्ज योजनेत वाटा आहे २% तर शैक्षणिक कर्ज योजनेत वाटा आहे २०%, महामारीच्या काळात छोट्या आणि मध्यम आकाराच्या उद्योगांसाठी राबवण्यात आलेल्या तातडीच्या मदत कर्ज योजनेत वाटा आहे १०%, बचत गट कर्ज योजनेत वाटा आहे ६.७%. ही आकडेवारी पुरेशी बोलकी आहे. याचाच अर्थ उद्या चालून सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे खाजगीकरण केले गेले तर हा सामान्य माणूस बँकिंगच्या म्हणजेच पर्यायाने विकासाच्या वर्तुळाबाहेर फेकला जाणार आहे. या परिस्थितीत घटनेतील मार्गदर्शक तत्व समाजवाद तसेच मूलभूत हक्कातील समता आणि जगण्याच्या हक्काचे काय?

### सरकारचा मालकी हक्क हेच खरे भांडवल

सार्वजनिक क्षेत्रातील बँका भांडवल आणि संचित मिळून साडे सहा लाख कोटी रुपयांच्या भांडवलावर ११२.६० लाख कोटी रुपये ठेव आणि ६३.१८ लाख कोटी रुपये कर्ज म्हणजे एकूण व्यवसाय १७५.७८ लाख कोटी रुपये हाताळतात. ११२.६० लाख कोटी रुपयांतील ३० लाख कोटी रुपयांच्या ठेवी कमी व्याजदरावर गोळा करण्यात आलेल्या बचत ठेव खात्यात आहेत. ज्याचा अर्थ सामान्य माणसांनी घाम गाळून जमा केलेल्या बचतीवर बँकांचा हा डोलारा उभा आहे. ज्या सामान्य माणसासाठी ही बँक सरकारी बँक आहे ही गोष्ट त्याला आश्वस्त करते. हे आहे सार्वजनिक बँकांचे खरेखुरे भांडवल. त्याच्या अनुपस्थितीत सामान्य माणसाच्या बचतीच्या सुरूक्षिततेचे काय? एकूणच भारताच्या आर्थिक विकासाचा आजचा टप्पा, अर्थव्यवस्थेपुढे उभी असलेली आव्हाने व गरज लक्षात घेता या अर्थव्यवस्थेत बँकेचे स्थान काय असेल किंवा असावे? भारतीय बँकिंगकडून आपल्याला सामाजिक नफा हवा आहे की, आकड्यांच्या परिभाषेतील नफा हवा आहे? या प्रश्नांची उत्तरे आधी शोधली जायला हवीत.

### बँक खाजगीकरणाचे आत्मघातकी पाऊल

२०१४ पर्यंत सरकार काँग्रेसप्रणित आघाडीचे होते ते आज भाजपाप्रणित आघाडीचे आहे. सरकारे येतील आणि जातील. पाच किंवा दहा वर्षांचा मिळालेला जनादेश म्हणजे आपल्याला हवे ते निर्णय घेण्यासाठीच परवाना अशी जर सत्ताधाऱ्यांची समजूत असेल तर ती चुकीची आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे खाजगीकरण अर्थव्यवस्थेसाठी, देशासाठी घातक सिद्ध होऊ शकते हे लक्षात घेता राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीचा वारसा म्हणून भारतीय राज्यघटनेतील अनुस्यूत तत्त्वे कशी साध्य होणार आहेत? या परिप्रेक्ष्यात या प्रश्नाकडे बघितले गेले पाहिजे.

१९६९ साली तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी राजकीय खेळी म्हणून पक्षांतर्गत विरोधकांवर मात करण्यासाठी उचलेला एक लोकानुनयी निर्णय असे त्या निर्णयाकडे पाहात त्यावर कुरघोडी करण्यासाठी, पूर्वीच्या राजवटीतील महत्त्वाचे निर्णय फिरवून इतिहास पुसून टाकणे या हेतूने जर हा बँक खाजगीकरणाचा निर्णय घेतला जात असेल तर तो नक्कीच घातक सिद्ध होईल.

### जनतेचा पैसा जनतेच्या भल्यासाठी

याचा अर्थ आज जे भारतीय बँकिंगमध्ये चालू आहे ते सगळे काही आलबेल आहे आणि ते तसेच पुढे चालू ठेवले पाहिजे असे मुळीच नाही. आजच्या भारतीय बँकिंगच्या परिस्थितीत खूप मोठे बदल घडवून आणले पाहिजेत. त्याचे सूत्र एकच असायला हवे. **'जनतेचा पैसा जनतेच्या भल्यासाठी'** सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून भारतीय बँकिंगचे अधिकाधिक लोकशाहीकरण घडवून आणले पाहिजे. राबवण्यात येणारी धोरणे लोकाभिमुख असली पाहिजेत, ज्याची तपशीलात जाऊन मांडणी केली जाऊ शकते. या एका व्यापक चौकटीत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या खाजगीकरणाच्या प्रश्नाकडे बघितले गेले पाहिजे.

**सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे खाजगीकरण करण्याचा केन्द्र सरकारच्या धोरणाचा पराभव करा!**

❖❖❖

# फलज्योतिष शास्त्र का नाही?

■ **शब्दांकन : भाग्यश्री भागवत**

■ **डॉ. नरेंद्र दाभोलकर**

फलज्योतिषाला शास्त्राचा दर्जा देण्याची मागणी व चर्चा अधूनमधून होत असते आणि कुठेकुठे तसे प्रयत्नही होतात, पण बहुतेक वेळा ते हाणून पाडण्यात आले आहेत. गेल्या महिन्यात असाच एक प्रयत्न झाला आहे. त्यावर बरीच टीकाटिप्पणी होत आहे. इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ (इग्नू) दिल्ली यांनी आपल्या अभ्यासक्रमात फलज्योतिष हा विषय समाविष्ट केल्याचे जाहीर केले आहे. म्हणून त्याचा तर्कशुद्ध व मार्मिक पद्धतीने प्रतिवाद म्हणता येईल असे हे भाषण पुनर्मुद्रित करीत आहोत. डॉ. दाभोलकरांच्या दहा भाषणांचा संग्रह असलेल्या **'विवेकाचा आवाज' (साधना प्रकाशन, पुणे)** या पुस्तकातून हे भाषण अंशतः संपादित करून घेतले आहे.

**- संपादक**

अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ करत असताना लोक सतत सांगत असतात, 'हे तुमचं अंधश्रद्धा निर्मूलनाचं काम चांगलंच आहे. तुम्ही बुवांचं आणि बाबांचं पितळ उघडं पडता, ते योग्यच आहे. भूत नसणं आणि मानसिक आरोग्य यांच्याबद्दल तुम्ही जी काही माहिती देता, तीही चांगली आहे. भानामतीच्या भयसूचक घटना ज्या वेळी घडतात, त्या वेळी प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन तुम्ही ती भानामती थांबवता, हे तर फारच चांगलं आहे.' अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीबद्दल असं सगळं म्हणणारे लोक 'फलज्योतिष हे शास्त्र नाही.' किंवा 'फलज्योतिष हे थोतांडच आहे', असं आम्ही म्हणायला लागल्यावर मात्र लगेच म्हणतात की, 'दाभोलकर बिघडले, चळवळ बिघडली'. यासाठी त्यांचं प्रतिपादन काय असतं? ते असं म्हणतात की, 'ज्योतिषाला दोन हजार वर्षांचा इतिहास आहे. त्याच्यामुळे ज्योतिष हे शास्त्र आहे' दुसरं ते असं म्हणतात की, 'दिल्लीपासून गल्लीपर्यंत सर्व ठिकाणी, सर्व थरातले लोक ज्योतिषाला शास्त्र मानतात आणि ज्योतिषाला शास्त्र न म्हणणारे तुम्हीच शहाणे निघाला काय!' तसंच तिसरं म्हणजे, असं तिरकसपणे विचारलं जातं की, 'दाभोलकर, तुम्ही डॉक्टर आहात. आम्हाला डॉक्टरीतलं काही कळत नाही. मग आम्ही त्याच्याबद्दल बोलतो का? तसं तुमचा ज्योतिषाचा काही अभ्यास नाही. तुम्हाला त्यातलं काही कळत नाही, मग तुम्ही त्याच्याबद्दल का बोलता?' या सगळ्या प्रश्नांची अतिशय व्यवस्थित उत्तरं आहेत.

पहिली गोष्ट म्हणजे, ज्योतिषाला दोन हजार वर्षांचा नव्हे; म्हटलं तर. जवळजवळ सहा-सात हजार वर्षांचा इतिहास आहे. म्हणजे बॅबेलोनिअन संस्कृतीमध्ये इसवी सनाच्या पूर्वी ४००० वर्षं आकाशातल्या ग्रहगोलांच्या केलेल्या नोंदी आढळलेल्या आहेत. आकाशामध्ये विशिष्ट प्रकारचे ग्रह दिसले की, त्यानंतर काही काळाने पाऊस सुरू होत असल्याचे आकाशातल्या ग्रहगोलांच्या सातत्याने केलेल्या नोंदीमुळे तिथल्या लोकांच्या लक्षात आलं. त्यामुळे तसे ग्रह-तारे आकाशामध्ये दिसले की, काही दिवसांनी पाऊस येणार असल्याचं, नाईल नदीचा गाळ दोन्ही किनाऱ्यांवर पसरणार असल्याचं आणि त्यामुळे लोकांनी शेतीच्या कामाच्या तयारीला राहण्याची गरज असल्याचं स्वाभाविकपणे या काळातले लोक सांगायचे. म्हणजे सुरुवातीच्या काळी काही शे वर्षं त्यांनी ग्रहगोलांची जी निरीक्षणं केली, त्याच्यामध्ये खगोलशास्त्र होतं, त्याच्यामध्ये गणित होतं आणि त्याच्यामध्ये फलज्योतिषही होतं. म्हणजेच त्याच्यामध्ये ॲस्ट्रॉनॉमी होती, मॅथमॅटिक्स होतं आणि ॲस्ट्रॉलॉजी होती.

जसजसा विज्ञानाचा प्रकाश फाकला, त्याचा प्रसार झाला, तसंतसं खगोलशास्त्र हे पूर्ण शास्त्र बनलं, गणित हे पूर्ण शास्त्र बनलं आणि फलज्योतिषाला मात्र शास्त्राचा दर्जा मिळाला नाही. मात्र

तोपर्यंत फलज्योतिषामध्ये अनेकांचे हितसंबंध तयार झाले होते. एका बाजूला माणसाला स्वाभाविकपणे स्वत:च भविष्य कळणं आवडतं. त्यामुळे बहुसंख्यांचे हितसंबंध होतेच. दुसऱ्या बाजूला ज्योतिष सांगणाऱ्यांचेही मजबूत हितसंबंध तयार झालेले होते. त्यांना पैसा, कीर्ती, प्रसिद्धी हे सगळं फलज्योतिषामुळे मिळत होतं. त्यांपैकी काही जण ज्योतिर्विद्या विशारद झालेले होते; काही ज्योतिर्भास्कर झालेले होते; काही ज्योतिष्मती झालेल्या होत्या. त्यामुळे जरी प्रत्यक्षात फलज्योतिषाला कसलाही शास्त्रीय आधार नसला, तरी दोन-चार हजार वर्षांचा इतिहास सांगत ते टिकून राहिलं; पण एखादी गोष्ट किती हजार वर्षं सांगितले जाते, ही त्या गोष्टीला शास्त्र ठरवण्यासाठीची कसोटी नसते.

दिल्ली ते गल्ली सगळेच जण ज्योतिष बघत असल्यामुळे 'ज्योतिष हे शास्त्र आहे', असं म्हणणं तर हास्यास्पद आहे. कारण दिल्ली ते गल्ली लोक अनेक गोष्टी करतात, पण म्हणून त्या गोष्टी बरोबर आहेत, योग्य आहेत असं काही कुणी मानत नाही. दिल्ली ते गल्ली लोक गुटखा खातात आणि दारू पितात, पण म्हणून ती गोष्ट काही योग्य नाही. ती प्रकृतीला हानिकारकच आहे. दिल्ली ते गल्ली लोक भ्रष्टाचारही करतात. ही समाजविघातक गोष्ट आहे. त्याचप्रमाणे दिल्ली ते गल्ली लोक जर फलज्योतिषावर विश्वास ठेवत असतील, तर याचा अर्थ एवढाच की, ते सगळेच जण चूक करतात. चूक करणारी व्यक्ती एक आहे की असंख्य आहेत, त्याच्यावरनं गोष्ट चूक आहे की नाही, हे ठरत नाही.

तिसरा मुद्दा असा की, 'आम्ही बोलत नाही वैद्यकीय शास्त्राबद्दल, तुम्ही बोलू नका ज्योतिषशास्त्राबद्दल', याच्यामध्ये असं गृहीत धरलेलं आहे की, वैद्यकीय शास्त्र जसं शास्त्र आहे, तसं ज्योतिष हेदेखील शास्त्रच आहे. आता आम्ही करणीबद्दल बोलतो, भानामतीबद्दल बोलतो, चेटुकाबद्दल बोलतो, जादूटोण्याबद्दल बोलतो - आणि एवढंच नव्हे, तर महाराष्ट्र सरकारने यासाठी कायदा करावा म्हणून आम्ही प्रयत्नशील आहोत आणि तो कायदा होईल - तेव्हा कोणी आम्हाला असं विचारत नाही की, 'तुम्हाला चेटूक करता येत नाही. जादूटोणा करता येत नाही, भानामती म्हणजे काय तुम्हांला माहीत नाही... मग अशा गोष्टी तुम्हाला माहीत नसताना तुम्ही त्या खोट्या आहेत, असं बिनधास्त कसं बोलता? आणि त्याच्या विरोधामध्ये कायदा कसा करायला सांगता?' याचं साधं उत्तर असं आहे की, आम्हाला या गोष्टींमधली कोणतीच गोष्ट कळत नाही, पण आम्हाला वैज्ञानिक दृष्टिकोन कळतो. त्यामुळे आम्हांला हे कळतं की, प्रत्येक कार्याच्या मागे कारण असतं आणि ते विशिष्ट पद्धतीने तपासता येतं. ज्या पद्धतीने भानामती, जादूटोणा, करणी, चेटूक यांच्यामागे कोणताही कार्यकारणभाव सिद्ध झालेला नाही, त्याच पद्धतीने फलज्योतिषामागचाही - ज्याल लोक शास्त्र म्हणतात - कार्यकारणभाव सिद्ध झालेला नाही. याचाच अर्थ असा की, कुठल्याही तज्ज्ञ ज्योतिषाला तुम्ही असं म्हणू शकता की, 'नरेंद्र दाभोलकर असं म्हणाले की, ज्योतिष या शास्त्राने आपला पायपोथिसिस किंवा गृहीतकच अजून जाहीर केलेलं नाही.' कुठलीही गोष्ट शास्त्र असल्याचा दावा करण्यासाठी एक गृहीतक मांडावं लागतं आणि जर ते गृहीतक काटेकोर तपासण्यामधनं वारंवार तावून-सुलाखून सिद्ध झालं, तरच त्याचं शास्त्रीय सिद्धान्तामध्ये रूपांतर होतं.

मात्र ज्योतिषांनी जे गृहीतक मांडलेलं नाही, पण ज्याच्या आधारे ते व्यवहार करतात, ते गृहीतक मी आपल्याला सांगतो. त्या गृहीतकाचे तीन भाग आहेत. पहिली गोष्ट म्हणजे, आकाशस्थ ग्रहगोलांचे मानवी जीवनावर सतत आणि अखंड परिणाम होत असतात. दुसरी गोष्ट, व्यक्ती जन्माला येते, त्या जन्मवेळेवर हे परिणाम अवलंबून असतात. तिसरी गोष्ट, यामुळे माणसाचं नशीब कळतं, ठरतं किंवा बदलतं. म्हणजे काही जणांना वाटतं की, याच्यामुळे नशीब फक्त कळू शकतं. काही जणांना वाटतं की, यामुळे नशीब काही प्रमाणात बदलू शकतं, आणि काही जणांना तर असंही वाटतं की, ग्रहगोलतारेच नशीब ठरवतात. ही तीन गृहीतकं जर आपण नीट तपासली, तर 'फलज्योतिष शास्त्र नाही', या प्रतिपादनामागचं सत्य आपल्याला अधिक चांगल्या प्रकारे समजू शकेल.

मानवी जीवनावर सतत आणि अखंड परिणाम करणाऱ्या आकाशस्थ ग्रहगोलांमध्ये आपल्या सूर्यकुलातल्या नवग्रहांचा आणि नंतर नक्षत्र आणि राशी यांचा समावेश होतो. आता जे नऊ ग्रह ज्योतिषी गृहीत धरतात, त्या नऊ ग्रहांची स्थिती बघू या. यांपैकी एक सूर्य. पण सूर्य हा ग्रह नाही. तो तारा आहे. चंद्र हा ग्रह नाही. तो पृथ्वीचा उपग्रह आहे. दाऊद गँगमधून भरती केल्यासारखे असणारे राहू आणि केतू हे खतरनाक ग्रह प्रत्यक्षामध्ये अस्तित्वात नाहीत. ते छेदनकक्षा किंवा संपातबिंदू आहेत. म्हणजे, नऊपैकी चार गोष्टी जर अस्तित्वातच नसतील, तर नऊपैकी चार, म्हणजे ४४ टक्के शास्त्राचा निकाल या ठिकाणीच लागतो. याचबरोबर जर ज्योतिषांनी 'चंद्र' या उपग्रहाला जमेस धरलेलं असेल, तर गुरूला तर आत्तापर्यंत ४५ उपग्रह सापडलेले आहेत! मग त्या गुरूच्या उपग्रहांना ज्योतिषी त्यांच्या कुंडलीमध्ये स्थान का देत नाहीत, याचंही उत्तर ज्योतिषांनी द्यायला पाहिजे. त्यामुळे 'नवग्रहांवर माणसाचं जीवन अवलंबून असतं', याला वस्तुस्थितीमध्ये काहीही आधार नाही.

मी अनेकदा अनेक ठिकाणी विचारतो की, पृथ्वीवरच्या माणसाच्या दृष्टीने सगळ्यात खतरनाक आणि सगळ्यात प्रभावी ग्रह कोणता? याचं उत्तर बहुधा सगळीकडे 'शनी' असं येतं. क्वचित काही ठिकाणी 'मंगळ' असं येतं. परत परत हाच प्रश्न विचारला, तरीदेखील उत्तर असंच येतं; पण पृथ्वीवरच्या माणसाच्या दृष्टीनं सगळ्यात खतरनाक आणि सगळ्यात प्रभावी ग्रह आहे, पृथ्वीच! पृथ्वी हा ग्रह आहे ना आपल्या नवग्रहांमधला! मग तुमचं आणि माझं सगळं जीवन त्या पृथ्वीवर ठरत असतं. शनीवर फ्लॅटचा दर काय चाललाय, शनीवर पर्यावरणाची परिस्थिती काय आहे, शनीवर प्यायला पाणी मिळतं का नाही याच्याशी तुमचा आणि माझा काही

संबंध नाहीये. तुमचं आणि माझं सगळं जीवन ज्या पृथ्वीवर ठरतं, त्या पृथ्वीचा उल्लेखदेखील तुमच्या कुंडलीत का नाही? यावर ज्योतिषी असं सांगतात की, 'तो उल्लेख नाही, कारण पृथ्वी केंद्रस्थानी आहे'. आता पृथ्वी नवग्रहांच्या केंद्रस्थानी आहे असं म्हणणं, म्हणजे गॅलिलिओपासून-कोपर्निकसपासून-जयंत नारळीकरांपर्यंत सगळ्या शास्त्रज्ञांना एका फटक्यात मोडीत काढणं आहे.

परंतु जर तुम्ही अधिक खोलात जाऊन विचार केलात, तर तुमच्या असं लक्षात येईल की, ज्या वेळेला एखाद्या गोष्टीचा परिणाम बघायचा असतो, त्या वेळी तो कसा तपासला जातो? म्हणजे समजा, एखाद्या वनस्पतीचा काढा घेतल्यानंतर प्रकृतीवर काय परिणाम होतो, हे जर तपासायचं असेल, तर त्या वनस्पतीचा काढा काढून, ज्या संदर्भात या काढ्याचा परिणाम होतो, अशा रोग्यांना तो देऊन त्याचे परिणाम बघावे लागतील. पण समजा, १०० वनस्पतींचा एक काढा तयार केला किंवा नऊ वनस्पतींचा एक काढा तयार केला, तो रोग्याला दिला आणि रोग्याला बरं वाटलं, तर कुठल्या वनस्पतीमधल्या कोणत्या गुणामुळे रोग्याला बरं वाटलं, हे कळू शकेल काय? याचप्रमाणे नवग्रह, तुमच्या राशी आणि तुमची नक्षत्रं यांचा तुमच्यावर जो परिणाम होतो, तो नेमक्या कुठल्या राशीचा, कुठल्या नक्षत्राचा, कुठल्या ग्रहाचा होतो आणि तो कसा होतो, हे जर नेमकेपणाने समजून घ्यायचं असेल, तर त्या वेळी ती विशिष्ट राशी, ते विशिष्ट नक्षत्र किंवा तो विशिष्ट ग्रह वगळता बाकीच्यांचा परिणाम झाकून ठेवायला पाहिजे. अशी कोणतीच सोय जर नसेल, तर 'अमुक अमुक शनी करतो', 'अमुक अमुक मंगळ करतो' आणि 'तमुक तमुक गुरू करतो' या म्हणण्याला कोणताही आधार राहत नाही.

याचबरोबर कुठलीही गोष्ट शास्त्र म्हणून सिद्ध करण्यासाठी त्या गोष्टीचं दीर्घ काल निरीक्षण करावं लागतं. मात्र ज्योतिषाच्या संदर्भात हे निरीक्षण करणं, ही गोष्ट सर्वस्वी अशक्य आहे. याचं पहिलं कारण, तुमचे नवग्रह हे तर आहेच, पण हे नवग्रह ज्या राशींमध्ये आहेत आणि ज्या नक्षत्रांमध्ये आहेत, त्या राशी आणि ती नक्षत्रं यांच्यामधनं ते ग्रह वाट काढत चालतात, असं आपल्याला सांगण्यात येतं. प्रत्यक्षामध्ये मात्र हे नवग्रह, नक्षत्रं आणि राशी यांच्यामध्ये महामहामहाप्रचंड अंतर आहे, हे आता आपल्याला माहीतच आहे. म्हणजे या सगळ्यांच्यात किमान ५० हजार अब्ज मैलांचं अंतर आहे. आपल्या एकट्या सूर्यकुलामध्ये नऊ ग्रह आहेत आणि आपला सूर्य ज्याचा भाग आहे, त्या आकाशगंगेमध्ये सूर्यापेक्षा मोठे असे २०० अब्ज तारे आहेत, आणि अशा १००० कोटी आकाशगंगा आत्तापर्यंत सापडलेल्या आहेत. आपल्या जीवनावर प्रभाव टाकणारे ग्रह-राशी-नक्षत्र यांचं निरीक्षण करण्यासाठी तीच तीच स्थिती परत यावी लागते, आणि एवढं सगळं अफाट विश्व जर आपल्याभोवती सतत फिरत असेल, तर आकाशस्थ गोष्टींचा एकूण पसारा पाहता, तीच तीच स्थिती परत येणं ही गोष्ट सर्वस्वी अशक्य आहे.

म्हणजे, एखाद्या झाडाला वर्षातनं एकदा फूल येतं. त्याचं निरीक्षण करता येईल; दहा वर्षातनं एकदा येतं; शक्य आहे; शंभर वर्षांमधून एकदा येतं; अवघड आहे, पण शक्य आहे; १००० वर्षांनी येतं, तर खूपच अवघड आहे, पण तरी चालेल. पण एखाद्या झाडाला जर १ लाख वर्षांनी किंवा १ कोटी वर्षांनी फूल येत असल्याचं सांगण्यात आलं, तर त्याचं निरीक्षण शक्य नाही. त्याच पद्धतीने सगळी ग्रहस्थिती बरोबर त्याच पद्धतीने पुन्हा येणं ही गोष्टच शक्य नसल्यामुळे फलज्योतिषाच्या बाबतीत 'निरीक्षण' ही गोष्ट अशक्य आहे.

त्यामुळे फलज्योतिषाला शास्त्राचा पाया लाभूच शकत नाही.

आकाशातल्या पोकळीचे १२ भाग केलेले आहेत, ते १२ भाग कायम आहेत आणि त्यांना गुण दिलेले आहेत, या गृहीतकावर सगळं फलज्योतिष उभं आहे. मुळात, आकाशातल्या पोकळीचे १२ भाग करणं ही गोष्ट अतिशय हास्यास्पद आहे. कारण आपल्याला माहिती आहे की, सूर्य, बाकीचे सगळे ग्रह आणि पृथ्वी हे सगळे सतत फिरत असतात. विशेषत: आपली पृथ्वी दिवसाला चोपन्न हजार मैल या वेगाने फिरत असते. आता जी पृथ्वी अशी फिरते, तिच्या आजूबाजूच्या पोकळीमधले भाग कायम कसे राहतील? ते कायम राहतील आणि पुन्हा त्यांना गुण आहेत, याचा पुरावा काय? त्यामुळे हे सगळं पूर्णपमे अशास्त्रीय आहे. ज्योतिषी असं सांगतो की, मंगळ आणि रवी हे पुरुष प्रकृतीचे ग्रह आहेत; बुध आणि शनी नपुंसक आहेत. म्हणजे काय? मंगळ आणि रवी काय आहेत, बुध आणि शनी काय आहेत, याचं बऱ्यापैकी ज्ञान आता खगोलशास्त्राला आहे. अशा वेळेला कोणता तरी ग्रह पुरुष प्रकृतीचा आहे, कोणता तरी ग्रह स्त्री प्रकृतीचा ग्रह आहे, नक्षत्र आणि राशी या पृथ्वी, जल, वायू, अग्नी यांच्यापासून बनलेल्या आहेत यांपैकी कुठल्याही गोष्टीला कुठलाही पुरावा नाही. त्यामुळे फलज्योतिषाला पुराव्याच्या अभावी स्वाभाविकपणेच शास्त्राचा दर्जा प्राप्त होऊ शकत नाही.

आधुनिक शास्त्राच्या लक्षात आलेली आणखी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. तिच्यामुळे तर फलज्योतिषाचा 'शास्त्र' हा पायाच उखडला जातो. आपण असं मानतो की, पृथ्वीला दोनच गती आहेत. एक म्हणजे, ती सूर्याभोवती फिरते आणि दुसरी म्हणजे, ती स्वत:भोवती फिरते. परंतु याच्याबरोबर पृथ्वीला एक तिसरी गती आहे. तिला म्हणतात, परांचन किंवा वॉबलिंग. म्हणजे पृथ्वी सूर्याभोवती फिरते, पृथ्वी स्वत:भोवती फिरते आणि त्याच वेळेला भोवरा जसा स्वत:च्या आसाभोवती झोकांड्या खातो, त्याच पद्धतीने पृथ्वी स्वत:च्या आसाभोवती झोकांड्या खाते. या परांचनामुळे पृथ्वीला मूळ पदावर येण्यासाठी सव्वीस हजार वर्षं लागतात. कारण ती ३६० अंशांमधून फिरते. म्हणजे आज पृथ्वीचा आस ध्रुवाकडे आहे. तो २००० वर्षांनी व्होगा नक्षत्राकडे होणार. याच चालीवर जर २००० वर्षांपासून ज्योतिष अस्तित्वात आहे असं मानलं, तर आता पृथ्वीचं परांचन एका घराने पुढे सरकलेलं आहे.

म्हणजे पूर्वी जी वृषभ राशीची नक्षत्रं होती, ती खरं म्हटलं तर आता मिथुन राशीत आलेली आहेत आणि त्यांचा पायाच बदललेला आहे. या सगळ्याचा जर विचार केला, तर आकाशस्थ ग्रहगोलांचा मानवी जीवनावर सतत आणि अखंड परिणाम होत असतो, हे कथित ज्योतिषशास्त्राचं पहिलं गृहीतक कोसळून पडतं.

दुसरं गृहीतक म्हणजे, हा परिणाम व्यक्तीच्या जन्माच्या वेळेवर अवलंबून असतो. माझी पत्नी स्त्रीरोगतज्ज्ञ आहे. माझ्या हॉस्पिटलमध्यचे महिन्याला ३०-४० मुलं प्रसूत होतात. मूल प्रसूत झालं रे झालं आणि डॉक्टर बाहेर आले रे आले की, नातेवाईक दोन प्रश्न विचारतात. पहिला प्रश्न, 'डॉक्टर, मुलगा की मुलगी?' हल्ली तो विचारत नाहीत. कारण आधीच गुपचूप सोनोग्राफी करून आलेले असतात. दुसरा प्रश्न असतो, 'डॉक्टर, किती वाजले?' आता रुग्ण हे माझे ग्राहक आहेत आणि मी एक व्यवसाय करतो, त्यामुळे माझा विश्वास असो वा नसो, मला माझ्याकडे असलेल्या रुग्णाला त्याच्या बाळाच्या जन्माची अचूक वेळ द्यावी लागते.

वास्तविक, जन्माची अचूक वेळ द्यायला माझी काही हरकत नाही, पण माझ्या मते जन्माच्या सात वेळा आहेत. यांपैकी कुठली वेळ अचूक आहे, असं म्हणायचं? नंबर एक, स्त्रीच्या गर्भनलिकेमध्ये स्त्री बीज आणि पुरुष बीज यांचं ज्या वेळी मीलन होतं आणि नव्या जिवाची पहिली पेशी, म्हणजे एम्ब्रिओ ज्या वेळी स्त्रीच्या गर्भनलिकेमध्ये म्हणजे फॅलोपिअन ट्यूबमध्ये तयार होते, त्या वेळेला खरं म्हटलं, तर नवा गर्भ जन्माला येतो; प्रत्यक्ष जन्माच्या साधारणपणे ९ महिने ९ दिवस आधी. त्याची नेमकी वेळ कळणं कधीच शक्य नाही. मग ती जन्माची वेळ मानायची? नंबर दोन, पोटातलं बाळ काही महिन्यांचं झाल्यानंतर आम्हा डॉक्टर्सना गर्भपात करण्याची परवानगी नसते. कारण हे बाळ जगण्याची शक्यता असते. त्यामुळे ते बाळ तुम्हाला गर्भपात करून मारता येत नाही. म्हणजे ज्या वेळेला मारता येत नाही. म्हणजे कायद्यानुसार, ज्या वेळेला गर्भातल्या बाळाला जननक्षमता प्राप्त होते, ती त्याची जन्माची वेळ मानायची का आणि ती कशी काढायची?

नंबर तीन, बाळाचा जन्म होतो. पण बाळाचा जन्म होतो, म्हणजे काही रॉकेटचं उड्डाण होत नाही; की, काउंटडाउन सुरू, ३-२-१- टँहँ- बाळ जन्माला आलं. जन्म होतो याचा अर्थ, बाळाचं डोकं आधी बाहेर येतं आणि काही वेळेला बाळाचे पाय बाहेर यायला काही मिनिटं लागतात. अपवादात्मक परिस्थितीत अर्धा तास लागतो. मग मूल कधी जन्माला येतं? ज्या वेळेला मुलाचं डोकं बाहेर आलं, त्या वेळी की ज्या वेळी मुलाचे पाय बाहेर आले, त्या वेळी? आणि मध्ये जो वेळ जातो, त्यामध्ये नक्षत्रं बदललं, तर कुठल्या नक्षत्रावर मूल जन्माला आलं असं मानायचं? नंबर चार, सगळीच मुलं काही डोक्याकडून जन्माला येत नाहीत. काही पायाकडनं येतात, ज्यांना आपण पायाळू म्हणतो किंवा आम्ही डॉक्टर त्याला ब्रीच डिलिव्हरी म्हणतो. अशा वेळेला पुन्हा तोच प्रश्न येतो की, मूल जन्माला कधी येतं? त्याचे पाय बाहेर आले, त्या वेळी की त्याचं डोकं बाहेर आलं त्या वेळी?

नंबर पाच, जन्माला आलेलं प्रत्येक मूल हे आईच्या अस्तित्वाचा भाग असतं. ते आईशी वारेने किंवा नाळेने जोडलेलं असतं. आम्ही डॉक्टर ती नाळ कापतो आणि त्याला आईपासून वेगळं करतो. या जगातलं त्याचं स्वतंत्र अस्तित्व सुरू करतो. म्हणजे ज्या वेळेला त्या बाळाचं या जगातलं स्वतंत्र अस्तित्व चालू होतं, त्या वेळेला ते जन्माला आलं, असं मानायचं की नाही. मग मूल कधी जन्माला येतं?

आणि नंबर सहा, जन्माला आलेलं प्रत्येक मूल हे रडावंच लागतं. जन्माला आलेलं मूल जर रडलं नाही ना, तर डॉक्टरवर रडायची पाळी येते. त्यामुळे जन्माला आलेलं मूल रडलं नाही, तर त्याचे पाय धरून, त्याला उलटं करून त्याच्या पाठीवर आम्ही थपाटे लावतो. पण आम्हाला कोणी असं म्हणत नाही की, 'अहो, तुम्ही काय निर्दय आहात! आत्ता बाळ जन्माला जन्माला आलंय आणि तुम्ही त्याच्या पाठीवर काय मारताय!' कारण ज्या वेळेला बाळ टँहँऽ करून रडतं, त्यावेळी आपल्या दृष्टीने ते रडत असतं, पण आईच्या अस्तित्वाचा भाग असल्यामुळे आकुंचन पावलेली त्याची फुफ्फुसं टँहँऽ करून रडल्यानंतर कार्यरत होतात आणि बाळ या जगातला पहिला श्वास घेतं. म्हणजे ज्या वेळेला ते या जगातला पहिला श्वास घेतं, त्या वेळेला ते जन्माला येतं. खरंय की नाही? मग मूल कधी जन्माला येतं? आणि एवढ्यानेच भागत नाही. आपल्याला माहिती आहे की, ज्या स्त्रियांची नैसर्गिक प्रसूती होणार नसते, त्यांना सिझेरिअन सांगितलेलं असतं.

त्याच्यामुळे एक लक्षात घ्या की, 'जन्माच्या वेळेवर आयुष्य ठरतं', ही एक फार मोठी अंधश्रद्धा आहे. समजा, कुठल्याही एका ठिकाणी एकाच वेळेला तीन टेबलं ठेवली. तीन टेबलांवर दिवस भरलेल्या तीन बायकांना झोपवलं. त्यांच्यातली एक बाई ग्रामीण भागातली शेतमजूर बाई आहे. दुसरी बाई एका गावामधल्या, बऱ्यापैकी आर्थिक स्थिती असलेल्या व्यापाऱ्याची मुलगी आहे आणि तिसरी बाई या देशातल्या सगळ्यात श्रीमंत असलेल्या मुकेश अंबानीची मुलगी किंवा सून आहे. आता, समजा एकाच ठिकाणी एकाच सेकंदाला सिझेरिअन करून तीनही बाळांना जन्म दिला, तर तिघांचंही भविष्य एकच असायला पाहिजे, पण आपण हे सहज समजू शकतो की, बाळ जन्माला आल्यानंतर शेतमजुराची मुलगी शक्य तितक्या लवकर बाळाला सांभाळत घरी जाईल. कारण जर ती रोज रोजगाराला गेली नाही, तर तिचं पोट भरणार नाही. शस्त्रक्रिया होऊन टाके काढल्यानंतर दहा दिवसांनी व्यापारी गाडी घेऊन येईल आणि स्वत:च्या मुलीला घरी घेऊन जाईल. स्वत:च्या सुनेला किंवा मुलीला नेण्यासाठी अंबानी हॉस्पिटलच्या जवळ कुठे हेलिकॉप्टर उतरवण्याची सोय असल्याची चौकशी करतील. याचा अर्थ असा की, माणसाचं भविष्य ग्रहगोलांच्या

गतीवर नव्हे, तर समाजाच्या स्थितीवर ठरत असतं आणि ती स्थिती बदलणं, हे आपल्या हातामध्ये असतं. त्यामुळे जन्माच्या वेळेवर माणसाचं भविष्य अवलंबून असतं, हे जे दुसरं गृहीतक आहे, तेदेखील खोटं ठरतं.

तिसरा सिद्धान्त तर अधिकच घातक आहे. तो असा की, ज्योतिषामुळे माणसाचं भविष्य कळतं किंवा बदलतं किंवा ठरतं. म्हणजे काय? म्हणजे असं सांगण्यात येतं आणि आपल्यापैकी अनेकांना ही कल्पना मुळातच मान्य असते की, तुम्ही जन्माला येतानाच तुमचं प्रारब्ध घेऊन येता. त्यामुळे तुमच्या आयुष्यामध्ये काय घडणार, हे तुम्ही जन्माला येतानाच ठरलेलं असतं. म्हणजे, तुम्ही जर पुण्यावरनं मुंबईला रेल्वेने जात असाल, तर रेल्वेचे रूळ जसे जातात, तसंच तुमच्या रेल्वेच्या गाडीला जावं लागतं. होतं एवढंच की, ठिकठिकाणी बोर्ड असतात की, 'बाबा, अमक्या अमक्या ठिकाणी बोगदा आहे', 'अमक्या अमक्या ठिकाणी धोकादायक वळण आहे', 'अमक्या अमक्या ठिकाणी चढ आहे'. त्यामुळे गाडी असो किंवा रेल्वे असो, ती ज्या रस्त्यावरनं जात असते, तो रस्ता बदलता येत नाही, पण रस्त्यावर येणाऱ्या संभाव्य संकटाची पूर्वसूचना मिळू शकते.

तुम्ही जन्माला आल्यानंतर तुम्ही जे प्रारब्ध घेऊन जन्माला येता, ते बदलणं कुणाच्याही हाती नसतं; पण जसं रस्त्यावरून जाताना तुम्हाला कळतं की, 'पुढे अपघाती वळण, काळजी घ्या', 'पुढे शाळा, गाडी काळजीपूर्वक हाका', त्याच पद्धतीने तुमच्या आयुष्यामधला धोक्याचा कालखंड कुठला आहे, अपघात होण्याची शक्यता कधी आहे, तुम्ही कशाची काळजी घेतली पाहिजे... अशा पूर्वनियोजित बाबींचे संकेत तुम्हाला ग्रहगोलांच्या द्वारे दिले जातात. याचा अर्थ असा की, तुमचं जीवन नियत असतं; प्रारब्ध तुमचं जीवन घडवत असतं. आता असं म्हणणं म्हणजे माणसाचं माणूसपण एका फटक्यात मोडीत काढण्यासारखं आहे. २००० वर्षं या देशातल्या बायकांच्या कुंडलीमध्ये शिकण्याचे ग्रह नव्हतेच, आणि सावित्रीबाई फुले जन्माला आल्या, एक चळवळ सुरू झाली आणि गेल्या १००-१२५ वर्षांमध्ये सगळ्या बायकांच्या कुंडलीमध्ये भराभराभरा शिक्षणाचे ग्रह आले! म्हणजे त्यांचं प्रारब्ध बदललं आणि त्यांची नियती बदलली. ती कशामुळे बदलली? ती ग्रहगोलताऱ्यांमुळे नाही बदलली, **तर 'पुरुषाच्या बरोबर बाईला हक्क द्यायला पाहिजेत आणि बाईला शिकायला द्यायला पाहिजे', असं ज्या वेळेला या देशाने ठरवलं, त्या वेळेला त्या बाईचं प्रारब्ध आणि तिची नियती या दोन्हीही गोष्टी बदलल्या.**

किंवा जे मृत्युयोग पूर्वी येत होते आणि ३०-४०-५०व्या वर्षी मृत्यू होत होते, त्यांच्यातही आता कमालीचा फरक पडला आहे. स्वातंत्र्य मिळालं त्या वेळी या देशाचं सरासरी आयुष्य होतं, २७ वर्षं. आज ६० वर्षांनंतर ते सरासरी आयुर्मान आहे, ६७ वर्षं. याचाच अर्थ, सगळे मृत्युयोग पुढे गेले. थोडक्यात, जे काही माणसाला स्वत:च्या जीवनामध्ये सोसावं लागतं, ते एका बाजूला आनुवंशिकतेने मिळालेली रंगसूत्रं आणि गुणसूत्रं यांमुळे सोसावं लागतं आणि दुसऱ्या बाजूला कुटुंब आणि समाज यांच्यामुळे सोसावं लागतं; प्रारब्ध नावाची काही गोष्ट नाही. म्हणूनच प्रारब्धाचा संकेत देणारं जे फलज्योतिष आहे, तेदेखील 'प्रारब्ध' या कल्पनेएवढंच घातक आहे, हे आपण समजून घेतलं पाहिजे.

आणखी एक असं की, आज माणूस चंद्रावर पोहोचलेला आहे. आज ना उद्या चंद्रावर वसाहती स्थापन होणार. चंद्रावर कधीतरी पहिली स्त्री प्रसूत होणार. मग ज्या वेळेला माणूस चंद्रावर जाईल आणि त्या ठिकाणी पहिली स्त्री प्रसूत होईल, त्यावेळी तिच्या कुंडलीमध्ये चंद्र कुठे असेल? असे कुठलेही प्रश्न विचारायला सुरुवात केली की, ज्योतिषी म्हणतात, 'मग तुमचं डॉक्टरी शास्त्र तरी बरोबर आहे का? तुमचं हवामान शास्त्र तरी बरोबर आहे का? मग जर तुमची शास्त्रं चुकतात, तसं आमचं शास्त्रं चुकलं, तर तुम्हाला एवढा आक्षेप घेण्याचं काय कारण आहे?' लक्षात घ्या की, शास्त्र हे चुकण्याच्या शक्यतेवरच उभं असतं, पण 'का चुकलं?' हे शोधून काढून बदलण्याच्या तयारीने ते उभं असतं, आणि ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

काही दशकांपूर्वी या देशामधले हवामानाचे अंदाज धडाधड चुकत असत. त्यामुळे त्या वेळी विनोदाने म्हटलं जात असे की, 'वेधशाळेने 'मुसळधार पाऊस पडेल' असं सांगितलं असेल, तर ऊन पडणार 'ऊन पडेल' असं सांगितलं असेल, तर छत्री घेऊन बाहेर पडावं'. आज आपल्या असं लक्षात येतं की, मान्सून येण्यापूर्वी १० दिवस आधी मान्सूनचे अचूक अंदाज केले जातात आणि ते अंदाज बहुतांश वेळा बरोबर ठरतात, कारण हवामान खात्याने आता बरीच प्रगती केलेली आहे. वैद्यकीय शास्त्र सर्व बाबींचं निदान अचूक करू शकत नाही, परंतु जर रक्तातल्या साखरेचा रिपोर्ट भारतामध्ये दाखवला, चीनमध्ये दाखवला, जपानमध्ये दाखवला आणि अमेरिकेत दाखवला, तर रक्तातल्या साखरेच्या प्रमाणावरनं सगळीकडचे डॉक्टर्स एकच निदान करतात. म्हणूनच 'वैद्यक' हे शास्त्र आहे आणि वैद्यकीय पदवी असलेल्या माणसाला कुठेही प्रॅक्टिस करता येते. जर तुम्ही जगात कुठेही टीबी असलेला एक्स-रे दाखवला, तर त्याचं निदान सगळीकडे एकाच प्रकारे होतं आणि यामुळेच जर अशी निदानं डॉक्टर चुकला, तर त्याच्या विरोधामध्ये ग्राहक न्यायालयात जाता येतं. यांपैकी कुठलीही कसोटी फलज्योतिषाने कधीही दिलेली नाही.

म्हणजे फलज्योतिषाला जर शास्त्र असल्याचा दावा करायचा असेल, तर त्याला असं म्हणावं लागेल की, 'आम्ही जे सांगतो, ते जर चुकलं, तर आमच्या ग्राहकांना आम्हाला ग्राहक न्यायालयामध्ये खेचण्याचा अधिकार आहे'. माझ्या माहितीप्रमाणे, इंग्लंडमध्ये अलीकडे भविष्य बघण्याचं फॅड वाढल्यामुळे लग्नाआधी पत्रिका बघून त्या जुळतात का नाही, हे ज्योतिषांनी सांगायला सुरुवात केली. त्याप्रमाणे लग्नं व्हायला लागली. लग्नं झाल्यानंतर लगेच घटस्फोट व्हायला

लागले. त्यामुळे ज्योतिषी खोटे ठरायला लागले. त्यानंतर असा कायदा करण्यात आला की, तुम्ही ज्याच्याकडे जाऊन भविष्य बघता आणि तुमचं लग्न सुखाचं होणार की नाही, हे जो तुम्हाला तुमच्या पत्रिका बघून सांगतो, त्याने स्वत:च्या ऑफिसवर 'ही कला केवळ मनोरंजनासाठी आहे', हे लिहिणं आवश्यक आहे. हे जर त्याने लिहिलं नाही आणि जर त्याने तुम्हाला सांगितलं की, 'तुमची ३६ गुणांची पत्रिका जमतीये, तुमचा संसार सुखाचा होईल' आणि प्रत्यक्षात मात्र वर्षभरात तुमचा घटस्फोट झाला, तर तुम्हाला ग्राहक न्यायालयामध्ये त्याच्यावर खटला भरता येऊ शकतो. ज्योतिषाला जे लोक शास्त्र म्हणतात, त्यांनी ही जबाबदारी स्वत:हून स्वीकारली पाहिजे. ज्योतिष हे शास्त्र आहे का नाही, याबद्दल परदेशामध्ये अनेक चाचण्या घेण्यात आलेल्या आहेत आणि त्यांपैकी सर्व चाचण्यांमध्ये 'फलज्योतिष' हे शास्त्र ठरण्यात नापास झालेलं आहे.

वास्तविक, परदेशातील उदाहरणं देण्याची गरज नाही. भारतामधली या स्वरूपाची पहिली चाचणी अंधश्रद्धा निर्मूलन समितीने घेतली. त्याच्यामध्ये ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर, आयुका ही खगोल शास्त्रावरची पुण्याची संस्था आणि पुणे विद्यापीठाचा संख्याशास्त्र (स्टॅटिस्टिक्स) विभाग हे तीनही घटक सहभागी होते. अगदी साधी कसोटी ठेवलेली होती. **१०० कुंडल्या मतिमंद मुलांच्या आणि १०० कुंडल्या उत्तम शाळेमधल्या, वर्गामध्ये सतत पहिल्या येणाऱ्या मुलांच्या जमवलेल्या होत्या. या सगळ्या मुलांच्या जन्माची अचूक वेळ त्यांच्या आईवडलांकडून घेतलेली होती. 'यांपैकी कुठल्याही १०० कुंडल्या आम्ही तुम्हाला देऊ. तुम्ही कितीही वेळ घ्या आणि यांपैकी कुठल्या कुंडल्या हुशार मुलांच्या आहेत आणि कुठल्या कुंडल्या मतिमंद मुलांच्या आहेत, एवढंच जर तुम्ही ८० टक्के अचूक सांगितलंत, तर फलज्योतिषाला शास्त्र म्हणून अधिक तपासणी करण्याला वाव आहे, असं आम्ही मानू',** असं आम्ही म्हटलं होतं. प्रत्यक्षामध्ये फार मोठ्या उत्साहाने आव्हान स्वीकारलंही गेलं नाही आणि ज्यांनी स्वीकारलं, ते साफ नापास झाले. सरासरी अनुमान धक्क्याने जी ५० टक्के उत्तरं बरोबर येतात, त्याच्या अलीकडे-पलीकडेदेखील त्यांची उत्तरं बरोबर आली नाहीत.

दुसरं एक आव्हान असं आहे - माणसं ज्योतिषाकडे कशाकरता जातात? स्वत:च्या जीवनातल्या घटनांची पूर्वसूचना मिळावी, अशी एक स्वाभाविक इच्छा माणसाला असते किंवा असं एक स्वाभाविक कुतूहल माणसाला असतं. 'माझं शिक्षण कधी होणार? माझं लग्न कधी होणार? माझा संसार सुखाचा होणार की नाही? मला मुलं किती होणार? माझी आर्थिक स्थिती कशी राहणार? परदेशगमनाची संधी आहे की नाही?', याच्यासाठीच जर माणसं ज्योतिषाकडे जात असतील, तर वय वर्षं ६० असलेल्या माणसांच्या पत्रिका जमा केल्या आणि त्यांच्या आधारे जर उलटा ताळा मांडून ज्योतिषाला सांगितलं की, 'तुम्ही फक्त या पाच-सहा प्रश्नांची उत्तरं द्या - या माणसाचं लग्नं झालेलं आहे का झालेलं नाही? याला मुलं आहेत की याला मुलं नाहीत? याला परदेशगमनाची संधी होती का नव्हती? याची आर्थिक स्थिती कशी आहे? याला कधी जीवघेणा अपघात झालेला आहे की नाही? तुम्ही या प्रश्नांची उत्तरं अचूक दिलीत, तरच ज्याच्यासाठी तुम्ही ज्योतिष हा धंदा करता, त्याला काहीतरी शास्त्रीय पाया आहे, असं मानण्यात येईल'. याही आव्हानाचा ज्योतिषांनी कधीही स्वीकार केलेला नाही. म्हणजे वर्ष-दीड वर्षापूर्वी महाराष्ट्रामध्ये विधानसभेच्या ज्या निवडणुका झाल्या, त्या विधानसभेच्या निवडणुकांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन समितीने २१ लाखांचं आव्हान ठेवलेलं होतं की, 'आम्ही तुम्हाला विविध उमेदवारांची वा पक्षांची नावं सांगतो - कारण ज्योतिषी पक्षाची कुंडली मांडतात आणि राष्ट्राचीही कुंडली मांडतात - कोण किती मतांनी निवडून येणार, हे तुम्ही आम्हाला सांगा'. हेही आव्हान स्वीकारण्याची हिंमत ज्योतिषांनी कधी दाखवली नाही.

मग फलज्योतिष हे काय आहे? एका शब्दात सांगायचं, तर फलज्योतिष ही स्वप्न विकण्याची कला आहे. आपल्यापैकी प्रत्येकाला स्वप्न विकत घ्यायला आवडतं.

वास्तविक, माणसाचं सगळं जीवन हे खरं म्हटलं तर त्याच्या कर्तृत्वावर उभं राहायला पाहिजे. म्हणजे कर्णाचं उदाहरण आपल्याला माहीत आहे. कर्ण द्रौपदीच्या स्वयंवराला गेलेला होता. खाली पाण्यामध्ये बघायचं होतं आणि वर फिरणाऱ्या माशाच्या डोळ्याचा वेध घ्यायचा होता. कर्णाने पाण्यामध्ये बघितलं, वर बाण सोडला; पण बाणाने माशाच्या डोळ्याचा वेध घेतला नाही. तो माशाच्या डोळ्याच्या बाजूला लागला, खरखरला आणि खाली पडला. त्या वेळेला द्रौपदी पटकन म्हणाली, ''बरं झालं बाई, सूतपुत्राला वरायचं टळलं!'' त्या वेळेला कर्णाने जे उत्तर दिलेले आहे, ते प्रख्यात आहे. कर्ण म्हणाला की, ''सूतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्याहम् दैवायत्ते कुले जन्मे मदायत्ते तु पौरुष'' - मी सूत आहे का सूतपुत्र आहे, हे मला माहीत नाही आणि ते माझ्या हातात नव्हतं, परंतु माझं कर्तृत्व, माझं पौरुष, माझं सामर्थ्य माझ्या हातामध्ये आहे. त्यांच्याबद्दल तू विचार; माझ्या जन्माबद्दल विचारू नकोस. याचाच अर्थ असा की, माझ्या जीवनात मला जे उभं करायचंय, त्याच्यासाठी आकाशातले ग्रहगोलतारे आणि चंद्रसूर्यवारे कुठे आहेत, याची बात करू नका. तो पांगुळगाडा मला देऊ नका. तो अशास्त्रीय आहे. तो निरुपयोगी आहे.

त्यामुळे 'फलज्योतिष हे शास्त्र नाहीच' किंवा 'फलज्योतिष हे थोतांड आहे', असं अंधश्रद्धा निर्मूलन समितीचं जे आव्हानपूर्वक म्हणणं आहे, याचं कारण म्हणजे, फलज्योतिष दैववाद रुजवतं, नशिबाची कल्पना उगवतं आणि परिवर्तन कुजवतं.

शब्दांकन : भाग्यश्री भागवत

(साधना साप्ताहिक १० जुलै २०२१ यांच्या सौजन्याने)

❖❖❖

# २५ वा तास

■ सीमा घंगाळे

भारतीय प्रादेशिक शब्दकोशात असलेला एक शब्द 'प्रिय',हा लॅटिन शब्दातील प्रिव्हस या शब्दापासून आलेला आहे. आपल्या सगळ्यांच्या डिक्शनरी मध्ये हा शब्द अत्यंत प्रिय आहे. प्रिय म्हणजे मित्र /सखा आणि प्रिव्हस म्हणजे असाधारण किंवा विलक्षण. अशी असाधारण प्रिय स्थिती/व्यक्ती, जिथे आपल्यावर कोणतेच obligations, burden, compulsion, अडथळे नाही. आपल्याकडील स्वातंत्र्याला इंग्लिशमध्ये तीन शब्द दिसतात: फ्रीडम, लिबर्टी, इंडिपेंडन्स आणि साहजिकच यांचे संदर्भही वेगळे. फ्रीडम चा मूळ शब्द फ्री आणि त्याचा मूळ आहे प्रिय. इंडिपेंडन्स म्हणजे परावलंबित्वपासून मुक्तता आणि लिबर्टी म्हणजे मुक्ती,-पॉवर टू बिलीव अँड एक्सप्रेस अँज वन चूझेस.... या तीनही स्थितीचा एकत्रित अर्थ म्हणजे कोणावरही अवलंबून न राहता आपल्याला हव्या असलेल्या प्रिय परिस्थितीत /व्यक्तीसोबत/समूहासोबत मुक्तपणे वागणे, राहणे, बोलणे आणि मुख्य म्हणजे विचार करणे.

येऊ घातलेल्या ७५व्या स्वातंत्र्यदिनी (इंडिपेंडेंस डे) या सगळ्या शब्दांचा पुन्हा एकदा विचार करावासा वाटतो. वरील प्रमाणे प्रिय स्थितीत भारतीय समाज मुक्तीचा आनंद घेतोय की फक्त फ्रीडम मूव्हमेंट करून तो ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून बाहेर आला आणि इंडिपेंडंट झाला? पण लिबरल होताना, होत असताना 'प्रिय' स्थितीचा बराच गोंधळ या भारतीय समाजाने करून टाकला. म्हणजेच मला असलेली प्रिय स्थिती माझ्या शेजारच्याला प्रिय असेलच असे नाही आणि यातूनच सुरू झाला एक नवा गोंधळ.... 'माझे आणि तुझे वेगवेगळे स्वातंत्र्य झाले'.

१९४७ ला आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य मग माझे आणि तुझे वेगवेगळं झालं. प्रत्येक जण स्वत:ची ही प्रिय स्थिती मिळवण्यासाठी, मिळवलेली टिकवून ठेवण्यासाठी चोवीस तास मेहनत करतो, धावपळ करतो, घाम गाळतो, कष्ट करतो आणि मग सुरू होतो तो **'पंचवीसावा तास'.**

भारतासाठीसुद्धा आणि भारतीय समाजासाठीसुद्धा प्रत्येकासाठी घाबरवणारा, मागे टाकणारा, गोंधळून टाकणाऱ्या पंचविसावा तास. भारताच्या सगळ्या प्रगत घटकांना/ माणसांना परत परत थकायला लावणारा हा पंचविसावा तास. आता हे कोणते घटक आणि कोणती माणसे .....

भारताचा स्वातंत्र्य लढा हा इतिहासातील देदीप्यमान आणि अभिमानास्पद असा. पंचाहत्तर वर्षापूर्वी खडतर स्वातंत्र्य चळवळीतून, अहिंसेच्या मार्गाने, क्रांतिकारी मार्गाने, इंग्रजी शिक्षणाच्या मार्गाने, सुधारणावादी चळवळीने, प्रतिगामीतत्त्व सोडून पुरोगामी विचारांमधून, संघ प्रेरणेने भारत इंग्रजांच्या गुलामगिरीतून बाहेर आला खरा पण मग सुरू झाला पंचविसावा तास.... फाळणीच्या रूपाने प्रचंड संघर्ष, हत्या, प्रेते ताटातूट आणि बेचिराख गावे आणि शहरे... नाही रोखू शकलो आपण ही निर्दयी कत्तल.

**मग लिहिलेली भारतीय राज्यघटना**

ही पूर्ण जगात नावाजली जाणारी राज्यघटना आणि बऱ्याच विकसित देशांनाही नाही जमली अशी समता आणि न्यायाच्या पायावर उभी राहिलेली लोकशाही. अतिशय तल्लख आणि बुद्धिमान

नेत्यांनी, समाजसुधारकांनी तयार केलेल्या या लोकशाही घडीचा भारताला फायदा झाला असता पण येथे सुरू झाला तो पंचविसावा तास. भ्रष्टाचार, लोकशाहीला वाकवून, सामान्य जनतेला फसवून, सत्ता केंद्रीय राजकारण करून भारत बिचारा आणि अगतिक होत जाणारा काळ.

ब्रिटिशांच्या बऱ्याच चांगल्या गोष्टींमधली उल्लेखनीय व्यवस्था म्हणजे न्यायव्यवस्था. लोकांसाठी इंडियन पिनल कोड आणि भारतीय कायदे तयार झाले. बरेच हुशार वकील, न्यायमूर्ती, न्यायाधीश मिळाले. येथून न्याय हा लोकांना भीतीतून बाहेर काढत होता पण दडपण्यासाठी हा वापरला जात नाही हेही पाहिले गेले. पण यातून परत श्रीमंतांसाठी न्याय आणि गरिबांसाठी तो अस्तित्वात नाही असा सुरू झाला पंचविसावा तास....

सधन, उच्चभ्रू समाजाने विकत घेतलेली न्यायव्यवस्था असा पंचवीसावा तास सुरू झाला आणि विकसित देशांच्या रांगेत जाऊ पाहणारा भारत हतबल झाला.

इंग्रजी शिक्षण ही आणखी एक मोठी क्रांती भारतीय समाजाने पाहिली. प्रादेशिक शाळांसोबत भरपूर इंग्रजी शाळा सुरू झाल्या. अनेक शिक्षणतज्ज्ञ झाले. प्रत्येकाचे योगदान भरीव होते. भारतीय शिक्षण प्रक्रियेत बरेच प्रयोग झाले. गरिबातल्या गरीब मुलांना शिक्षण मिळण्यासाठी भारतीय सरकार आणि भारतीय समाज प्रयत्नशील राहिला. आणि मग सुरू झाला तो पंचविसावा तास...ज्यात खूप मुले आजही शाळाबाह्य आहेत. वर्षानुवर्षे अशिक्षित अडाणी यातून गुन्हेगारी, बेकारी, गरिबी, नैराश्य, आत्महत्या वाढतच गेल्या. शिक्षणाअभावी फसवणूक, परावलंबित्व, अज्ञानातून मृत्यू आणि जगण्यास लायक नसलेले भयाण जीवनमान आधुनिक भारत पाहात आहे.

स्त्री शिक्षण ही एक मोठी देदीप्यमान क्रांती, भारतीय समाजाने करून, स्वत:ची पाठ थोपटून घेतली. हुंडाबळी, तसेच बालविवाह, विधवा/ परित्यक्ता /अंगवस्त्र जीवन यातून शिक्षणाने भारतीय स्त्रीला बाहेर काढले. स्त्री शिकली, सवरली, सावरली... नुसतीच अक्षर ओळख नाही तर आपली प्रज्ञा तिने कुटुंबासाठी, मुलांसाठी आणि सकल समाजासाठी, प्रगतीसाठी उपयोगात आणली. सगळ्याच क्षेत्रात कौशल्य आत्मसात करून तिने आधुनिक समाज बांधणीत महत्त्वपूर्ण आणि मानाचे योगदान दिले. तरीही सुरू झाला तो जीवघेणा पंचविसावा तास... पितृसत्ताक भारतीय समाजाने मग बाहेर पडलेल्या बुद्धिमान स्त्रीची चौफेर कोंडी सुरू केली. स्त्री स्वातंत्र्य म्हणून त्या स्वातंत्र्याच्या नाड्या आपल्या हातात ठेवून तिला सतत नवऱ्याच्या परवानगीने वागणारी उच्चशिक्षित हुशार दासी बनवून टाकले. आपल्यापेक्षा वरचढ ठरणारी बाई प्रसंगी जाळून टाकण्यात आली, ठेचून टाकली गेली, पोटातच मारली जाऊ लागली, जन्मत:च फेकून दिली जाऊ लागली आणि भारतीय स्त्रीच्या आयुष्यातील हा पितृसत्ताक पंचविसावा तास वेगळ्या वेगळ्या ठिकाणी वेगवेगळी रूपे घेऊन अजूनही कर्दनकाळ ठरतो आहे.

भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला, कारण आर्थिक स्थिती चांगली असलेला देशच विकसित देशांच्या पंक्तीत जाऊन बसू शकतो. उद्योग-व्यवसायात देखणी प्रगती करून सरकारी आणि खाजगी उद्योग धंद्यात बाजी मारली. विदेशी गुंतवणुकीला जागा दिली. आधुनिक जीवनशैली आणि चकचकीत स्वप्नांची नगरी तयार झाली. औद्योगिकरण होऊन दळणवळण, वाहतूक, संरक्षण, पर्यटन इत्यादी क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती स्वातंत्र्योतर आधुनिक भारताने केली. २४ तास घोडदौड करणारा औद्योगिक भारत परत पंचविसाव्या तासात दमून मान टाकू लागला आणि या पंचविसाव्या तासात भांडवलदारांचा आजारी समाज तयार झाला. जो फक्त स्वत:ची काळजी करू लागला. पैशाच्या जोरावर विकत घेतलेल्या रेडिमेड सुख-दुःखांवर जगू लागला. आणि खोट्या आशावादांवर जगू लागला. म्हणूनच या पंचविसाव्या तासाने भारताचे अति गरीब आणि अति गर्भश्रीमंत असे दोन चेहरे करून ठेवले.

स्वातंत्र्याची ७५ वर्षे आनंदाने उपभोग घेणारा भारत वैद्यकीय क्षेत्रात सुदृढ प्रगती करू लागला. उच्चशिक्षित डॉक्टरांपासून आधुनिक उपकरणांनी सुसज्ज असलेले इस्पितळे, गरिबांसाठी जिल्हा रुग्णालय आणि लस तयार करणाऱ्या कंपन्या, मनुष्याला वाचविणाऱ्या, आयुर्मान वाढविणाऱ्या वैद्यकीय सुविधा अशी दृष्ट लागेल, असे वैद्यकीय प्रगती भारताने केली. असे म्हणतात दर शतकाच्या विसाव्या वर्षी जीवघेण्या रोगाची साथ येते १७२०,१८२०,१९२० आणि आता २०२०. पण देदीदिप्यमान प्रगत वैद्यकीय व्यवस्था २०२० च्या साथीच्या रोगात पूर्णपणे कोलमडून पडली .तोच हा फिरून फिरून येणारा पंचविसावा तास. २४ तास धडपड करून सुखी होण्याच्या स्वप्नात असतानाच तो आला. निर्मळ प्रवाह आणि आयुष्य त्याने गढूळ करून थांबवून टाकले.

भारताची लोकसंख्या ही एक प्रकारे भारताची मानवी संपत्ती आहे नैसर्गिक साधनसंपत्ती मुबलक असूनही मानवी संपत्ती नसल्याने नैराश्याने वेढलेले देशही या जगात आहेत. त्यामुळे या संपत्तीला योग्य प्रकारे प्रशिक्षित करून समाज आपली समूहभावना तर वाढवतोच पण संघ भावनेने प्रेरित होऊन आपली एक समग्र प्रतिमा तयार करतो. पण इथेही त्या प्रतिमेचा पंचविसावा तास सुरू होतो. असे म्हणतात भारताच्या सर्व समस्यांचे मूळ या फुगत चाललेल्या

लोकसंख्येत आहे कारण लोकसंख्येचे उत्पादनक्षम मनुष्यबळात रूपांतर होण्यासाठी या समाजाने अजूनही योग्य धोरणे तयार केली नाहीत. पंचविसाव्या तासात त्याची बरीच अक्राळविक्राळ कारणे आणि परिणाम दिसतात. विवाहयोग्य वय, लैंगिक शिक्षण, गरिबी, बेरोजगारी, लग्न संस्थेचा मूळ उद्देश, प्रजननाचा मूळ उद्देश, शिक्षणाचा अभाव, पितृसत्ताक विचारसरणी, मुलींच्या शिक्षणाचा अभाव, लैंगिक आणि प्रजननाच्या बाबतीत असलेल्या ज्ञानाचा अभाव, या विषयांभोवती असलेल्या अंधश्रद्धा किंवा विकृती आणि या असंख्य संघर्षांना हा पंचवीसावा तास जन्म देत असतो. आता तर वर्क फोर्स कमी होतोय म्हणजे राष्ट्र उभारणीसाठी लागणारा तरुणवर्ग कमी झालाच आणि वृद्धांची संख्या वाढत आहे, असाही एक दुसऱ्या टोकाचा संघर्ष.

भारताने दूरसंचार क्षेत्रात प्रगती करून भारताला संपूर्ण जगाशी जोडले. आज बोटाच्या एका क्लिकवर जगातील दुसऱ्या टोकाच्या व्यक्तीशी संवाद साधता येतो. याच प्रगतीमुळे या साथीच्या परिस्थितीत लोक घरातून काम करून घरे चालवू शकले. मुले शाळा शिकू शकली, मनोरंजन /करमणूक होऊनही नैराश्याच्या गर्तेतून दूर राहू लागली. मनुष्य घरातूनच अभ्यास करून ज्ञानी होऊ लागला, ज्ञानासाठी देशोदेशीची भटकंती थांबली, आधुनिक तंत्रज्ञानाने उद्योगांना भरारी तर दिलीच पण जीवनशैलीही सुधारली, दुरावलेले मित्र / नातेवाईक यांची चौकशी सुरू झाली, सणवारांना भेट नाही पण निरोप पाठवता येऊ लागले, दूर असलेल्या नातवंडांबरोबर, आई-वडिलांबरोबर, भावंडांबरोबर डिजिटल दिवाळी, पाडवा, होळी साजरी होऊ लागली, लग्न समारंभ ही डिजिटल होऊ लागले. कधी स्वप्नातही अनुभवली नाही अशी वास्तवात उभी राहिलेला कनेक्टेड अनुभूती आणि मग परत सतत येणारा तो पंचविसावा तास. या तासाने या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रचंड मोठा ओव्हरलोड दाखविला. संगणक /मोबाईल यात गुंतत चाललेली माणसे, सतत आभासी विश्वात राहून वास्तवापासून दूर चाललेली जनता, जन्माला आल्यापासून मरेपर्यंत पूर्ण आयुष्यावर या आभासी तंत्रज्ञानाने ताबा घेतला, नाही आपणच त्याच्या हळुवार ताब्यात गेलो. कोणत्याही वयाचा मनुष्य याला अपवाद नाही. या समाजमाध्यमातील आभासी दुनियेने भारतीय तरुणाला तरुण वर्क फोर्सला अक्षरश: बधिर करून टाकले. लाईकच्या प्रसादावर जगणारी ही पिढी वाचन, विचार, छंद, लेखन, परोपकार, मदत, शोधक वृत्ती, संशोधन, सकारात्मकता, सहिष्णुता, सहानुभूती, समूह भावना, समता, बंधुता या सगळ्या मूल्यांना विसरले.

स्वातंत्र्योत्तर भारताने विविध धर्मातील लोकांच्या भावनांचा आदर करून धार्मिकता आणि धार्मिक आदर्शवादाचा पुरस्कार केला. त्यामुळे सर्वधर्मसमभाव दाखविण्यास विविध धर्मीय भारतीय समाजाचे जगात कौतुकच होत राहिले. भारत हा धार्मिक आणि धर्मपरायण देश म्हणून उदयास आला. धार्मिक सहिष्णुतेला राष्ट्रवादाच्या अस्तित्वाचा मुख्य गाभा मानले जाऊ लागले. खरेखुरे भारतीय होण्यासाठी सर्व धर्मांचा आदर करणे अतिशय महत्त्वाचे मानले जाऊ लागले.

आता या इतक्या आदर्शवादी आणि ईश्वरी या परिस्थितीत पंचविसावा तास येण्याचे काहीच कारण नाही. पण याच धार्मिकतेत तो पंचविसावा तास कर्दनकाळ ठरला. धार्मिक मतभिन्नता, पुढे जातीयवाद, धर्माच्या नावाखाली अबला दुर्बलांना अजूनच छळणे. दंगली, कत्तली घडविणे, आपण विरुद्ध ते असे प्रक्षोभक वातावरण पसरविणे, स्वत:च्या धार्मिक भावना कशावरून ही मुद्दाम दुखावून घेऊन अशांतता पसरविणे, अंधश्रद्धेला धार्मिकतेचे गोंडस नाव देऊन उच्चशिक्षित लोकांनाही नामोहरम करणे, गर्भश्रीमंत संत-महात्मे/ बाबा /आश्रम तयार करून जनतेला खुळे बनविणे, वर्किंग कॅपिटल असलेल्या तरुण समाजाला अध्यात्माचे खोटे धडे देऊन निरुद्योगी करणे, युवकांना भडकावून राजे-महाराजे नेत्यांचे दाखले देऊन बेरोजगारीत ढकलणे, या पंचविसाव्या तासाचे हे अतिशय भीषण आणि न तोडता येणारे चक्रव्यूह आहेत.

या २०२० सालात आलेल्या साथीने दाखवून दिले की आधुनिक स्वतंत्र भारताला साथीला सामोरे जाण्याचे कोणतेच प्रशिक्षण नाही. अन्न व पायाभूत सुविधांपासून ते उद्योग-व्यवसाय पर्यंत काहीही स्थिर नाही. भारतीय समाजाचे सामाजिक भांडवलच कमी असल्यामुळे वायरसपेक्षा (विषाणूपेक्षा) पंचविसाव्या तासाला घाबरून होणारे मृत्यू जास्त आहेत.

म्हणूनच दुसऱ्या महायुद्धाच्या काळात निराश्रित म्हणून राहिलेल्या वीरजिल जोरजिड या रोमानियन कादंबरीकाराने लिहिलेल्या द ट्वेंटी फिफ्‌त अवर या कादंबरीचे शीर्षक आजही समर्पक वाटते. १९६७ मध्ये याच कादंबरीच्या आधाराने याच नावाची एक फिल्मही आली होती.

आपल्या ओळखीचे दिवसाचे चोवीस तास पूर्ण झाले की हा पूर्णपणे अनोळखी आणि भीषण असा पंचविसावा तास सुरू होतो जो माणसाला त्रस्त, संशयी, भयग्रस्त बनवतो आणि म्हणूनच स्वार्थांध होत चाललेला समाज शिक्षण, वैद्यकीय प्रगती, संशोधन, औद्योगिकीकरण असूनसुद्धा स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर ही विकसित होऊ शकलेला नाही. पंचविसाव्या तासापासून वाचू पाहणारा स्वकेंद्री आणि आत्ममग्न भारतीय समाज जोपर्यंत या भीतीतून बाहेर येत नाही तोपर्यंत खऱ्या स्वातंत्र्याची पहाट भारतीय समाज पाहू शकत नाही.

❖❖❖

# भारतीय संविधानाचे तत्वज्ञान

■ डॉ. प्रवीण घोडेस्वार

अहिंसा, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता या तत्त्वांवर आधारित स्वातंत्र्य संग्रामाचा ऐतिहासिक वारसा भारतीय संविधानाला लाभला आहे. १९५० मध्ये जेव्हा संविधान अमलात आले तेव्हा ते विश्वात समान कायदा असलेल्या देशांमधले फक्त तिसरे लिखित संविधान होते. संविधान तयार करण्यासाठी १९४६ मध्ये घटना समितीची स्थापना करण्यात आली. डॉक्टर राजेंद्र प्रसाद हे या समितीचे आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मसुदा समितीचे अध्यक्ष होते. तीन वर्षांच्या अथक परिश्रमातून बाबासाहेबांनी संविधान शिल्प साकारले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधानाला अधिकृतपणे स्वीकृती देण्यात आली. यास्तव हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तर संविधानाची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून सुरू झाली म्हणून हा आपला प्रजासत्ताक दिवस.

भारतीय संविधान २२ भाग, ३९५ कलमे आणि १२ परिशिष्टे यात विभागलेले आहे. संविधानाचा सरनामा, मूलभूत हक्क आणि राज्यांच्या धोरणाबाबत मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे संविधानाचा गाभा होय. **सर्व मानवप्राणी जन्मतःच मुक्त आणि समान आहेत, हाच संविधानाचा शाश्वत संदेश आहे.** इंग्रजीतल्या preamble या शब्दाचा पर्यायी शब्द म्हणून 'सरनामा' म्हटले जाते. **हा सरनामा पुढील प्रमाणे- आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांसः सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य; दर्जाची व संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून; आमच्या संविधानसभेत आज २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करत आहोत.''**

संविधानाचा सरनामा हा संविधानाचे मूलभूत तत्त्वज्ञान विशद करणारा आहे. ''आम्ही, भारताचे लोक करतात.'' हे सरनाम्यातले शब्द भारत सरकारचे अधिकार लोकांपासून प्राप्त होतात असे स्पष्ट करतात. केंद्र तसेच राज्य सरकारना भारतीय जनतेने ताकद दिली असल्याचे दर्शवते. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, ऐक्य आणि राष्ट्राची अखंडता या मूल्यांना सोबत घेऊनच देशाला सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक घडवणे अभिप्रेत आहे. सरनाम्यात संविधान कधी तयार झाले याचा उल्लेख आहे. **याचा अर्थ असा की सरनामा फक्त संविधानाचा परिचय नसून संपूर्ण संविधानाचा सारांश आहे.**

आज भारतात स्त्रिया-दलित-आदिवासी यांच्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांचे प्रमाण कमालीचे वाढलेले दिसत आहे. शासन नावाची यंत्रणा कायद्याचा वापर करून दोषींना कडक शिक्षा देऊ अशा वल्गना करते. पण प्रत्यक्षात मात्र तसे होताना दिसत नाहीये. अन्याय-अत्याचाराच्या घटना सातत्याने घडताहेत. या अन्याय-अत्याचाराचे मूळ विषमतामूलक चातुर्वर्ण्य रचनेत आहे. आर्थिक, राजकीय रचनेत आहे. पण यावर विचारमंथन होत नाहीये. जातीय

उतरंडीमुळे स्त्रिया-दलित-मागासवर्गीय-आदिवासी यांना समाजात दुय्यम स्थान दिले जाते. सध्याचा राजकीय आणि सामाजिक माहोल पाहता ही शोषणाची रचना पुन्हा एकदा मजबूत करण्याची योजना आखली जात असल्याची भीती जाणवत आहे. समाजातल्या एका विशिष्ट घटकाने संविधानाला स्वीकारलेले नाहीये. त्यांनी समतेवर आधारित संविधान हटवून चातुर्वर्णीय रचना पुन्हा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू केलेला आहे. कधी नव्हे ते संविधानाचे तत्त्वज्ञान जनमानसात पोहोचवण्याची निकड निर्माण झाली आहे.

आम्ही भारताचे लोक, या वाक्याने सुरु होणाऱ्या संविधानाच्या सरनाम्यातले स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायाची सांविधानिक संस्कृती जनमानसात रुजवण्याची अतोनात आवश्यकता आहे. त्याशिवाय अन्याय-अत्याचार थांबणार नाहीत. संविधानातले समतेचे व न्यायाचे तत्त्वज्ञान स्वीकारलेला समाज अन्याय-अत्याचार करणार नाही आणि करूही देणार नाही. यासाठीच संविधान संकृतीची जोपासना, अंगीकार, आदर आणि संवर्धन करण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे. यातूनच मानवी हक्कांची जपणूक होऊन मानवाचे कल्याण साधता येईल. हेच साध्य करण्यात अपयश आल्याने लोकशाहीतल्या यंत्रणा आणि राज्यकर्ते संविधान मूल्यांबाबत संवेदनशील झाले नाहीत, हे आपले दुर्दैव!

देशातल्या पीडित-शोषित-वंचित-स्त्रिया-बालक-दलित-आदिवासी समूहाला जीवन सोपे-सरळ-समाधानाचे-सन्मानाचे-स्वाभिमानाचे जगणे जगता येणे म्हणजे संविधानाचे तत्त्वज्ञान अंगीकारणे! न्यायपालिका, विधिमंडळ, कार्यकारी मंडळ आणि मीडिया या लोकशाहीच्या आधारस्तंभांनी एकत्र येऊन विचार मंथन करून परिणामकारक उपाययोजना करणे, ही काळाची गरज आहे. संविधानाने दिलेली स्वायत्तता आणि आपल्या अधिकारक्षेत्राची मर्यादा न ओलांडता देशाच्या भल्यासाठी आणि सर्वसामान्यांच्या उद्धारासाठी समन्वय साधून काम करण्याची गरज आहे. संविधान सभेत २५ नोव्हेंबर १९४९ रोजी केलेल्या भाषणात बाबासाहेब म्हणाले होते, ''राज्यघटना कितीही चांगली असली तरी अमलात आणणारी मंडळी जर वाईट असतील तर तिची फलनिष्पत्ती निश्चितच वाईट होईल. मात्र घटना कितीही वाईट असली तरी ती राबवणारी माणसे चांगले असतील तर ती घटना नक्कीच चांगली ठरेल.''

भारतीय संविधानाचे जगभरात कौतुक केले जाते. एक आदर्श संविधान म्हणून वाखाणणी करण्यात येते. संविधानाच्या संरचेनेमुळेच संधी आणि सत्ता प्राप्त झाली अशी कबुली दिली जाते. आमच्या जडण-घडणीत संविधानाचा मोठा वाटा असल्याचे सांगितले जाते. राजकीय-सामाजिक नेते-कार्यकर्ते, बुद्धीजीवी वर्ग, माध्यमकर्मी, विचारवंत, सनदी अधिकारी, विधीतज्ज्ञ सारेच संविधानाची थोरवी वेळोवेळी गात असतात. पण काही सन्माननीय अपवाद वगळता ज्यांच्यावर संविधानाच्या ध्येय धोरणानुसार आचरण करण्याची कायेदशीर आणि नैतिक जबाबदारी आहे ते मात्र तसे वागताना दुर्दैवाने दिसत नाहीत! संविधानाबाबत ही माणसे आणि त्यांच्या यंत्रणा फारशा संवेदनशील नसल्यामुळेच स्त्रिया-मागासवर्गीय-दलित-आदिवासी यांच्यावरचे अन्याय-अत्याचार वाढत आहेत,असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. यासाठीच ह्या सर्व घटकांचे-यंत्रणाचे सामाजिक लेखापरीक्षण अर्थात social audit होणे आवश्यक आहे. ''संविधानात काही असेल अथवा नसेल, संविधान काही सांगेल अथवा नाही, देशाचे कल्याण या देशाचे शासन-प्रशासन कशा प्रकारे केले जाते यावर निर्भर असेल तसेच या यंत्रणेतली माणसे कोण व कशी आहेत त्यावर अधिक अवलंबून आहे.'', असे मत संविधान समितीचे अध्यक्ष डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांनी व्यक्त केले होते. यावरून लोकांच्या जीवनात परिवर्तन आणण्यासाठी प्रशाकीय सेवा महत्त्वाची आहे, हे स्पष्ट होते.

प्रशासनात आणि राजकारणात असणाऱ्या लोकांचे वर्तन सर्वसामान्य जनतेशी बांधिलकी असणारे नसते. आपण कोणीतरी श्रेष्ठ आहोत अशी त्यांची भावना असते. जनता आणि ह्या यंत्रणा यांच्यात संवाद-समन्वय-सलोखा आढळत नाही. म्हणून लोकांच्या मनात याविषयी राग आहे. तळागाळातला हा समाज आजच्या परिस्थितीने निराश झालेला आहे. Greatness is not found in Possession, Power, Position or People. It is discovered in Goodness, Humanity and Character, असे बाबासाहेबांनी म्हटले आहे. यावरून अधिकार यंत्रणांकडून बाबासाहेबांच्या काय अपेक्षा होत्या हे ध्यानात येते. आपल्या यंत्रणांनी संविधानाचे तत्त्वज्ञान मनापासून स्वीकारल्यास खूप सकारात्मक बदल घडून येतील. पीडितांना दिलासा मिळेल. सामाजिक अन्याय-अत्याचार कमी होतील. लोकांचा लोकशाही मूल्यांवरचा विश्वास दृढ होण्यास मदत होईल. अधिकाऱ्यांना सरंजामी वृत्तीचा त्याग करून संविधान संस्कृतीचा अंगीकार करायला लागेल. हुजरेगिरी, चाटुगिरी, स्वार्थ, गुलामगिरी आणि भ्रष्टाचाराच्या मनोवृत्तीला तिलांजली द्यायला लागेल. संविधानातल्या मूल्यांशी एकनिष्ठ राहूनच समानता प्रस्थापित करता येईल. देशाला विकासाच्या मार्गावर नेण्यासाठी, देशाची राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करण्यासाठी आणि समतामूलक समाजाचे स्वप्न साकारण्यासाठी सर्वांनीच आपल्या व्यक्तिगत तसेच सार्वजनिक जीवनात संविधान तत्त्वज्ञानाचा स्वीकार करण्याशिवाय तरणोपाय नाही हे विसरता कामा नये!

(लेखक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेत सहयोगी प्राध्यापक आहेत.)

❖❖❖

# समानता, समता बंधूभावाचे स्वप्न कधी पूर्ण होईल?

■ साहेबराव ठाणगे -९८२००९३८६७

'लिंकनची लोकशाही लिकेज' जगातले सर्वधर्म, धर्मसंस्थापक, त्या धर्मातील संत-महात्मे, समाजसुधारक, सामाजिक कार्यकर्ते, आणि सद्सद्विवेकबुद्धी शाबूत असलेली सर्वसाधारण माणसं, मानवतेसाठी माणसामाणसातील समतेसाठी आणि माणसांमधील बंधू भावासाठी सदैव प्रयत्नशील राहिली आहेत .या सर्वांच्या हजारो वर्षाच्या अथक प्रयत्नानंतरही त्यांना फार यश आले आहे, असे खात्रीपूर्वक म्हणता येत नाही. 'जो जे वांछील तो ते लाहो प्राणीजात'असं केवळ मानवच नव्हे तर समस्त प्राणिमात्रांसाठी पसायदान मागणाऱ्या ज्ञानेश्वर माऊली किंवा 'हेचि दान देगा देवा तुझा विसर न व्हावा',असे जगावेगळे दान मागणारे संत तुकाराम महाराज आणि त्यानंतर 'या भारतात बंधुभाव नित्य वसु दे वर ची दे ',असा वर मागणाऱ्या साने गुरुजीपर्यंत सर्वांनीच मानव कल्याणासाठी वेगवेगळ्या प्रकारे वर किंवा पसायदान मागितले आहे .परंतु आपला हा महान भारत देश 'तमाशाने बिघडला नाही आणि कीर्तनाने सुधारला नाही', हे आपण चांगलेच जाणून आहोत. मोगल आणि त्यानंतर आलेल्या इंग्रजांच्या शेकडो वर्षाच्या पारतंत्राखाली राहिल्यानंतरही,'ना मोगल आम्हाला बिघडवू शकले ना इंग्रज अम्हाला सुधारू शकले' असे आपण म्हणू शकतो. आज आपण स्वातंत्र्याच्या पाऊणशे वर्षाच्या टप्प्यावर असूनही, आपला देश फार प्रगती करू शकलेला नाही. तथापि 'जगात सर्वात मोठी लोकशाही'असे एक बिरुद मात्र आपण अभिमानपूर्वक मिरवत आहोत आणि वेळप्रसंगी 'नखावरची शाई तेवढीच आमची लोकशाही' असं आपणच आपल्या लोकशाहीचे अवमूल्यनही करतो आहोत.

'लोकांचे, लोकांसाठी, लोकांनी चालवलेले राज्य' अशी लोकशाहीची सरळ सोपी व्याख्या अब्राहम लिंकन यांनी करून समस्त मानव जातीच्या तोंडाला अलगद मधाचं बोट लावून ठेवले आहे. हे लिंकन साहेब आपल्याला पहिल्यांदा भेटतात, इतिहासाच्या पुस्तकात फुल हुंग नाऱ्या, वाकड मान्या बादशहांची चित्रे पाहता पाहता आणि मोहनजोदारो हडप्पाचे डिगारे उपसता उपसता, अलगद औद्योगिक क्रांती होते आणि जगाच्या विकासाची चाके वेगाने फिरू लागतात. इतिहासाची पाने उलटता उलटता डोक्यावर आणि दाढीवर भरपूर वाढलेले काळे केस व काळा कोट आणि त्यातून कवडशाएवढ्या शाम वर्ण चेहऱ्याचे अब्राहम लिंकन,यांच्या चित्राचे पान पुढ्यात येते. इंग्रजीत सहीही करू न शकणारे, इतिहासाचे गावरान गुरुजी एकदम, 'ऑल द पीपल, फॉर द पीपल,बाय द पीपल' असं भारदस्त इंग्रजी वाक्य एका दमात फेकून, चौथी क च्या वर्गाचा एका फटक्यात 'एफवाय क्लास 'करून टाकतात वर्गातली सगळी भांबावलेली पोरं फळ्याच्या पार्श्वभूमीवर उठून दिसणाऱ्या गुरुजींच्या घामाघूम चेहऱ्याकडे अचंब्याने आ बसून पाहात राहतात. गुरुजी ही मग मोठं ओझं डोक्यावरून उतरल्यासारखे डोक्यावरची टोपी काढून टेबलावर टाकतात आणि अमळ दमही टाकतात. मूळ इंग्रजीतील, लोकशाहीची ही व्याख्या, एका दमात तोंडाबाहेर टाकायला गुरुजींची बरीच दमछाक झालेली असते पण गुरुजी लगेच सावरतात आणि पुन्हा मायबोलीत मोकळेपणाने वावरतात. ह्या अब्राहम लिंकन साहेबांनी लोकशाहीच्या व्याख्येत 'लोक'असा जो मानव

सदृश्य शब्द वापरला आहे, त्याची काही केल्या लिंक लागत नाही पण, गुरुजी वस्ताद ते लोकशाहीची व्याख्या आणखी सोपी करण्यासाठी वर्गाला उगाचच्या उगाच इतिहासातून काढून नागरिक शास्त्रात घुसवतात. डस्टरने खसाखसा फळा पुसून हातावर जादू मंतर टाइप फुंकर घालतात आणि अतिशय तन्मयतेने फळ्यावर आडव्या रेषा, आडव्याच्या मधोमध उभ्या रेषा आणि लोक म्हणजेच मतदार ते राष्ट्रपती असा लोकशाहीचा मोठा अँटेना साकारतात. गुरुजी करतात म्हणून पोरं ही आपल्या पाटीवर, वहीत तशीच सापशिडी रेखाटतात. पण या एवढ्या मोठ्या शिडीने इतक्यावर कसं पोहोचायचं? ह्याचा मनातल्या मनात, उलटसुलट विचार करीत राहतात. आणि भाषेच्या पेपरात 'मी राष्ट्रपती झालो तर' या विषयावर निबंध लिहावा लागल्यास ही शिडी चढावीच लागेल असा विचार करून आणखीन बावरतात. खरंतर, लोकशाहीची ही व्याख्या करताना देशाच्या सर्व नागरिकांमध्ये समानता, समता आणि बंधुभाव निर्माण व्हावा, तो कायम राहावा अशीच अपेक्षा लोकशाहीची व्याख्या करताना लिंकन साहेबांनी केली असणार. परंतु आता इतक्या वर्षांच्या काळात, इतके पाणी पुलावरून आणि पुलाखालून गेल्यानंतर, त्या व्याख्येप्रमाणे लोकशाहीचे काय चालले आहे, कसे चालले आहे, हे पाहणे महत्त्वाचे आहे. वस्तुस्थिती काय आहे, हे पाहायचे म्हटले तर, अगदी आपल्या या भारत देशातील पाहूया. वळवाच्या पावसासारखी निवडणूक घोंगावत येते. पाणवाऱ्यातल्या पाचोळ्याप्रमाणे प्रचाराचे फलक फडफडत राहतात. घराघराच्या भिंती नव्या नवरीसारख्या रंगाने रंगून जातात. आपल्याला, अजिबात माहीत नसलेले तरी, आपल्या सर्वांचे लाडके उमेदवार भिंती भिंतीवरून हात दाखवायला लागतात.

पदवी प्रमाणपत्रांच्या भेंडोळ्या ट्रंकेच्या तळाशी सुरक्षित ठेवून, उच्चशिक्षित असूनही पूर्णपणे बेकार असलेला समस्त तरुण वर्ग घड्याळाच्या काट्याला लोंबकळत सुटलेला काही शूर सैनिक, हातात पुठ्ठ्याचे धनुष्यबाण घेऊन सिंह गर्जना करीत गाव ना फिरत राहतात. वेड्या बाभळीच्या रस्त्यांमधून मोटारी भन्नाट पळत सुटतात. फुकटखाऊ प्रचारक, पुढाऱ्यांच्या वाढत्या गिऱ्हाईकाच्या वाढत्या रेट्याने, धाब्यावाल्यांचे धाबे दणाणते. रानात, मळ्यात आणि अगदी आडरानातही, पुढारी बगळे घिरट्या घालायला लागतात. गरिबांच्या मोडक्या छपरात सफारीधारक, घरच्यासारखे मांडी घालून बसतात. म्हाताऱ्या-कोताऱ्यांकडे पाहून मधाळ हसतात. गरीब बापड्या कष्टकऱ्यांचा जीव हरखून जातो. गावागावात वाडी वाडी वर, लहानसान झोपड्यांच्या वस्तीवर हे पुढारी सभा घेतात गरिबांच्या वैराण आयुष्यात आश्वासनांचा पाऊस पाडतात. बायाबापड्या डोक्यावर पाण्याने भरलेले तीन-तीन हंडे घेऊन, पारावरची सभा ऐकत थांबतात 'बया..या इलेक्शनची धांदल चाललीये जणू', म्हणून घराकडे वळतात. शाळेतून सुटलेली पोरंसोरं पुढाऱ्यांच्या जीप गाड्या भोवती फिरत राहतात. प्रचाराच्या वावटळीत फिरत राहतात. लोकशाहीतील तळागाळातल्या लोकांना सर्वच पुढाऱ्यांनी सांगितलेल्या सगळ्या गोष्टी पटतातही. योजना, नियोजन, विकास असले आश्वासक शब्द ऐकून, गरीब कष्टकरी माणसे, क्षणभर सुखावतात. प्रचाराचा पूर ओसरतो आणि मतदानाचा दिवस उजाडतो. घराघरातून माणसं बाहेर काढली जातात. मळ्यातून, दऱ्याखोऱ्यातून माणसांना, खास गाड्या पाठवून आणले जाते. म्हाताऱ्या मतदारांची तर एकदम 'ठेप' ठेवली जाते. इतर वेळी,' च्यायला ही म्हातारी उलथत का नाही', म्हणून करवदणारी माणसं, त्यांना अगदी मोटार गाडीतून घेऊन जातात आणि त्यांच्या मताचे दान पदरात पाडून पुन्हा जिथून आणलं तिथं नेऊन टाकतात. चुकलं -माकलं मेंढरू जसं, जिकिरीन शोधलं जातं अगदी तशी शोधाशोध करून, मतदार हुडकले जातात. इतर वेळी खिजगणतीतही नसलेली माणसं, आत्मियतेने ओळखली जातात. जी हयात नाहीत, त्यांनाही जिवंत माणसाच्या रूपानं पुन्हा मतदानासाठी पाचारण केले जाते. त्या दिवशी गावं, खेडीपाडी, वाड्यावस्त्या पुन्हा जिवंत होऊन उठतात, मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य सर्वांच्या हातून, पुढाऱ्यांना पाहिजेत तसं पद्धतीने पार पाडून घेतले जाते मात्र शिकून सवरून शहाणी झालेली, शहरातून मोटारी, बस, लोकलमधून कामावर जाणारी बुद्धिवादी मंडळी या काळात तावातावानं आणि अधिकारवाणीने राजकारणाच्या गप्पा करतात. आकडेवारीसह हा पक्ष जिंकेल, त्या पक्षाची पार वाट लागेल, अशा घोषणा करतात. एकमेकांशी पैजा मारतात. तासन्‌तास वादावादी करतात. लोकलमध्ये, बसमध्ये, कार्यालयात, हॉटेलात, बारमध्ये असेल तिथे निवडणुकीच्या निकालाविषयी सदैव चर्चा करीत राहतात. मात्र, मतदानाच्या दिवशी सरकारने जाहीर केलेल्या सुट्टीचा फायदा घेऊन सरळ पिकनिकला निघून जातात. नाहीतर 'सगळे साले चोर आहेत', 'एकही पक्ष, उमेदवार लायकीचा नाही' म्हणून त्या दिवशी, संध्याकाळपर्यंत घराच्या बाहेरच पडत नाहीत.

संध्याकाळी पाय मोकळे करण्यासाठी बाहेर पडतात तर, सगळी वाईन शॉप आणि बार बंद ठेवल्याबद्दल, सरकारला शिव्या शापही देतात. आणि 'आपण त्या गावचेच नाही' असा सोईस्कर समज करून घेऊन सरळ झोपून जातात. मात्र दुसऱ्या दिवशी पुन्हा निवडणुकीच्या निकालाविषयी अंदाज वर्तवावयाला सुरुवात करतात. निवडणुकीचे निकाल ऐकून, 'काही नाही हो, या लोकांना झोपडपट्टीतली

एकगठ्ठा मतं मिळतात, म्हणून ते जिंकतात' असं म्हणून पुन्हा लोकशाहीच्या नावाने शिव्या देत राहतात. मला वाटतं हे शिकून-सवरून शहाणे झालेले अतिशहाणे म्हणजेच त्या लिंकन महाशयांच्या लोकशाहीतील 'लोक' असावेत. हे असं सगळं लोकशाहीचं, त्यातल्या निवडणुकांचे, एकूणच, स्वार्थपरायण, 'पैसा फेको', बाजारू रूप पाहिल्यानंतर, लोकशाहीला हेच अपेक्षित होते काय? असा प्रश्न पडल्याशिवाय राहात नाही. ज्येष्ठ कवी, विठ्ठल वाघ यांच्या कवितेच्या या ओळी, किती नेमक्या शब्दात हे सत्य सांगतात..' **आम्ही मेंढरं मेंढरं यावं त्यानं हाकलावं, पाच वर्षांच्या बोलीनं, होतो आमचा लिलाव.**' पण मुळात लोकशाहीची गरजच का निर्माण झाली. चांगली राजेशाही होती. राजे एकमेकांशी लढाया करत. ते गडगंज संपत्ती आणि सैन्य बाळगून असत.. मोठमोठे महाल राजवाडे, किल्ले बांधीत. एकापेक्षा अनेक राण्या करीत. एकूणच जमेल तेवढी चैन करीत आणि त्यातून वेळ मिळाल्यास, कधी कधी, प्रजेच्या हिताची काही कामेही करीत. त्यांचे राज्य, वंशपरंपरेने त्यांच्याच घरात राही. राजघराण्याव्यतिरिक्त, इतर कुणाला, सामान्यजनांना राजवाड्याची पायरीही चढता येत नसे.

त्यामुळे परंपरेने आयत्या साम्राज्यामुळे राजे उन्मत्त होऊन, जनतेची सेवा करण्याऐवजी, प्रजेचे शोषणच करीत. ते म्हणतील तो न्याय आणि ते ठरवीत तीच नीती असे. अन्याय, अत्याचाराविरुद्ध ब्र ही काढायची कुणाची हिंमत नसे. पिळवणुकीने पिचून गेलेली जनता, सारा छळ, निमूटपणे करीत असे. मनात असले-नसले तरी, महाराजांचा जयजयकार करीत. एखादा छत्रपती शिवाजी राजा सोडला तर, बहुतेक राजेमहाराजे जनतेची जमेल तेवढी छळवणूक करण्यातच समाधान मानीत किंवा तोच त्यांचा जन्म सिद्ध हक्क समजीत. अशा जुलमी राजवटींचा अत्याचार शतकानुशतके भोगल्यानंतर, रयतेचे जगणे,'असेच', असते अशी मनोमन समजूत करून घेऊन, अन्याय, अत्याचाराने पिकलेली, खचलेली दीनदुबळी माणसं, दुसरं काहीच करू शकत नसलेली, असाहाय्य मनं, नशिबाला आणि देवाला दोष देत, रडतखडत, गपगुमान, जगत राहायची. पण जनता तरी कशी होती! अडाणी, अशिक्षित म्हणून अज्ञानी. शिक्षणाचा प्रसार झालेला नसल्याने, आपले हक्क, आपल्या जबाबदाऱ्या आणि आपली काही कर्तव्येही असतात, आहेत याची गंधवार्ताही माणसांना असण्याची सुतराम शक्यता नव्हती. अशा परिस्थितीत, समानता, समता आणि बंधुभाव हे शब्दही त्यांच्या कानावर पडण्याची तीळमात्रही शक्यता नव्हती. त्यामुळे जोपर्यंत राजेशाही, एकाधिकारशाही आहे तोपर्यंत, समाजात या आणि अशा सुधारणा संभवनीयच नव्हत्या. त्यातून समाजात पंथ, धर्म, जाती-पाती, गरीब-श्रीमंत, उच्च-नीच असे आणि इतके भेदभाव होते की, समानता, समता आणि बंधुभाव हे शब्द उच्चारायचीही कुणाची हिंमत होत नसे. पण युरोपात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर बदलांना हळूहळू सुरूवात झाली. यंत्रयुग अवतरले, दळणवळणाची साधनं वाढली, शिक्षणाच्या सोईसुविधा मिळू लागल्या. लिहायला-वाचायला शिकलेली माणसे विचार करायला लागली. हे असे का? असे प्रश्न विचारायला लागली. जागृत समाजात चळवळी सुरू झाल्या. दीनदुबळा समाज पेटून उठला. आपले हक्क मागू लागला. जनक्षोभाच्या वादळाने कित्येक राज्याच्या शाह्या नेस्तनाबूत झाल्या लोकशाहीचा विचार जनमानसात आकार घेऊ लागला.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश स्वतंत्र झाला. राज्यघटनेनुसार देशाचा कारभार लोकशाही प्रणालीने सुरू झाला. समानतेचे पहिले पाऊल म्हणून सर्व संस्थाने बरखास्त करण्यात आली. सर्वांगीण प्रगतीसाठी पंचवार्षिक विकास योजना आखण्यात आल्या. सामाजिक समतेसाठी, मागासवर्गीयांना आरक्षणे देण्यात आली.' लोकांचे, लोकांसाठी, लोकांनी चालविलेल्या राज्याचा' गाडा सुरू झाला.

स्वातंत्र्य प्राप्तीसाठी लढलेल्या त्यागी पिढीने राज्यकारभार करताना देशात, जनहीत आणि सर्वांगीण विकासाच्या स्वप्न पाहिले आणि त्या स्वप्नपूर्तीसाठी प्रामाणिक प्रयत्न केले. त्या प्रयत्नांना यशही मिळू लागले. भारतीयांच्या सर्वांगीण उत्कर्षाच्या आशा पल्लवित झाल्या. ज्ञानेश्वर माऊलीने मागितलेले पसायदान, तुकाराम महाराजांनी देवाकडे मागितलेले दान, साने गुरुजींनी देवाकडे मागितलेला वर आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांनी पाहिलेली स्वप्ने सत्यात उतरतील, असे देशवासीयांना वाटायला लागले पण...! पारतंत्र्यात जन्मलेली आणि स्वातंत्र्यासाठी प्राणपणाने लढलेली त्यागी, जुनी पिढी काळाच्या पडद्याआड गेली. आणि नवी, स्वातंत्र्यात जन्मलेल्या, स्वार्थी, चंगळवादी पिढीने, लोकशाही (?) मार्गाने, राज्यशकटावर कब्जा केला आणि बघता बघता, लिंकनने लोकशाहीची केलेली व्याख्या बदलून, ती..,' पैशाचे, पैशासाठी, पैशाने चालविलेले राज्य' अशी करून टाकली. त्यामुळे आपल्या प्रिय भारत देशात, समानता, समता आणि बंधुभावाचे स्वप्न कधी पूर्ण होईल, ते मात्र विचारू नका..,!

**कारण..,**
**''आजवरी परकीयांनी लुटले**
**आज मुळावर घरचे उठले?''.**

❖❖❖

# स्वातंत्र्य का? कायदेशीर आणीबाणी?

■ सुबोध मोरे- मो. -९८१९९९६०२९

स्वातंत्र्याचे झाले काय? आमच्या पर्यंत आलं नाय? असा सवाल भटक्या विमुक्त समाजातील साहित्यिक लक्ष्मण गायकवाड यांनी स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात १९९७ साली एका लेखात विचारला होता. आज २४ वर्षानंतरही हा सवाल प्रासंगिक वाटतो आहे, ही देशाची शोकांतिका आहे.

भारतीय स्वातंत्र्य लढा जेव्हा लढला गेला तेव्हा त्यात देशातील सर्वसामान्य लोकांचा, विशेषत: तळागाळातील जात-वर्गातील लोकांचा मोठा सहभाग होता. केवळ गोरे ब्रिटिश सत्ताधारी जाऊन काळे भारतीय सत्तेवर यावेत एवढे मर्यादित स्वातंत्र्य चळवळीचे ध्येय नव्हते. तर ब्रिटिशांच्या सोबतच देशी धनिक, श्रीमंत वर्गाकडून होणारे शोषण, पिळवणूक नष्ट व्हावी, नवा शोषणमुक्त समाज निर्माण व्हावा, सर्वसामान्य लोकांचा प्रत्यक्ष सत्तेतील सहभाग वाढावा, स्वातंत्र्याची फळे समाजातील तळागाळातील शोषित कष्टकरी वर्गालाही चाखता यावीत, ही अपेक्षा तत्कालीन स्वातंत्र्य लढ्यातील नेतृत्वाने पाहिली होती. स्वातंत्र्य लढ्यातील नेते, साने गुरुजी आपल्या गाण्यात म्हणत असत

**'आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान...** कामगारांच्या राज्यासाठी, शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लाऊ पणाला प्राण'. असेच कष्टकऱ्यांचे राज्य आणण्याचे, समाजसत्तावाद स्थापन करण्याचे स्वप्न शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव ते सुभाषचंद्र बोसांपर्यंतच्या स्वातंत्र्य लढ्यातील अनेक नेत्यांनी पाहिले होते.

परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काही वर्षांमध्ये सत्तेमधील सर्वसामान्य जनतेची बाजू मांडणाऱ्यांचे वर्चस्व कमी होत गेले व सत्तेतील धनिक वर्गाचे वर्चस्व वाढत गेले. पुढच्या काळात धनिक-श्रीमंतवर्गाच्या हिताचीच धोरणे आखली गेली. स्वातंत्र्याचा फायदा व त्याची फळे जी समाजातील तळागाळापर्यंत पोहोचायला हवी होती, ती न पोहोचता, त्याचा फायदा देशातील धनिक, जमीनदार वर्गाला अधिक झाला. त्यांचीच संपत्ती अधिकाधिक वाढल्याचे पाहायला मिळते. त्याचा परिणाम म्हणून सर्वसामान्य जनतेमध्ये, विशेषत: कष्टकरी वर्गात असंतोष अधिक वाढत गेला. प्रादेशिक विषमता, भाषावाद आदी प्रश्न, आर्थिक प्रश्नांसोबतच पुढे आले. तत्कालीन काँग्रेसची प्रतिमा जनमानसात बदनाम होऊ लागली. १९६७ ला देशातील जवळपास दहा राज्यांत काँग्रेसविरोधी आघाडी पक्षांची सरकारे स्थापन झाली.

एकिकडे आर्थिक विषमता, राजकीय अस्थैर्य वाढत असतानाच दुसरीकडे देशातील धर्मांध-जातीयवादी शक्तीही डोके वर काढू लागल्या होत्या. सामाजिक अन्याय - अत्याचाराच्या घटनाही वाढू लागल्या. तमिळनाडूच्या किलवेणमणीत १९६९ साली जातीयवादी जमीनदाराने ४४ दलितांना जाळून मारले, ज्यात बहुसंख्य स्त्रिया व मुले होती. महाराष्ट्रातही दलित महिलांवरील अत्याचाराच्या घटना १९७० च्या दशकात वाढत होत्या. विदर्भातील अकोल्यातील धाकली गावात जातीयवाद्यांनी गवई बंधूंचे क्रूरपणे डोळे काढले. तेव्हा या अन्यायाविरोधात महाराष्ट्रातील दलित तरुण साहित्यिकांनी 'दलित पँथर' नावाचा लढाऊ झंझावात उभा केला व अन्याय करणाऱ्या आणि सत्ताधाऱ्या विरोधात 'हल्ला बोल'चा नारा दिला. त्यांनी फुले-आंबेडकरी विचारांची मशाल आपल्या कवितेतून, साहित्यातून प्रज्वलित केली. दलित पँथर व दलित साहित्याचे पडसाद महाराष्ट्राच्याच साहित्य-संस्कृती विश्वात नव्हे, तर देशभरातील सांस्कृतिक-सामाजिक चळवळीत उमटले. याच कालखंडात बंगालमधील तरुणांमध्ये जहाल नक्षलवादी चळवळीचाही उदय झाला, बिहार व अन्यत्र जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीतही तरुण संघटित होऊ लागले होते.

एकोणीसशे सत्तरच्या दशकात देशभर राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्नांवर असंतोष धुमसत होता. महागाई, बेरोजगारी, स्त्रियांवरील अन्याय-अत्याचार वाढत होते. शेतमजूर, शेतकरी ,कामगार आपल्या न्याय्य मागण्यांसाठी सरकार- मालकांच्या विरोधात संघर्ष करीत होते. १९७४ साली प्रथमच भारतातील सर्व रेल्वे कामगार संपावर गेले होत आणि हा सार्वत्रिक असंतोष दडपण्यासाठी तत्कालीन काँग्रेस सरकारने १९७५ साली आणीबाणी लादली. लढाऊ राजकीय नेते, कामगार नेते कार्यकर्ते अशा हजारो लोकांना तुरुंगात डांबले. प्रसारमाध्यमांची मुस्कटदाबी केली. परंतु, नंतर १९७७ साली सरकारला आणीबाणी उठवणे भाग पडले.

एकोणीसशे सत्त्याहत्तर सालानंतर देशातील राजकारणाला कलाटणी मिळाली. केंद्रीय स्तरावर पहिल्यांदा एका पक्षाचे वर्चस्व कमी होऊन, जनता पार्टीच्या रूपाने आघाडी सरकारच्या प्रयोगाला सुरूवात झाली. देशातील भांडवली- आर्थिक प्रश्न तीव्र होऊ लागल्यावर त्यावरून लक्ष विचलित करण्यासाठी धार्मिक-प्रादेशिक अस्मितेचे प्रश्न गोंजारण्यास सत्ताधाऱ्यांनी हातभार लावला. एकीकडे खलिस्तान, आसाममध्ये बंगाली विरोध आणि संघ परिवाराने राम

मंदिराच्या प्रश्नावर धार्मिक तणाव वाढवून दंगली घडविण्यात पुढाकार घेतला. राम मंदिराच्या प्रश्नावर रथयात्रा काढून १९८९ साली केंद्रातील व्ही. पी. सिंगांचे आघाडी सरकार पाडले.

त्यानंतर पुन्हा केंद्रात काँग्रेस सरकार आले आणि तत्कालीन अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी खा. उ. जा. हे नवे आर्थिक धोरण आणले. ज्याचा मोठा फटका सार्वजनिक उद्योगांना बसला. शेती व उद्योगधंद्यावरही त्याचा दुष्परिणाम पडायला सुरुवात झाली. याच काळानंतर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करण्यास प्रारंभ केला. शहरी कामगारही देशोधडीला लागला. मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली, कंत्राटी कामगार प्रथेची वाढ झाली. सरकारी नोकरभरती बंद झाली. पुन्हा लोकांमध्ये असंतोष पसरू लागला. आणि याच काळात भाजपा संघ परिवाराने राम मंदिराच्या प्रश्नावर पुन्हा देश ढवळून काढण्यास सुरुवात केली आणि लोकांच्या धार्मिक भावना चेतवून ६ डिसेंबर १९९२ ला कायदा धाब्यावर बसवून जबरदस्तीने बाबरी मशीद पाडली. धर्मांध संघ परिवाराने केवळ बाबरी मशीद पाडली नाही तर, भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेचे मूल्यच उद्ध्वस्त केले. आणि ज्या काँग्रेस सरकारने ते मूल्य व बाबरी मशीद जपण्याची हमी घेतली होती, ते केंद्रातील नरसिंहराव सरकार बाबरी मशीद पाडली जात असताना कुठलीही कठोर कारवाई न करता फक्त हतबलतेने पाहात राहिले. या घटनेनंतरच अल्पसंख्याक समुदयात प्रथमच असुरक्षिततेची भावना वाढीस लागली.

बाबरी मशीद पाडल्यानंतरच देशातील संघ परिवार व त्यांचे छुपे समर्थक आक्रमक होऊन 'हिंदू राष्ट्राची' भाषा उघडपणे बोलू लागले. वाजपेयी आघाडी सरकारचे पंतप्रधान असताना काळात संविधानाच्या मूल्यांशी विसंगत अवैज्ञानिक, धार्मिक, अंधश्रद्धा वाढविणाऱ्या विषयांचे स्तोम शिक्षणात वाढू लागले. गोवंश बंदीच्या नावे अल्पसंख्याक समुदायात दहशतीचे वातावरण निर्माण करून त्यांची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न केला गेला. ओरिसात संघ परिवाराशी संबंधित बजरंग दलाच्या गुंडांनी फादर ग्रॅहम स्टेन्ससह बायका- मुलांना अमानुषपणे जिवंत जाळले. गुजरातमध्ये २००२ साली गोध्रा जळीत कांडाचे निमित्त करून मोदी सरकारच्या छुप्या संगनमताने जवळपास दीड- दोन महिने मुस्लिम समुदायाचे प्रचंड नरसंहार करण्यात आले. कायद्याचे रक्षकच भक्षक बनले होते. जाळपोळ व मालमत्तेची प्रचंड हानी करण्यात आली. काँग्रेसचे खासदार एहसान जाफरीसह अनेकांना संघ परिवाराच्या धर्मांधांनी घरात जिवंत जाळले. त्यानंतर सरकारच्या सांगण्यावरून पोलिसांनी मुस्लिम तरुणांचे खोटे 'एन्काउंटर' करण्यात आले. हर्ष मंदर,संजीव भट्ट सारखे जे संविधान, कायद्याची योग्य अंमलबजावणी करणारे सनदी-पोलीस अधिकारी होते, त्यांना गुजरात सरकारने त्रास दिला, खोट्या आरोपाखाली तुरुंगात डांबले, काहींना नोकरी सोडण्यास भाग पाडले आणि संघ परिवाराशी संबंधित संघटनांचे गुंड जे प्रत्यक्ष हिंसाचार, जाळपोळ करण्यात आघाडीवर होते ते मात्र सरकारच्या कृपेने मोकाट आहेत. गुजरातमधील नंगा नाचाचा तपशील, राणा अयुबच्या 'गुजरात फाइल्स' या पुस्तकात पुराव्यानिशी वाचायला मिळतो. रमेश पिंपळे, शाम रंजनकरच्या 'आक्रोश' 'चले चलो' व राकेश शर्माच्या डॉक्युमेंटरीमध्ये दृश्यांसह पाहायला मिळतो. गुजरातमध्ये त्याकाळात हिंसाचार व क्रौर्याची एवढी परिसीमा गाठली होती की, तत्कालीन पंतप्रधान वाजपेयींनी मोदींना जाहीरपणे सुनावले, 'राज धर्माचे पालन करा!'

गुजरातमधील नरसंहाराबद्दल मोदी - शहावर कुठलीही कारवाई करण्यास नंतर केंद्रात सत्तेत आलेले काँग्रेसचे सरकार हतबल ठरले. त्यामुळे हिंसक मोदींनाच 'हिंदुत्वाचे प्रतीक' म्हणून संघ परिवाराने पुढे आणण्यास प्रारंभ केला. तसेच संघ परिवाराने काँग्रेस सरकारमधील भ्रष्टाचाराचा मुद्दा उचलून, अण्णा हजारे, रामदेव बाबा सारख्यांना पुढे करून जनमानसात स्वत:चे पाय रोवण्याचा प्रयत्न केला. अण्णा आंदोलनाला सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देऊन मध्यमवर्गीयांची सहानुभूती मिळवली. हा बहुसंख्य मध्यमवर्ग छुप्या हिंदुत्ववाद्याचा पुरस्कार करणारा असल्याने त्यांनी सामान्य हिंदू माणसाची मनोभूमिका घडविण्यात, त्यांना भाजपाच्या, हिंदुत्ववादी राजकारणाचे समर्थक करण्यात मोठी कामगिरी बजावली. त्यांचा प्रचाराचा भाग व अंबानी- अदानीसारख्या भांडवलदार - धनिकांचा पाठिंबा यामुळेच २०१४ ला केंद्रात भाजपाची बहुमताने सत्ता आली.

केंद्रात भाजपा सत्तेवर आल्यावर मोदी सरकारने आपला हिंदुत्वाचा छुपा अजेंडा पुढे आणला. ज्या निषेध आंदोलनाचा, प्रसार माध्यमांचा सोशल मीडियाचा वापर करून मोदी सरकार सत्तेवर आले. आता तेच सरकार न्याय्य मागण्यांसाठी जी आंदोलने, लढे लोकशाही मार्गाने जनता, संघटना करीत आहेत, त्यांना दडपायचे काम हे सरकार करीत आहे. यांच्याच काळात जे. एन. यू. च्या विद्यार्थी संघटनेचा नेता कन्हैया कुमार व इतर विद्यार्थी नेत्यांना खोट्या आरोपाखाली तुरुंगात टाकले. रोहित वेमुलासारख्या हुशार दलित तरुणाची छळवणुकीमुळे संस्थात्मक हत्या झाली. गो मातेच्या नावे गुजरातपासून राजस्थान, मध्य प्रदेश, हरियाणा, उत्तर प्रदेश आदी. भाजपबहुल राज्यात दलित-अल्पसंख्याकांवर जीवघेणे हल्ले झाले. मॉब लिंचिंगच्या घटनात अनेक मुस्लिम तरुण मारले गेले. लव्ह-जिहादच्या नावे आंतरजातीय, आंतरधर्मीय लग्न करणाऱ्या जोडप्यांना व त्यांच्या कुटुंबीयांवरही धर्मांध गुंडांनी हल्ले केले. भारतीय संविधानाने प्रौढ नागरिकांना कुठल्याही जाती-धर्मातील लोकांशी विवाह करू शकतात. हे जे स्वातंत्र्य घटनेने दिले आहे त्या स्वातंत्र्यावर गुंडांनी हल्ले केले व पोलीस मात्र फक्त बघ्याचीच भूमिका घेत राहिले.

केंद्रातील मोदी सरकार एकीकडे कामगार-शेतकरीविरोधी कायदे करीत आहे. वेगवेगळ्या प्रकल्पाच्या नावाखाली, बुलेट ट्रेनच्या नावे, खनिज संपत्तीच्या उत्खननाचे परवाने विदेशी कॉर्पोरेट कंपन्यांना देऊन शेतकरी, आदिवासींचे जीवन उद्ध्वस्त करीत आहे. शैक्षणिक

क्षेत्र खासगी, बहुराष्ट्रीय कंपन्यांना आंदण दिले जात आहे. विद्यापीठ स्तरावर राजकीय, सामाजिक, प्रश्नांवर होणाऱ्या खुल्या चर्चा विश्वावर मर्यादा घालण्याचा, संशोधन क्षेत्रातील मुक्त वातावरणाचा संकोच करण्याचा प्रयत्न, केंद्र सरकार करीत आहे. कधी राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली, कधी खोट्या राष्ट्रवादाचा बागुलबुवा उभा करून सरकार बंधने आणण्याचा प्रयत्न करत आहे.

या केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांच्या,नागरिकता विधेयकाच्या विरोधात, अन्यायाच्या विरोधात 'शाहीन बाग'सारखी शांततापूर्ण पद्धतीने लोक आंदोलन करीत होते, अशा सरकार विरोधातील सर्व आंदोलकांना सरकार आता देशद्रोही ठरवून खोट्या गुन्ह्यात अडकवत आहे आणि या आंदोलकांना बदनाम करण्याचे काम सरकारचा दलाल मीडिया करीत आहे. ज्यांनी दिल्लीच्या दंगलीत हातात हत्यारे घेऊन उघड हिंसाचार, जाळपोळ केली त्या भाजपाच्या नेत्यांवर, गुंडांवर कुठलीही कारवाई पोलिसांनी केली नाही. दुसरीकडे शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थिनींना मात्र तुरुंगात टाकले होते. त्यांच्या अटकेबाबत पोलिसांकडे कुठलीही ठोस कारणे व पुरावा नसल्याने दिल्ली उच्च न्यायालयाने त्यांची सुटका करण्याचे आदेश दिल्ली पोलिसांना दिले.

महाराष्ट्रातील तथाकथित भीमा–कोरेगाव हिंसाचार प्रकरणातही तत्कालीन भाजपाच्या शासनाचे वर्तन तसेच होते. हे ज्या मनोहर भिडे व मिलिंद एकबोटेचा प्रत्यक्ष हिंसाचाराची चिथावणी देण्यात हात होता त्याला वाचविण्याचा प्रयत्न सरकारने केला आणि दुसरीकडे जे कुठेही हिंसाचारात नव्हते, ज्यांचा दुरान्वयानेही भीमा कोरेगाव प्रकरणाशी संबंध नव्हता, अशा कवी, लेखक, संपादक, विचारवंत, मानवाधिकार कार्यकर्ते, सामाजिक, धार्मिक कार्यकर्ते, समाजसेवकांना मात्र 'अर्बन नक्षल' ठरवून यू. ए. पी. ए. कायद्या सारखी गंभीर कलमे लावून सरकार तुरुंगात सडवीत आहे. त्यापैकी वयोवृध्द फादर स्टॅन स्वामी यांचा त्यांच्या आरोग्याबाबतच्या सरकारने केलेल्या अक्षम्य हेळसांडीमुळे संस्थात्मक मृत्यू झाला.


आज देशभर कामगार, शेतकरी, विस्थापित आदिवासी, अंगणवाडी महिला, रोजंदारीवर काम करणारा कष्टकरी, शेतमजूर, महिला, विद्यार्थी हक्कासाठी लढत आहे. पण सरकार गंभीर कायद्यांचा व दमनशक्तीचा वापर करून त्यांना दडपत आहे आणि ज्यांनी कायद्याचे पालन, अंमलबजावणी करायची ती पोलीस यंत्रणा, न्याय यंत्रणा सत्ताधाऱ्यांचे लांगूलचालन करून भयभीत अवस्थेत काम करीत आहे.

थोडक्यात भयभीत अवस्थेत आपण सारे जगत आहोत, कायदेशीर आणीबाणी आपण अनुभवत आहोत, स्वातंत्र्य हे कागदावरच आहे, आपण ना खरे बोलू शकत, ना लिहू शकत, ना आवडीचे मोकळेपणाने खाऊ शकत.

आज पुन्हा नव्याने खऱ्या स्वातंत्र्याची लढाई सुरू करण्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे!

❖❖❖

# सतीश काळसेकर यांची एक कविता



हे सगळे काही घडत आहे
हे असे प्रथमच घडले आहे
असे तर बिलकुल नाही.

हे अख्खे गाव गाडले गेले आहे
पाण्याखाली आणि चिखलाखाली
हे असे ढगफुटीचे, धरणफुटीचे प्रकरण
प्रथमच आपल्यासमोर आले आहे
असेही काही नाही.

हे जळलेले किंवा जाळलेले
बुडालेले किंवा बुडवलेले
गाथांचे असंख्य कागद
या भूमीने आत्ताआत्ताच
अनुभवले आहेत प्रथमच
असे तर ओळखीचे नाही

ही समोर उभी ठाकलेली अजस्र भिंत
ही कधीच ओलांडता येणार नाही
आणि तरीही भिंतीवर हातांचे ठसे
या खुणा काही पहिल्याच आहेत
असे तर काही नाही.

ही अशी कितीतरी माणसे
झुंडीने आणि गटागटाने
इकडून तिकडे आणि तिकडून इकडे
ये-जा आणि जा-ये करताहेत
हे काही धक्का बसावा
असे अघटित तर नाहीच नाही.

या बोटावरची थुंकी त्या बोटावर
झेलण्याची
अंगात मुरवलेली चतुर हातचलाखी
अशी माणसे आसपास वावरताना
पाहण्याची सवय आपल्यासाठी
तशी काही नवी नाही

या पृथ्वीची कूस ओल गमावून बसली आहे
इथे आता नव्याने काही उगवणारच नाही
वाळत चाललेल्या झाडांवर पुन्हा
नव्याने पालवी फुटणारच नाही
हा तर आपला अनुभव नाही
आजवरचा
असे तर बिलकुल नाही.

❖❖❖

# कविता

## महात्म्याकडून मानवाकडे

■ **अशोक गुप्ते**

दैवी किरणांच्या पायघड्यावरून प्रवास करत
कुठल्या नक्षत्रगर्भातून प्रवेश करतेस माझ्यात?

विसर्जित होतं
एकांताला आंदण दिलेलं मूकपण,
उघडू लागतात निर्मितीची कवाडं धडाधड!

एरवी आत्ममग्नतेच्या समईच्या अशक्त प्रकाशात
वैयक्तिक वेदनेला कालवत बसलेला मी
क्षणात वैश्विक होऊन जातो!....

माझा प्रवास--
पार्थिवाकडून पावित्र्याकडे
पंकापासून पंकजाकडे

अवघा देह निर्मितीचे गेह
होतो सूर्योदय ऐन मध्यरात्री
निथळत जातो त्याच्या तेजात,
भरून जातं भोवताल
अवेळी  फुललेल्या फुलांच्या दर्वळात

तुझ्याच मर्जीनं आलेली तू
अचानक जातेस निघून तशीच

पुन्हा माझी वाटचाल
महात्म्याकडून मामुली मानवाकडे..!

❖❖❖

## नात्यांची मुळं

■ **अशोक गुप्ते**

थोडंसं जरी जोरात वाहू लागलं वारं
तरी उन्मळून पडतात कित्येक झाडं

नुसताच गडगडाट करू लागले मेघ
तरी धोक्यातच येतं अस्तित्व फुलझाडांचं
थरथरतात ती दिवसरात्र
भुईसपाट होण्याच्या भीतीनं
शोभेचीच झाडं ती !

पण खोलवर रुजलेली असतात घट्ट
ज्यांची मुळं जमिनीत
ती ना थरथरत,
ना त्यांना भय उन्मळून पडण्याचं

पचवलेली असतात त्यांनी
असंख्य वादळं,
धुवादार पाऊस
आणि कडाक्याचं ऊन धीरोदात्तपणे
कमालीच्या सहनशीलतेनं

त्यांच्या फांद्यांवरही फुटलेली असतात
जमिनीत रुजण्यास उत्सुक असलेली असंख्य  मुळं

नातेसंबंधांचंही असतं असंच काहीसं..!


❖❖❖

# चित्रकला

■ **अर्थव आढाव**



■ **सानवी मंदार**



# ऑनलाइन शिक्षण पद्धती

## ■ दीपाली छाया सूर्यवंशी, ब्रांच :- दापोडी.

कोरोना काळामध्ये खूप काही वाईट गोष्टी घडल्या. काम धंदे बंद झाले. आमच्या घरामध्ये कोणी कमवणारा नाही. माझी आई घरकाम करत असताना तेही कोरोनामुळे बंद आहे. मी इयत्ता नववीत असताना ऑनलाइन पेपर चालू झाले त्यामध्ये पण खूप त्रास झाला.

त्रास असा की कधी मोबाइलचे नेटवर्क नसायचे तर कधी फोन रिचार्ज नसायचे त्याचे कारण असे की कधी दुकान बंद तर कधी पैसे नसायचे जे शिक्षण आम्हाला शाळेत मिळायचे ते ऑनलाइन क्लासमध्ये नव्हते मिळत. मी आठवीतून नववीमध्ये गेली त्या वेळी माझ्याकडे नववीचे पुस्तकसुद्धा नव्हते.

दुकाने बंद असल्यामुळे तरी पण माझ्या आईने शेजारच्या मुलीकडून पुस्तके विकत घेतली आणि मला दिले, पण शाळा बंद असल्यामुळे मला पुस्तकामधले अभ्यास काहीच कळत नव्हते. तरी पुण मी खूप प्रयत्न करून अभ्यास केला आणि ऑनलाईन पेपर दिले.

❐

## ■ प्रणय प्रकाश सरोदे, ब्रांच :- दापोडी.

आपल्या देशात एक काळ होता जेव्हा पालक मुलांना शिक्षण आणि चांगले संस्कार देण्यासाठी गुरुकुलमध्ये पाठवत असत. लहानपणापासून तर २४ वर्षांच्या वयापर्यंत विद्यार्थी तेथे शिक्षण घेत असे. त्याला पुस्तकी अभ्यासासोबत आध्यात्मिक संस्कार आणि शस्त्र चालवण्याचे प्रशिक्षणदेखील दिले जायचे. शिक्षणाच्या या प्रक्रियेला गुरुकुल पद्धती म्हटले जायचे.

नंतरच्या काळात आधुनिक प्रगती झाली. शिक्षणाच्या पद्धती बदलून इंग्रजी शाळा व महाविद्यालये देशात आली. आज देशातील सर्वच विद्यार्थी या शाळांमध्ये शिकत आहेत आणि गुरुकुल पद्धती पूर्णपणे नाहीशी झाली आहे.

परंतु मागील वर्षात झालेल्या इंटरनेट क्रांतीमुळे देशात डिजिटल शिक्षणाची सुरुवात झाली आहे. विद्यार्थी घरबसल्या ऑनलाईन शिक्षण प्राप्त करीत आहेत. यातच भर म्हणजे मागील वर्षी आलेली जागतिक महामारी Covid 19 होय. या एक वर्षात देशातील ऑनलाइन शिक्षण मोठ्या प्रमाणात वाढले.

आज शिक्षण हे आपल्या जीवनातील मूलभूत गरजांपैकी एक आहे. देशातील प्रत्येक नागरिकाला गुणवत्तायुक्त शिक्षण मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. कारण चांगल्या शिक्षणाच्या बळावरच योग्य करिअर निवडले जाऊ शकते. कोणत्याही देशाला विकसित करण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व भरपूर आहे.

आज जगभरात पसरलेली महामारी कोविड १९ मुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. लॉकडाऊन आणि कर्फ्यूमुळे घरातून बाहेर निघून शिक्षण प्राप्त करणे कठीण झाले आहे. अशा काळात देशातील विविध शाळांमधील शिक्षकांनी ऑनलाईन माध्यमाने विद्यार्थ्यांना शिकवणे सुरू केले. स्काईप, व्हॉटसॲप, झूम व्हिडीओ इत्यादी काही प्रसिद्ध मोबाईल ॲप आहेत ज्यांच्या मदतीने ऑनलाइन शिक्षण दिले जाते.

ऑनलाइन शिक्षणाचे अनेक फायदे आहेत. परंतु त्या सोबत दुष्परिणामदेखील आहेत. परंतु असे म्हणणे अयोग्य नाही की लॉकडाऊन च्या काळात याच शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणात मदत झाली. आज ऑनलाईन शिक्षण पद्धतीत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. या शिवाय दूर राहणाऱ्या तसेच वयस्क विद्यार्थी जे स्वयंशिस्त आहेत त्यांच्यासाठी ही शिक्षण पद्धत योग्य आहे. परंतु बाल व किशोरवयीन मुलांसाठी पारंपरिक पद्धतीने शाळेत जाऊन शिक्षण घेणे जास्त योग्य आहे. शिक्षणाच्या या दोन्ही पद्धती वापरून विद्यार्थी आपल्या ज्ञानात वृद्धी करून आयुष्यात यश मिळवू शकतो.

आज ऑनलाइन शिक्षण काळाची गरज आहे. परंतु ऑनलाईन शिक्षण पद्धतीमुळे ऑनलाइन शिक्षण आणि विद्यार्थी समस्या निर्माण झाल्या आहेत. म्हणून ऑनलाइन शिक्षण शाप की वरदान हे सांगणे कठीणच आहे.

❐

## ■ कविता विठ्ठल बसुके, ब्रांच :- कर्वेनगर.

कोविड-१९ या आजारामुळे आर्थिक मदत बंद झाली, घरभाडे थकले, काम बंद झाले, राशनची उपलब्धता नव्हती, खूप वित्तीय समस्यांना सामोरे जावे लागले. आमची परिस्थिती खूप बिकट झाली होती. घरात एकही गोष्ट नव्हती की तिला पाहून आनंद व्हावा. शिक्षणाचा खर्च वाढला. कर्ज घ्यावे लागले. कोणी कर्ज देईना. खूप परिस्थिती बिकट झाली होती.

❐

## ■ साक्षी फडके

२०२० मध्ये आलेल्या कोरोना साथीमुळे संपूर्ण जगभरात ऑनलाइन शिक्षण प्रसारित झाले.

मोबाइल, टॅब किंवा संगणक यांचा वापर करून नव्या पिढीतील विद्यार्थी घरबसल्या शिक्षण घेऊ लागले. हे शिक्षण म्हणजेच ऑनलाइन शिक्षण किंवा डिजिटल शिक्षण!

आज प्रत्येक विद्यार्थी मोबाइल आणि संगणकावर शिकू लागलेला आहे तेही ऑनलाइन क्लासच्या निमित्ताने. शिक्षक व्हिडीओ सॉफ्टवेअरद्वारे इंटरनेटचा वापर करून सर्व विद्यार्थ्यांशी जोडले जात आहेत. जसे शाळेत शिकवले जाते त्या पद्धतीतच ऑनलाईन देखील शिकवता येऊ शकते, याचा परिचय सर्वांना येऊ लागला आहे.

इयत्ता पहिली ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत हा स्तर उपलब्ध आहे. सर्व विषय घरबसल्या शिकता येऊ शकतात याचे ज्ञान झाल्याने सर्व पालक आणि विद्यार्थी देखील आता अशाच शिक्षणाची मागणी करू लागले आहेत. इंटरनेट वापरामुळे मुलांच्या शंका देखील लगेच सोडवल्या जाऊ लागल्या आहेत.

घरी बसून सर्वात उत्तम शिक्षण उपलब्ध होणे नावाजलेल्या शिक्षकांची ऑनलाइन तासिका, कोणत्याही विषयाची खोलवर माहिती, शिक्षणाव्यतिरिक्त इतरही कौशल्य विकसित करणे, असे एक ना अनेक फायदे ऑनलाइन शिक्षणाचे आहेत.

शिक्षणाच्या या पद्धतीचे तोटेदेखील भरपूर आहेत. वर्गात शिकवताना शिक्षक-विद्यार्थी नाते विकसित होत असते परंतु ऑनलाइन शिक्षण पद्धतीत शिक्षक हा दूर असल्याने विद्यार्थ्यांना शिक्षकांचा सहवास लाभू शकत नाही. शिक्षक आणि शिक्षणाबद्दल आदर निर्माण होऊ शकत नाही.

❐

## ■ सानिया अजित ढमाले, धायरी ब्रांच (दांडेकर पूल)

आपल्या देशात एक काळ होता जेव्हा पालक आपल्या मुलांना शिक्षण आणि चांगले संस्कार देण्यासाठी गुरूकुल मध्ये पाठवत असत. लहानपणापासून तर २४ वर्षांच्या वयापर्यंत विद्यार्थी तेथे शिक्षण घेत. त्याला पुस्तकी अभ्यासासोबत आध्यात्मिक संस्कार आणि शस्त्र चालविण्याचे प्रशिक्षणदेखील दिले जायचे. शिक्षणाच्या या पद्धतीला गुरूकुल पद्धती म्हटले जायचे.

नंतरच्या काळात आधुनिक पद्धती झाली. शिक्षणाच्या पद्धती बदलून इंग्रजी शाळा व महाविद्यालय देशात आली. आज देशातील सर्वच विद्यार्थी हे शाळांमध्ये शिकत आहेत. आणि गुरुकुल पद्धती नाहीशी झाली आहे.

परंतु मागील पाच वर्षांत झालेल्या इंटरनेट क्रांतीमुळे देशात डिजिटल शिक्षणाची सुरुवात झाली आहे. विद्यार्थी घरबसल्या ऑनलाइन शिक्षण प्राप्त करीत आहे. यातच भर म्हणजे मागील वर्षी आलेली जागतिक महामारी Covid 19 होय . या एक वर्षात देशातील ऑनलाइन शिक्षण आज जगभरात पसरलेली महामारी यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. लॉकडाऊन आणि कर्फ्यूमुळे घरातून बाहेर निघून शिक्षण प्राप्त करणे कठीण आहे अशा काळात देशातील विविध शाळांमध्ये शिक्षकांनी ऑनलाइन माध्यमाने विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू केले. स्काईप, व्हॉट्सॲप, झूम व्हिडीओ इत्यादी काही प्रसिद्ध मोबाइल ॲप आहेत. ज्यांच्या मदतीने ऑनलाइन शिक्षण दिले जाते यात विद्यार्थी आपापल्या घरी बेडरूम किंवा स्टडी टेबलवर बसून लॅपटॉप अथवा मोबाइलच्या साहाय्याने शिक्षण घेतात.

ऑनलाइन शिक्षणात वेळ आणि पैसा दोघांची बचत होते, परंतु असे म्हटले जाते की कोणत्याही नाण्याच्या दोन बाजू असतात. ऑनलाइन शिक्षणाचेदेखील तसेच आहे जसे एकीकडे याचे फायदे आहेत तसेच दुष्परिणामसुद्धा आहेत. आपल्या देशात अजूनही अनेक खेडेगावात इंटरनेट उपलब्ध नाही आहेत व ज्या लहान शहरांमध्ये इंटरनेट आहे तेथे त्याची गुणवत्ता चांगली नाहीये. ऑनलाइन शिक्षणासाठी योग्य नेटवर्क नसल्याने व्हिडीओ चालणे, आवाज ऐकू न येणे किंवा व्हिडीओ अडकणे यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते.

ऑनलाइन शिक्षणात विद्यार्थ्यांमध्ये शिस्तीची कमतरता निर्माण होते आणि शाळेत गेल्यावर शिक्षेच्या भयाने विद्यार्थी लक्ष देऊन शिक्षकांचे शिकवणे ऐकत असत, परंतु ऑनलाइन शिक्षणात विद्यार्थी काय करत आहे हे शिक्षकांना दिसत नाही . ज्यामुळे विद्यार्थी बेशिस्त होतात आणि कित्येकदा ऑनलाइन शिक्षणाला गांभीर्याने घेत नाहीत.

तर हा आहे ऑनलाइन शिक्षण या विषयांवरील मराठी निबंध. आज ऑनलाईन शिक्षण काळाची गरज आहे. परंतु Online Shikshan Paddhati मुळे Online Shikshan ani vidyarthi Samasya निर्माण झाल्या आहेत. म्हणून Online Shikshan Shap ki Vardan हे सांगणेच कठीण आहे.

❐

## ■ ओमकार हलगे

"बघता-बघता एक वर्ष झाले. संपूर्ण जगासाठी कर्दनकाळ ठरलेला कोविड-१९ (कोरोनाचा) संसर्ग अजूनही कमी झालेला नाही. शाळा-महाविद्यालयात शिकणारी मुले 'शाळा बंद असल्याने' अध्ययनापासून दूर जात आहेत. आजही स्थिती सामान्य होत नसल्याने ऑनलाईन शिक्षणाची आवश्यकता वाढतच आहे म्हणूनच या गंभीर स्थितीत ऑनलाइन शिक्षण ही काळाची गरज बनली आहे.

पारंपरिक शिक्षणाला तात्पुरता पर्याय म्हणून का असेना पण गुगल मीट, झूम, गुगल क्लासरूम वर शिकणे गरजेचे आहे. इंटरनेट, मोबाइल संगणक, लॅपटॉप या माध्यमांचा प्रभाव व वस्तुनिस्ट वापर करून आपल्याला आज दर्जेदार शिक्षण घेता येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या या युगात नव्या तंत्रज्ञानाचा वापर शिकण्यासाठी करून घेत आपल्याला शिकण्याची प्रक्रिया अव्याहतपणे पुढे सुरू ठेवायची आहे. आज अनेक आनंददायी, तसेच उपक्रमशील पद्धती ऑनलाईन विकसित झाल्या आहेत.

आभासी शिक्षणाला काही मर्यादा नक्कीच आहेत. पण काळाची गरज, कोरोनाची परिस्थिती विचारात घेता आपल्याला ऑनलाइन माध्यमातून शिक्षण घ्यावे लागले. उद्याचा नवा सूर्य आशेचा नवा किरण घेऊन येईल. स्थिती पूर्ववत होईल शाळेच्या त्या गजबजलेल्या जगात आपण पुन्हा रममाण होऊ... पण तोपर्यंत ऑनलाइन पद्धतीने शिकणे काळाची गरज आहे.

❐

## ■ गणेश नागनाथ मनलोर, सेंट जॉर्ज इंग्लिश स्कूल

संयुक्त राष्ट्र की कॉन्फ्रेन्स ऑन ट्रेड एंड डेव्हलपमेंट (UNCTAD) ने खबर दी है की कोरोना व्हायरस से प्रभावित दुनिया की १५ सबसे बडी अर्थव्यवस्थाओ मे से एक भारत.

आम जनता, गरीब, अमीर और सरकार सब पर एक ही मुसीबत आ. पडी. आम जनता की अर्थव्यवस्था की कितनी ज्यादा तकलीफे हुई फिर भी कितनी भी मुसीबत हो कभी भी पाठशाला, कॉलेज बंद नही हुये. पर सरकार ने इसका भी उपाय निकाला जिसका नाम ऑनलाइन क्लासेस है. जिससे बच्चे की पढाई पर असर ना पडे, पर क्या सारे बच्यो के पास मोबाईल है. सारे बच्चे ऑनलाईन पढाई कर पाते हे. ये बहोत बडी चुनौती है. भारत सरकार के लिए आम जनता पैसे, परिवार, तीन वक्त के खाने के लिए तडप रही है. भारत सरकार हर गरिब की भूख नही मिटा पाएगी या फिर इस मुसीबत की हटाएगी. भारत सरकार की नागरिक देशवासी और बच्चे के उज्वल भविष्य के बारे मे सोचे. सारे घर मे रहे सुरक्षित रहे.

❐

## ■ सिमरन शेख

आज ऑनलाइन शिक्षण सर्वत्र अधिक लोकप्रिय झाले आहे. ऑनलाइन शिक्षण हे असे माध्यम आहे ज्याद्वारे देशातील आणि जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातून शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांसह ऑनलाइन संपर्क साधू शकतात. शिक्षक स्काइप, झूम, इत्यादी द्वारे व्हिडिओ कॉल करतात आणि लॅपटॉप संगणकांवर शिक्षकांना पाहू शकतात. शिक्षक मुलांना शिकविण्यासाठी आपल्या संगणकावरील स्क्रीन शेअर करतात जेणेकरून मुलांना उत्तम प्रकारे समजू शकेल.

लॉकडाऊनच्या क्षणी जिथे सर्व शिक्षण केंद्रे बंद आहेत. ऑनलाइन शिक्षणामुळे आज तिथे मुले घरबसल्या शिकू शकत आहेत. आज जगभरातील मुले ऑनलाइन शिक्षणाद्वारे सहजपणे अभ्यास करण्यास सक्षम आहेत. ऑनलाइन शिक्षण मिळविण्यासाठी चांगल्या आणि जलद इंटरनेट कनेक्टिव्हिटीची आवश्यकता असते. आजच्या या कोरोनाच्या परिस्थितीत मुले शाळ व महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेऊ शकत नाहीत परंतु ऑनलाइन शिक्षणामुळे मार्ग सोपा झाला आहे. आज आपण संगणक, मोबाइल आणि इंटरनेटच्या माध्यमातून घरी बसल्या बसल्या प्राप्त करतो यालाच ऑनलाइन शिक्षण म्हणतात.

❐

## ■ रूक्साना अख्तर

लॉकडाऊनमध्ये शाळा, कॉलेज बंद, कामधंदा बंद होते. लॉकडाऊनमध्ये काम बंद असल्यासमुळे लोकांकडे पैसे नव्हते. खूप लोकांचे कामात नुकसान झाले आहे.

❐

## ■ रिया दत्तात्रय धोंडगे

सध्याच्या परिस्थितीचा विचार करता 'शाळा बंद असल्या तरी शिक्षण सुरू राहिले पाहिजे.' राज्य शासनाच्या या धोरणानुसारच आज आपली ऑनलाइन एज्युकेशन पद्धतीने शिक्षण प्रक्रिया सुरू तर आहे, मात्र याबाबत शिक्षक, विद्यार्थी आणि पालक प्रचंड संभ्रमात आहेत. त्यामुळे खरोखरच ऑनलाइन शिक्षण पद्धतीला पर्याय ठरू शकते का? कोरोना विषाणूने आपल्या जीवनपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. आपल्या आयुष्यात असलेले आपल्याला हवे किंवा नको असलेले खूप मोठे बदल होत आहेत. वर्क फ्रॉम होम संस्कृती, स्वच्छतेचे नियम, सार्वजनिक ठिकाणी वावरतानाचे नियम हे सर्व आपल्या अंगवळणी पडत चालले आहेत. माणसाची जीवनशैली बदलली. प्रत्येकातच वैचारिक, व्यावहारिक, शैक्षणिक, मानसिक सगळ्याच स्वरूपाचे बदल झालेत. त्यापैकीच एक महत्त्वाचा बदल म्हणजे ऑनलाइन शिक्षण! शिक्षणाचा उद्देश चहूबाजूंनी मिळणारे ज्ञान आत्मसात करणे व त्यातून आपले उत्तम व्यक्तिमत्त्व घडवणे हा आहे. यासाठी तंत्रज्ञानाचा जेवढा वापर होऊ शकतो तेवढा अन्य कशाचाही होऊ शकत नाही, ऑनलाइन शिक्षणामुळे विकासाचे पुढचे पाऊल टाकले जाऊन विद्यार्थी व शिक्षकांसाठी ज्ञानाचे भांडार उघडले गेले आहे. झुम, गुगल, मीट, क्लास रूम आणि काही जण व्हॉट्सॲपच्या माध्यमातून ऑफलाइन पद्धतीने शिक्षण शिकवण्याची ही प्रक्रिया राबवत आहेत. नवीन काहीतरी शिकायला मिळणार म्हणून एक जिज्ञासा, कुतूहल आणि नावीन्यपूर्ण, तंत्रज्ञानयुक्त पद्धत सुरुवातीला खूप छान व परिस्थितीनुरूप सोयीस्कर देखील मानण्यात आली विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक विकासाबरोबर शारीरिक व मानसिक विकासदेखील खूप महत्त्वाचा आहे.

❐

## ■ खुशबू गुलामहुसेन शाह, ब्रांच :- तुर्भे

कोविड १९ चा कोणताही धोका न पत्करता विद्यार्थी व शिक्षक ऑनलाइन संवाद साधू लागले. शिक्षक नवीन नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून आधुनिक काळातील टेक्नोसॅव्ही शिक्षण करत आहेत. शहरात मिळणारे दर्जेदार शिक्षकांचे उत्तम शिक्षण ग्रामीण भागातील मुलांना पण मिळू लागले. मुले ऑनलाइन अभ्यास करतो आहे की नाही यावर पालक लक्ष ठेवू लागले. मोबाइलवर गेम खेळणे, टीव्ही पाहणे याऐवजी मुले ऑनलाइन अध्ययनात व्यस्त झाली. पूर्वी सहा तास शाळा, त्यात जाण्या-येण्यासाठी लागणारा आणि शाळेची तयारी करण्यासाठी लागणारा वेळ, शिवाय अतिरिक्त शिकवणी वर्ग यामध्ये जाणारा वेळ वाचण्यास मदत झाली. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात त्याविषयी गोडी निर्माण होऊ लागली आहे. हे सर्व असले तरी याच्या नकारात्मक बाजूचादेखील विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. एक शिक्षक जोपर्यंत प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना समोर बघून शिकवत नाही तोपर्यंत या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सजीवता निर्माण होत नाही. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अध्यापन करत असताना, त्यांच्याशी साधला जाणारा भावनिक संवाददेखील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचा एक भाग असतो हे दुर्लक्षित करून चालणार नाही. शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये प्रत्यक्ष आंतरक्रिया होणार नाही. तोपर्यंत अभ्यासातील समस्या, अडचणी सोडवता येणे शक्य नाही.

❐

## ■ रूबिना बेन्द्रे

आपल्या देशात एक काळ होता जेव्हा पालक आपल्या मुलांना शिक्षण आणि चांगले संस्कार देण्यासाठी गुरुकुलमध्ये पाठवत असत. लहानपणापासून तर २४ वर्षांच्या वयापर्यंत विद्यार्थी तेथे शिक्षण घेत असे. त्याला पुस्तकी अभ्यासासोबत आध्यात्मिक संस्कार आणि शस्त्र चालवण्याचे प्रशिक्षणदेखील दिले जायचे. शिक्षणाच्या या प्रक्रियेला गुरुकुल पद्धती म्हटले जायचे.

नंतरच्या काळात आधुनिक प्रगती झाली. शिक्षणाच्या पद्धती बदलून इंग्रजी शाळा व महाविद्यालये देशात आली. आज देशातील सर्वच विद्यार्थी या शाळांमध्ये शिकत आहेत आणि गुरुकुल पद्धती पूर्णपणे नाहीशी झाली आहे.

आज शिक्षण हे आपल्या जीवनातील मूलभूत गरजांपैकी एक आहे. देशातील प्रत्येक नागरिकाला गुणवत्तायुक्त शिक्षण मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार आहे. कारण चांगल्या शिक्षणाच्या बळावरच योग्य करिअर निवडले जाऊ शकते. कोणत्याही देशाला विकसित करण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व भरपूर आहे.

❐

## ■ किरण संगीता राठोड

सध्या जगात कोरोना महामारी थैमान घालत आहे. त्यामुळे सरकारने लॉकडाऊन केल्यामुळे सर्वच कामकाज ठप्प झाले असून फक्त काही अत्यावश्यक सेवाच पुरविल्या जात आहेत. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाचा एक नवीन प्रश्न उभा राहिला आहे. त्यामध्ये काही परीक्षा रद्द केल्या व काही परीक्षा ऑनलाइन घेण्यात आल्या. कारण कोरोना महामारीमध्ये सामाजिक अंतर ठेवणे हे सुरक्षेचे मानले आहे.

ऑनलाइन शिक्षणामुळे तसे भरपूर फायदे होत आहेत. जसे की मुलांना सकाळीच उठून तयार करणे, त्यांची टिफिन बनवणे आणि त्यांना शाळेत वेळेवर सोडणे ही कामे टाळली असून पालकांना भरपूर वेळ मिळत आहे, तसेच विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणामुळे कॉम्प्युटर, लॅपटॉप, स्मार्टफोन, इंटरनेट आणि त्यांना झूम, गुगल मीट, इ. ॲप्लिकेशन्स हाताळण्याचे ज्ञान आले असून त्याचा वापर ते आपल्या दैनंदिन जीवनातदेखील करू शकतात.

ज्याप्रमाणे एका नाण्याला दोन बाजू असतात त्याप्रमाणे ऑनलाइन शिक्षणाचेसुद्धा फायद्याबरोबर तोटे आहेतच. तासन्तास कॉम्प्युटर स्क्रीन समोर बसून मुलांचे डोळ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. बसून-बसून मुलांचे खेळ-व्यायाम बंद झाले तसेच शारीरिक हालचाली कमी झाल्यामुळे मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पालक आणि मुले जास्त वेळ सोबत असल्यामुळे त्यांच्यात वाद निर्माण होत आहेत.

❒

## ■ प्रणय रवींद्र काळे, ब्रांच :- मुंबई, देवनार

कोरोना विषाणूने आपल्या जीवनात खूप बदल घडवून आणले आहेत. आपल्याला हवे किंवा नको असलेले खूप मोठे बदल आपल्या आयुष्यात होत आहेत. वर्क फ्रॉम होम, संस्कृती, स्वच्छतेचे माणसामुळे जीवनशैली बदलली आहे. प्रत्येकातच वैचारिक, व्यावहारिक, शैक्षणिक, मानसिक सगळ्याच स्वरूपाचे बदल झाले आहेत. त्यापैकी ऑनलाइन शिक्षण. ऑनलाइन शिक्षणामुळे विकासाचे पुढचे पाऊल टाकले जाऊन विद्यार्थी व शिक्षकांसाठी ज्ञानाचे भांडार उघडले गेले आहे. झूम, गुगल, मीट, क्लासरूम आणि व्हॉट्सॲपच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने शिकविण्याची ही प्रक्रिया राबवली जात आहे.

❒

## ■ प्रवीण रवींद्र काळे

कोरोना विषाणूने आपल्या जीवनात खूप बदल घडवून आणले आहेत. आपल्याला हवे किंवा नको असलेले खूप मोठे बदल आपल्या आयुष्यात होत आहे. वर्क फ्रॉम होम, संस्कृती, स्वच्छतेचे, माणसाची जीवनशैली बदलली आहे. प्रत्येकातच वैचारिक, व्यावहारिक, शैक्षणिक, मानसिक सगळ्याच स्वरूपाचे बदल झाले आहेत त्यापैकी ऑनलाइन शिक्षण ऑनलाइन शिक्षणामुळे विकासाचे पुढचे पाऊल टाकले जाऊन विद्यार्थी व शिक्षकांसाठी ज्ञानाचे भांडार उघडले गेले आहे. झूम, गुगल, मिट, क्लासरूम आणि व्हॉट्सॲपच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने शिकविण्याची ही प्रक्रिया राबवली जात आहे. ❒

## ■ रुबीना बेंद्रे

सध्याच्या परिस्थितीचा विचार करता शाळा बंद असल्या तरी शिक्षण सुरू राहिले पाहिजे. राज्य शासनाच्या या धोरणानुसारच आज आपण ऑनलाइन एज्युकेशन पद्धतीने शिक्षण प्रक्रिया सुरू केली आहे, मात्र याबाबत शिक्षक, विद्यार्थी आणि पालक प्रचंड संभ्रमात आहेत. त्यामुळे खरोखरच ऑनलाइन शिक्षण पद्धती ही पारंपरिक शिक्षण पद्धतीला पर्याय ठरू शकते का? यावर विचार करून चर्चा करणे खूपच आवश्यक आहे.

कोरोना विषाणूने आपल्या जीवनपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. आपल्याला हवे किंवा नको असलेले खूप मोठे बदल आपल्या आयुष्यात होत आहेत. वर्क फ्रॉम होम संस्कृती, स्वच्छतेचे नियम, सार्वजनिक ठिकाणी वावरतानाचे नियम हे सर्व आपल्या अंगवळणी पडत आहेत. शिक्षकाने तंत्रस्नेही बनले पाहिजे ही काळाची गरज आहे.

सकारात्मकता :

- कोविड-१९चा कोणताही धोका न पत्करता विद्यार्थी व शिक्षक ऑनलाइन संवाद साधू लागले.
- शिक्षक नवीन-नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून आधुनिक काळातील टेक्नोसॅव्ही शिक्षक बनत आहेत
- शहरात मिळणारे दर्जेदार शिक्षकांचे उत्तम शिक्षण ग्रामीण भागातील मुलांना पण मिळू लागले.

- मुलगा ऑनलाइन अभ्यास करतो आहे की नाही यावर पालक लक्ष ठेवू लागले.

पूर्वी ३० ते ३५ मिनिटांच्या तासात शिक्षक शैक्षणिक साधनांचा उपयोग करून व काही उदाहरणे देऊन अध्यापन करीत असत, व्हिडीओमुळे शिक्षक काटेकोरपणे केवळ विषयावरच बोलतात. त्यामुळे रटाळपणा वाढला.

विद्यार्थी अधिक काळ ऑनलाइन राहिल्यामुळे पालकांची नजर चुकवून अध्यापनाव्यातिरिक्त इतर आक्षेपार्ह विंडोज उघडली जाण्याची शक्यता वाढली आहे.

❒

## ■ Kasur Kivade

**<u>Online Teaching Duing Lockdown</u>**

'Online teaching is very much necessary in today's 'Corona' Time. The students are now being taught through this online mode only. The teachers are very much trying to motivate the student and join online classes during this lockdown period, Teachers & student Interaction is not possible like before students are also missing their friends and classmates very much.

Firstly, the teachers are making Whatsapp groups of students. Then they are sending link to join online classes on apps. Eg. Zoom app. Google meet etc. The teacher then share their screen with students of various topics. It can be audio as well as video. The teachers are really giving time which is appreciable. They were hying to clarify the doubts of student online. To make every students Indulge in Online Classes is really a work of Parents.

As the duration of the online classes in increasing, it has become a hectic schedule for both teacher and Students. Due to this the side effects of headache and are problems is prevalent.

Still the teachers we putting their tremendous efforts and working hard to guide us.

❒

## ■ Muskan Khan

During Corona Virus Period School has started online Studies on Zoom or other apps. So on. We have Started our online classes we miss our Practical Session in our School life. First time in life we have done Something new because of this Pandemic year of Covid -19. We have experinced lot of new Things like all exams have been online. Specialy our open house meeting was also held Online. This was a new thing to study. We actually enjoyed online but missed our School days.

❒

## ■ Shruti Sarika Kamble - Turbhe

Education is an important part of peoples life; it will either make them or break them in the future depending on the courses they choose. Online Course are the learning aids that can be use while taking the course. Certain Programs can be made such as flash cards & games which can increase the learning experience of the student. These learning can be done on the students time & does not requires the teacher to be there.

Rural areas where students have to travel a long distance to get to class can save time & money by doing online classes.

The traditional face-to-face method of learning provides a better learning environment, Considering the back that students can interact with the instructor & their peers, where as in web-based education students have to earn themselves.

❒

## ■ Ashish Santosh Rajak - Indiranagar, Turbhe

Online education is an amenable instructional delivery process that includes any learning that lakes place via the internet. Online learning enables educators to communicate with students who may not be capable of enrolling in a traditional classroom course and assists students who need to work on their own schedule and at their own speed.

Advantage :- Every discipline is registering a surge in the volume of distance learning and importing of online degrees, with remarkable pace. Schools and institution are also growing in number. Students pursuing degrees through online methods must be scrupulous for ensuring their coursework is completed through a valued and credentialed University.

Disadvantage : - For many students, One of the biggest challenges of online learning is the struggle with focus of the screen for al ong periods of time. With online learning there is also a greater chance for students to be easily distracted by Social media or other websites. Therefore, it is imperative for the teachers to keep their online classes crisp, engaging, and interactive to help students stay focused on the lesson.

❐

## ■ Shaikh Gulbern - Mankurd

In online classes the study are not going too well because the network is not there everyday, teachers. Voice is breaking etc. We can't understand maths the exams are also happening on Mobile phone. We can't feel that we are giving exams, we feel that all are doing some text messages to someone. And also mobile phones are very harmful for eyes. Online classes are going 3 to 4 hours. Many children are not interested on online classes and playing games during the period is going on So I think that use should have to avoid online studies.

❐

# कोरोना काळातील अडचणी

## ■ शिरीन खान

कोरोनामुळे अडचणी अशा आल्या जसे की एक भयंकर तुफान. पहिली मोठी गोष्ट आमचे कामधंदे सुटले. पाच महिन्यांपासून आम्ही घरीच बसलो आहोत. घरच्या खर्चासाठी आम्ही भाजीचे धंदे लावले, पण परत लॉकडाऊन पडला. आम्हाला कोरोनामुळे आणि काम सुटल्यामुळे आमचे कर्ज व हप्ते भरायला खूप अडचणी आल्या. मुलांचे शिक्षण व खर्च वाढत होते.

❐

## ■ पल्लवी बारशिंगे

नमस्कार ताई माझे नाव पल्लवी योगेश बारशिंगे. मी सध्या माहेरी राहते. गेल्या एक वर्षापासून त्याचे कारण असे की, गेल्या एक वर्षापासून जो कोरोना हा आजार आला आहे त्या काळामध्ये खूप साऱ्या अडचणी आल्या व त्यामुळे माझ्या पतींना त्यांचा जीव गमवावा लागला. आम्ही माझी मुले व मी पोरके झालो. १९ मे २०२० रोजी माझ्या पतींना ताप आला पण अडचण अशी होती की आमचे फॅमिली डॉक्टर त्यांचा दवाखाना त्यांनी ह्या आजारामुळे बंद ठेवला होता. ही पहिली अडचण मग माझे पती कुर्ल्यातील एका छोट्या दवाखान्यात गेले पण कोरोनाच्या भीतीने डॉक्टर जवळून तपासत नव्हते की इंजेक्शन देत नव्हते. घरी येऊन औषधे घेतली. पण तात्पुरते बरे वाटले त्यांना आणि दोन दिवसांनी पुन्हा ताप येऊ लागला. फक्त ताप त्या व्यतिरिक्त त्यांना काही त्रास नव्हता. पुन्हा त्याच डॉक्टरकडे गेले असता त्या डॉक्टरांना टाइफाइड, सीबीसी तपासण्यास सांगितले पण त्या वेळेस अडचण अशी होती की रक्त चेक करण्याच्या पॅथोलॉजी बऱ्यापैकी बंद होत्या. एव्हढ्या तापात एव्हढा अंगात ताप असताना माझे पती एकटेच पॅथोलॉजी शोधत होते, कारण अडचण अशी होती त्या काळात की कोणी कोणाशी बोलत नव्हते की कोणी कोणाकडे येत-जात नव्हते.

एका ठिकाणी पॅथोलॉजीमध्ये त्याचे रक्त तपासून रिपोर्ट मिळाले त्यामध्ये त्यांच्या पांढऱ्या पेशी कमी झाल्या होत्या. रिपोर्ट घेऊन त्याच डॉक्टरकडे माझे पती गेले. पण डॉक्टरने सलायन लावण्यास मनाइ केली. डॉक्टर म्हणाले तुझा कोरोनाचा तपास झाला नाहीये तर मी तुला उपचार नाही देऊ शकत नाही. तू दुसऱ्या दवाखान्यात जा त्या वेळेस माझे पती कुर्ल्यापासून चेंबूरपर्यंत सगळे दवाखाने फिरले पण कोणी त्यांना भरती करून घेतले नाही. शेवटी हताश होऊन सरकारी दवाखान्यात भरती झाले. डॉक्टरांनी पहिला रिपोर्ट केला, कोरोनाचा पण तो रिपोर्ट त्यांचा निगेटिव्ह आला पण दोन-तीन दिवस दवाखान्यात रुग्णांच्या सहवासात राहून एकत्र शौचालय वापरून त्यांना कोरोनाची लागण झाली.

त्या काळात खूप साऱ्या अडचणी आल्या मला व माझ्या मुलांना त्यांना भेटताही आले नाही की फोनवर बोलताही आले नाही. अशा ह्या अडचणीमुळे माझे पती कोरोनाचे बळी झाले व दवाखान्यात २२ दिवस राहून आमचा व जगाचा त्यांनी निरोप घेतला. आम्हाला त्यांचे शेवटचे तोंडही बघता आले नाही. मला दोन मुले आहेत. एक आठ वर्षांचा आणि एक चार वर्षांचा आजही दोघे वडिलांची वाट बघतात. छोटा रोज विचारतो माझे पप्पा कुठे आहेत. कधी येणार आहेत.

अशा या अडचणींमुळे माझ्या पतींना जीव गमवावा लागला. आठवण आली तरी जीव कासावीस होतो त्या अडचणींची !!

❐

## ■ चित्रा बाबांजी गलांडे - भांडुप

**कोरोना काळात आपल्याला झालेला त्रास !**

कोरोना हे पृथ्वीवरती आलेले भयंकर मोठे संकट आहे. ज्याने आपले जगणेच अवघड करून टाकले आहे आणि महागाईने तर गगन गाठले आहे. शेतकऱ्यांचे तर हाल चालले आहेत. कामगार, परराज्यातील मजूर आपल्या गावी परत जाण्यासाठी तरसले आहेत त्यांना खायचे काय नि प्यायचं काय? असा भला मोठा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे.

त्यात ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणाचे तर वांदेच झालेत आणि कोरोना काळात जी आपली अवस्था ती सगळ्यांचीच झाली आहे. म्हणून कोणाकडे मदतसुद्धा मागू शकत नाही. आमचे कामसुद्धा सुटले. खायचे खूप वांदे झाले.

ह्या काळात आपण कोणाकडे जात नव्हतो आणि आपल्याकडे कोणी येत नव्हते. त्यामुळे लोकांमधली माणुसकी कळली. देव न करो अशी वेळ परत कोणावर न येऊ.

❐

## ■ साहिल सलिम सय्यद

**कोरोना काळातील माझा अनुभव**

कोरोना काळातील अनुभव सांगायचे झाले तर त्यांची फार मोठी यादीच तयार होईल. कोरोना काय म्हणे जे एक-दोन अनुभव नव्हे तर अनुभवांचं पूर्ण पुस्तकच आहे. या काळामध्ये मला आलेले अनुभव या ठिकाणी मी सांगण्याचा प्रयत्न करत आहे. हे सांगताना बऱ्याचदा माझे हृदय आणि मन भावनाविवश होऊन स्तब्ध झाल्यासारखे वाटत आहे तरी काही चुकले तर मोठ्या दिलाने माफ करा, कारण कोरोना काळामध्ये माफ करायला शिका हा सगळ्यात मोठा अनुभव मला आला. लॉकडाऊनच्या काळामध्ये शाळा बंद असल्यामुळे मजा मावळू लागली. मला शाळेची आठवण येऊ लागली आहे. शाळेतील माझे मित्र-मैत्रिणीबरोबर केलेली दंगामस्ती माझ्या डोळ्यासमोर दिसू लागली आणि आता शाळा कधी पुन्हा सुरू होणार याची मी वाट बघत आहे.

❐

## ■ सारिका कांबळे

२०२० साली महाराष्ट्रात कोरोना विषाणूचा उद्रेक झाला. त्या वर्षापासून महाराष्ट्रातील जनजीवनावर याचे फार मोठे परिणाम झाले. राज्यात लागू झालेल्या नियमांनुसार अत्यावश्यक कामाशिवाय सर्वांनी घरी बसणे सक्तीचे करण्यात आले. यामुळे बरेच लोक बेरोजगार झाले. हातावर पोट असलेली लोकं जी परराराज्यातून महाराष्ट्रात आलेली होती त्यांचे जगणे तर मुश्कीलच झाले. परंतु आपल्या गावी जाण्यासाठीसुद्धा त्यांच्याकडे पैसे नव्हते. अक्षरश: ती लोक त्यांच्या गावी पायी चालत गेले.

स्कूल बंद झाली. मुलांना ऑनलाइन शिक्षण घ्यावे लागले. मुलांना बाहेर खेळण्याचा विसर पडला. अगोदर मुलांना आईवडील मोबाईल

देत नव्हते. पण ऑनलाइन शिक्षणपद्धतीमुळे मुलांच्या हातात सतत मोबाइल दिसून येतो. यामुळे मुलांच्या वागणुकीतही फरक पडू लागले.

कोरोना व्हायरस हा वेगवेगळ्या लोकांवर त्याच्यातील रोगप्रतिकारशक्तीप्रमाणे वेगवेगळे परिणाम दाखवत होता. आधीपासून आजारी असणारे लोक आणि जे आधीच कमकुवत होते अशांनी तर जास्तच टेन्शन घेऊन आपले जीव दगावले. कोरोनामुळे सगळे जग एक प्रकारे थांबल्यासारखे वाटत आहे. कोरोनामुळे काही चांगल्या गोष्टीही घडल्या ॲक्सिडेंट, चोऱ्या, ट्रॅफिक पोल्यूएशन हे सर्व ९०% तरी कमी झाले. लोकांना चांगल्या सवयी लागल्या. तोंडावर मास्क लावणे, सतत हात धुणे.

❐

## ■ रोशनी पंडित भिडे

"चीनमधून आलेली ही स्वारी जगासाठी ठरली सगळ्यात मोठी महामारी. खबरदारी घेणे हीच आपली जबाबदारी"


विज्ञानाच्या या युगात मानवाला अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे. याच संकटात भर म्हणजे सध्याची असलेली महामारी,संकटात भर म्हणजे सध्याची असलेली महामारी होय. मी बोलतोय रूप घेतले आहे अमेरिकासारखा महासत्ता देशही कोरोनापुढे हतबल झाली आहे.

कोरोना हा विषाणूपासून तयार झालेला रोग आहे जो सगळीकडे कोविड १९ म्हणून ओळखला जातो. २०१९ मध्ये चीनच्या वूहान शहरात त्याची सुरुवात होऊन आजपर्यंत तो जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचला व जागतिक महामारीचे उच्चतात सर्दी, खोकला श्वास घेण्यात अडथळा यांचा समावेश आहे. प्रचंड थकवाही जाणवतो. लागण झाल्यापासून लक्षणे दिसण्याचा कालावधी दोन ते चौदा दिवसांमध्ये अगदी सौम्य असतो तर अगदी अल्प प्रमाणात घातक ठरू शकतो.

❐

## ■ तबस्सुम गुलामहुसेन शाह – तुर्भे

कोरोना विषाणूची लागण झालेले रुग्ण जगातील विविध देशांमध्येही आढळू लागल्याने चिंता वाढली आहे. त्यामुळेच कोरोना विषाणूचं जागतिक साथीमध्ये रूपांतर होण्याची भीती वाढली आहे. कोरोना व्हायरसने देशात हाहाकार माजवला असताना रोजच वाईट बातम्या कळत आहेत. भीतीदायक दृश्य दिसत आहेत. अनेक मन हेलावून टाकणाऱ्या घटना समोर येत आहेत. या सततच्या नकारात्मक वातावरणामुळे अनेकांना हताश वाटल्यासारखं होत आहे. कोरोनासारख्या साथी याआधीही या जगाने पाहिल्या आहेत. त्यामुळेच चीनवरून संपूर्ण जगभर हा रोग पसरायला काही महिन्यांचाच काळ लागला. हा रोग एवढा पसरला की जगाला टाळे लावून बंद करावे लागले. आजवरच्या ज्ञात इतिहासातील ही पहिलीच वेळ आहे. जर दळणवळणाचा हा वेग नसता, तर हा रोग एवढा पसरलाच नसता. म्हणूनच हा रोग रोखण्यासाठी पहिल्यांदा दळणवळण बंद करण्यात आले. माणसांनी एका विशिष्ट भागाच्या बाहेर पडू नये. संपूर्ण जगात माणसांना एका ठरावीक जागेत स्थानबद्ध करण्यात आले. आता हे भौतिक दळणवळण थंडावले, पण डिजिटल दळणवळण म्हणजे माहितीचा वेग प्रचंड वाढला. कोरोनाचा प्रसार होण्यापूर्वीही तो वाढलेलाच होता. पण कोरोनाकाळात तो त्याच्या शिखरावर पोहचला आहे. तो आणखीही वाढणार आहे. कोरोनानंतर भौतिक दळणवळण पुन्हा सुरू होईल. पण त्यासोबत माहितीचा वेगही वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होत जाईल. ❐



## कवि कॉ. सतीश काळसेकर यांना अन्नपूर्णा परिवारातर्फे विनम्र आदरांजली

प्रगतीशील लेखक चळवळीचे आधारस्तंभ कवि सतीश काळसेकर साठोत्तरी साहित्याचे उदगाते, अन्नपूर्णा परिवारचे मित्र ए. आय. बी. ई. ए. चे बँक ऑफ बरोडा मधील कार्यकर्ते हिमालयात भ्रमंती करणारे निसर्गप्रेमी असे कॉ. सतीश काळसेकर यांचे २४ जुलै रोजी पहाटे दु:खद निधन झाले.

**अन्नपूर्णा परिवारातर्फे विनम्र आदरांजली**

# ऑनलाईन शिक्षण अडथळयाची शर्यत

■ वृषाली मगदूम

एक वर्ष चार महिने कोरोना आपली झेलत असताना शिक्षणा क्षेत्रात प्रचंड गोंधळलेली अनिर्णायक विदारक परिस्थिती समोर येत आहे. ऑनलाईन शिक्षणाचे आव्हान सरकार, शालेय संस्था, पालक यांनी अतिशय गैरक्षमतेने हाताळले असून यातला शिक्षण घेणारा मुख्य विद्यार्थी हा घटक यात भरडला गेला आहे. ऑनलाईन शिक्षण परीक्षा, मूल्यमापन, पुढच्या वर्गात जाणे यापलीकडे कशावरच चर्चा होत नाही, यापलीकडे ही यामध्ये अनेक आव्हाने आहेत त्याचा विचारच होत नाही.

शिक्षण धोरण शिक्षण सर्वदूर पोहचणे, सर्व शिक्षण अभियान या गोष्टीच्या अंमल बजावणीत यंत्रणा पूर्वीपासूनच फार सक्षम होती असे म्हणता येणार नाही. आजही अनेक विद्यार्थी विशेषत: मुली शिक्षणापासून वंचित आहेत. १५ टक्के विद्यार्थी उच्च शिक्षण पूर्ण करू शकतात. मुळातच आपली शिक्षण व्यवस्था नाजूक कमजोर आहे. शिक्षणावर सरकार करत असलेला खर्च ही अत्यल्प आहे. या विषम परिस्थितीत महामारीचा आणखी प्रभाव पडला आहे. अजून भरच पडली आहे. कोरोना आपत्तीतल्या शिक्षण यंत्रणा अपयशी करण्यात जबाबदार नाही. माणूसही याला कारणीभूत आहे. कोरोना विषाणू ही नैसर्गिक आपत्ती शिक्षण धोरण राबवताना योग्य हाताळता आलेली नाही. दोन पातळीवर हे अपयश आहे खाजगी शाळातील मुले एसी रुममध्ये बसून झूमवर सकाळी आठ ते दोन पर्यंत ऑनलाईन वर्ग करत आहेत. त्यानंतरही साठ, सत्तर हजार वार्षिक फी भरून ऑनलाईन वर्ग संध्याकाळी करत आहेत. सरकारी शाळेतील मुलाकडे ऑनलाईन सुविधा नाही शिक्षकही सक्षम नाहीत विद्यार्थ्यांनी घरी बसून अभ्यास करावा असे आपण म्हणतो त्यावेळी आपल्या आजूबाजूचे अनेक जण अस्तित्वाची लढाई लढत आहेत कोरोनाने भूकेन मरत आहेत. यापेक्षाही मुलांचे शिक्षण पुरे कसे होईल हा प्रश्न लोकांना महत्त्वाचा वाटत आहे नवीन शिक्षा धोरणाचे आपण वारंवार सूतोवाच करतो या कोलमडलेल्या शिक्षण व्यवस्थेत ते सक्षम आहे का?कोरोना महामारीत शिक्षण व्यवस्था धोरण पूर्णपणे उखडले गेले आहे सव्वावर्ष शाळा महाविद्यालये बंद आहेत भारतात कुटुंबात ५ ते २४ वर्षातील मुले शिक्षण घेत आहेत. यातील ८ टक्के लोकांकडेच ऑनलाईन सुविधा आहे. दलित, बहुजन, समाजातील २.७ टक्के मुलांकडे ऑनलाईन सुविधा आहे. आपण ही वस्तुस्थिती डोळे झाक करत आहोत. खाजगी, सरकारी शाळेतील शिक्षकांना ऑनलाईन सुविधा हाताळायची सवय नाही आहे. ऑफलाईन वर्गात शिक्षक विद्यार्थ्यांशी संवाद करतात. प्रश्न उत्तरे या माध्यमातून शिक्षण होते भारतात ३६ टक्के कुटुंबे एका खोलीत राहतात. या एका खोलीत ऑनलाईन किती मुले व कशी शिकत आहेत. सुविधा किती आहे. घरात इतर कामे चालू आहेत. बेकार आईवडील घरात आहेत. या विषयी काहीच बोलले जात नाही. पन्नास टक्के मुलांचे माध्यान्न भोजन बंद आहे. शिक्षण निती व स्थिती उद्धध्वस्त झाली आहे. आमची प्राथमिक गरज काय आहे हे पाहणे आवश्यक आहे. शिक्षणाबद्दल ओरडा होताना किती कशी सुविधा आहे. यावर चर्चा होत नाही मुलाचे स्थलांतर झाले आहे. बरीचमुले ऑनलाईन सुविधा नसलेल्या गावातील राहात आहे. यांची संख्या सरकार व शाळानाही माहिती नाही आहे. पालकांच्याकडे शाळेची फी भरायला पैसे नाहीत. म्हणून ते मुलांना सरकारी शाळेत घालण्यासाठी प्रयत्न करत आहे. पण खाजगी शाळा Transfer Certificate देत नाही आहे. सीबीएससी शाळा फी साठी डेडलाईन देत आहेत. परीक्षच्या तारखा जाहीर करत आहेत. परीक्षा फी भरली तरच परीक्षेला बसता येईल, म्हणत आहेत. भारतात चाळीस टक्के कुटुंबांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. विशेषत: महिला यात भरडल्या गेल्या आहेत. केंद्र सरकार कोरोनाचे नियम ठरवते पण

शिक्षण विषयक नियम राज्य सरकारने ठरवायचे असे सांगते. सरकार सर्वांच्याकडे फी मागीतली जातेय. मागील वर्षी कोर्टाने फी होवू नये असा आदेश दिला तर यावर्षी फी घ्यावी असा आदेश दिला. शाळा मागील वर्षाची फी ही वसूल करत आहेत. महाराष्ट्रात धरसोडीची धोरण असल्याने मुले भरडली जात आहेत. शाळा सुरू करण्याची तारीख सरकार जाहीर करते तारीख जवळ आली की शाळा सुरू करणे रद्द करते. अनेकवेळा दहावीची परीक्षा तारीख जाहीर करण्यात आली व रद्द करण्यात आली शिक्षण होत नाही ही सार्वत्रिक भावना आहे. पण कोरोना पूर्वीही ते फार गुणवत्तापूर्ण होत होते अस्सं म्हणता येणार नाही. कोरोना काळातील शिक्षण हाताळताना आग लागल्यावर विहीरी खणण्याची वृत्ती अधोरेखीत होते. एका वर्गासाठी काटेकोर शिक्षण व इतरासाठी मिळेल तसे शिक्षण असा प्रकार पूर्वीपासून चालू आहे. दलित, आदिवासी, भटके विमुक्त कामगार, शेतमजूर यांच्या मुलांना काहीही कसदार नसलेले देण्याची प्रथा आहे. महामारीच्या काळात यात भरच पडली आहे. महाराष्ट्रातील जिल्हा परिषद शाळातील वीस टक्के मुलाकडे ऑनलाईन सुविधा आहे. सरकारकडून वास्तव निर्णय घेतले जात नाहीत. लाभार्थी विद्यार्थांना धान्य देण्याएवजी बँकेत त्यांच्या खात्यावर दिडशे रूपये जमा कराण्याचे सरकारने जाहीर केले पण ही योजना अपयशी ठरली कारण दिडशे करता एक हजार भरून खाती खोलणे, बँकांचे सहकार्य नसताना अनेक खेटे घालून खोलणे, दीडशेसाठी त्यापेक्षाही जास्त खर्च करून बँकेतून पैसे काढणे पालकांना शक्य नव्हते. अशीच एक योजना तीन वर्षापूर्वी अपयशी ठरली होती. गणवेषाचे पैसे खात्यावर जमा करणार असल्याचे सरकारने सांगितले होते. त्यामुळे चाळीस टक्के ही एकूण रकमेच्या खर्च झाले नाहीत. पण ही वस्तुस्थिती योजना अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांपर्यंत पोचत नाही. कोरोना नसेल त्या भागात शाळा सुरू करण्याचे धोरणही सरकारने आखले नाही. भंडारा, सिंधुदुर्ग, गडचिरोली, या भागात शाळा गरज नसताना बंद केल्या. शाळा कोणी चालू केली की फौजदारी गुन्हा दाखल होतो. धोका आहे म्हणत बाकी सगळे जीवन चालू आहे. उदरनिर्वाहाचा प्रश्न आहे. पण शिक्षणातील नुकसानीवर विचार होत नाही. त्यापेक्षा शिक्षण ही संकल्पना शिकणे व तुमची क्षमता याच्याशी जोडली आहे. गरज आहे ती सामाजिकरणाच्या प्रक्रियेची.

भारतात केरळ मधील शिक्षण धोरणात अनेक प्रयोग झाले. रेडिओ, दूरदर्शन, इंटरनेट सुविधा उपलब्ध केल्या. गावात ग्रामपंचायत प्रागंणात अंतर ठेवून मुलांना शिक्षण दिले. पंजाबनेही सरकारी शाळाता प्रवेशासाठी Transfer Certificate लगेच देणे बंधनकारक केले. महाराष्ट्र मात्र गांगरून गेला. विचारपूर्वक निर्णय घेतले नाहीत. १९६० नंतर महाराष्ट्रात अनेक शिक्षणात प्रयोग झाले बारावीपर्यंत मुलींना शिक्षण मोफत आहे. कोरोनाकाळात शिक्षणाचा विचार परीक्षा व परीक्षा केंद्री केल्याने प्रचंड गोंधळ झाला आहे. मुल्यमापन पद्धत सदोष असल्याने १०० टक्के निकाल लावला. परत आता सीईटीची गरजच नव्हती. पालकांच्या दबाावाला सरकार बळी पडले आहे. सीईटी मधून परत उच्चवर्गातील मुले गुणवत्तापूर्ण मोठ्या महाविद्यालयात प्रवेश मिळवणार आहेत. खरे तर या परिस्थितीत लॉटरी सिस्टिमचा सोपा मार्ग काढता आला असता.

कोरोना काळात ५० टक्के विद्यार्थी ड्रॉप आऊट झाले आहेत. शिकण्याची क्षमता असणारेही बाहेर पडले आहेत. आदीवासी, ग्रामीण, कष्टकरी, भूमिहीन आज शिक्षण व्यवस्थेत नाही आहेत. नागरिक तयार करणे हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. लाभार्थी म्हणून सरकार त्याला सहानुभूती दाखवत आहे. एक सक्षम माणूस बनवणं हे शिक्षणात झाले पाहिजे.

आज अपंग, मतीमंद घरी आहेत. आश्रमशाळा बंद आहेत. वसतीगृहात मुली नाहीत. हे सर्व गावी गेले. याचे शिक्षण कसे होणार यांना मोबाईल देवूनही उपयोग नाही. कारण त्यांच्याकडे इंटरनेटची सुविधा नाही. ऑनलाईनमध्ये गुगल क्लासरूम होत आहे या कंपन्यांची आर्थिक भरभराट होत आहेच. पण त्यांना डेटा मिळणार आहे. नवीन शिक्षण धोरणांना सर्व घटक एकत्र होवून सार्वत्रिक विचार केला आहे. (यातून मुस्लिम व भटके यांना वगळले आहे.) पण यामध्ये स्वतंत्रपणे कोणाचेचे काहीच होणार नाही आहे.

ऑनलाईन शिक्षणाचा शिक्षक व विद्यार्थी काय विचार करत आहेत. गुगल डेटामुळे शिक्षकाने काय शिकवावे हे त्यांचे स्वातंत्र्य नियमीत होईल. शिक्षणाचा आशय काय असावा. काय शिकवावे हा विचार स्वतंत्रपणे शिक्षक करू शकत नाही. शिक्षण धोरणात बुद्धीवादी, विचारवंत यांची भूमिका आता राहिली नाही आहे. शिक्षकांचा विचार समजून घेतला जात नाही. विद्यार्थ्यांच्यात विचारशक्ती, निर्णयक्षमता स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता तयार करणे हे शिक्षक व शिक्षणाचे उद्दीष्ट आहे. पण शिक्षकानेच ते स्वातंत्र्य गमावले आहे. अभ्यासक्रमांच्या बाबतीत लवचिकता नाही आहे.

कोरोना काळात शिक्षण ही अडथळ्याची शर्यत झालीआहे. वस्तीतील मुलांना संध्याकाळी वडील कामावरून आल्यानंतर मोबाईल मिळत आहे. आज ऑनलाईन शिक्षणामधून वंचित मुले वेगळी करून वेगळे काही करता येईल का? खाजगी शाळातील मुले तणावामध्ये शिकत आहेत. चिडचिडी झाली आहेत. मोकळा श्वास घेण्यासाठी घराबाहेर कधी पडायला मिळेल वाट बघत आहेत तर सरकारी शाळातील मुले पूर्णपणे रिकामी आहेत. शिक्षणाच्या प्रवाहातच नाही आहेत. यातून वाईट सवयी, व्यसन, शिक्षणाविषयी अनास्था अशा अनेक गोष्टीचा उदय होणार नाही.

त्यामुळे शिक्षण धोरण सर्वसमावेशक सर्वदूर कसे पोचेल यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे.

**परिवर्तनाचा वाटसरू संवाद मधील डॉ. विकास गुप्ता, प्रा. मधु प्रसाद व किशोर दरक यांच्या विचारांचाही समावेश या लेखात केला आहे.**

❖❖❖

# वर्कर्स फ्रॉम होम, युनाईट! यू हॅव नथिंग टु लूज बट युवर 'एलिनेशन'!!

■ पडघम - देशकारण - जयदेव डोळे
djaidev1957@gmail.com

कार्यकर्ता असणारा मित्र तुम्हाला कधी गोत्यात आणेल सांगता येत नाही. 'भाषण करायला या' असा त्याचा आदेश टाळणे दोन कारणांसाठी जड जाते. पहिले, आपण गेलो नाही तर त्याचे स्थान डळमळीत होते की काय, याची आपल्याला चिंता. दुसरे, आपण त्याच्या पाठीराख्यांना किंमत देत नाही, अशी त्याला चिंता. त्यामुळे आपल्याला जावेच लागते. तो कार्यकर्ता असल्याने त्याला वाचन, चिंतन, अभ्यास करायला वेळ पुरत नसतो. थोडेफार वाचन अन अभ्यास त्याला करावा लागतो, पण त्याला असे वाटत राहते की, आपण त्याच्यापेक्षा जास्त अभ्यासू, चिंतक आहोत. मग काय, आपला अहंकार अन त्याचा रोष यांतून मार्ग काढायचा म्हणजे मुकाट जावे व दिलेला विषय बोलून टाकावा.

काही दिवसांपूर्वी 'भारत संचार निगम लिमिटेड'चा आमचा कार्यकर्ता मित्र रंजन दाणीने एकाएकी 'परात्मभाव' अर्थात 'एलिनेशन' या विषयावर अभ्यासवर्गासारखे बोलावे, असा प्रस्ताव माझ्यापुढे मांडला. बापरे! मार्क्सवादापासून 'एलिनेट' झालेले जग मार्क्सवादाच्या त्या सिद्धान्ताविषयी कितपत रुची घेईल, प्रश्न पडला. आपणही सुमारे ३५-४० वर्षांपूर्वी या विषयाचा मागोवा घेतलेला. मग जगरहाटीत एवढे बुडून गेलो की, मागे वळून पाहताच आले नाही. पण करोना आला अन परात्मता, अलगता, वियोग अथवा तुटलेपण अवघ्या जगाला अनुभवावे लागले. ज्यांना फार काही संगणकीय काम करावे लागत नाही, त्यांचे जग अभंग होते. थोडेथोडे त्यांनी जग जोडून ठेवलेले होते, परंतु संगणकीय सेवेदार असणाऱ्यांना एरवीही आभासी जगजोडणी करावीच लागे. कोविडची साथ पसरल्यावर तर त्यांना इंटरनेटसारखे स्थलकालबंधनरहित राहायचे सक्तीचे झाले. नोकरीच ती, तिला कार्यालय कशाला नि टेबल-खुर्ची कशाला? संगणक उघडून, जोडून घेतला की झाले काम सुरू. उगाच बाकीचा फुकाचा सरंजाम का म्हणून लागावा? मालकांचे आयतेच फावले. इमारतीचे भाडे, पाण्याचे व विजेचे खर्च, वाहतूक, सुरक्षा, उपाहारगृह, प्रवास, भत्ते, देखभाल व दुरुस्ती, टेबल-खुर्च्या, स्वच्छताष्ठ सारे सारे वाचवले त्यांनी. वर पगारही घटवले. हे सर्व कमी केले, पण कामाचे तास बेबंद करून टाकले. एकेकाला दोन-दोन कामे सोपवली गेली.

त्याआधी 'वर्क फ्रॉम होम' ही कल्पना इतकी हुरळून टाकणारी रंगवली गेली की बस्स! घरीच काम. तेही आवडत्या लोकांसोबत. कसेही, कुठेही, कधीही बस अन काम कर. टाय घाला अन वेळेवर येऊन आपली उपस्थिती नोंदवा ही सक्ती नाही. घरचे जेवण तर अनेकांना असा 'वर्कर' व्हायला प्रेरणा देऊन बसले! दुसऱ्या शहरातला केवढा तरी खर्च वाचला. भाडी, प्रवास, जेवण, पेट्रोल, पार्ट्या, खरेदी अन सहली आदी वाचले. वेळ पाळा आणि रजांसाठी तोंड वेंगाडा, यांचा प्रश्नच उरला नाही.

काम करण्याच्या ठिकाणापासून खूप दूर आपल्या घरी आरामात काम करता येण्याचा अनुभव अनेकांना आरंभी सुखावून गेला. एकांत, एकटेपणा, शांतता आणि शिस्त, सामुदायिक कार्यपद्धतीपासून सुटका यांनी अनेक मने लोभावली.

कामे सुरू झाली. पाहता पाहता वर्ष उलटले. पण वर्षाचे कशाला, चौथ्या-पाचव्या महिन्यातच सारी कल्पनासृष्टी उन्मळून पडली. घरात असूनही नसल्यासारखे. घरातल्या घरात पाठ करून बसण्याची वेळ आली. ना गप्पा, ना सहवास, ना घरकामे, ना जबाबदाऱ्यांचे पालन. जी जागा कामासाठी निवडली ती जणू या वर्कर्सच्या कबजात जाऊन बसली. लहानांनी तिकडे फिरकायचे नाही आणि मोठ्यांनी मध्ये मध्ये लुडबुडायचे नाही. जेवायची परवानगी घेऊन कसेबसे पोटात ढकलल्यावर पुन्हा त्या डेस्कटॉप पुढ्यात वा लॅपटॉपसमोर बसावे लागते. बकासुराच्या गोष्टीचीच आठवण येऊ लागली. गाडाभर अन्न खाऊनही त्याचे पोट भरेचना. वर अख्खा माणूस खाऊन टाकायचीसुद्धा तयारी. एवढेसे ते काचेचे पडदे, पण ७० एमएम पडद्यावर पेन्सिलीने लिहायला बसवावे, तसे अगडबंब काम देऊन बसणारे. फोन करत राहा, बोलत-ऐकत राहा आणि या विंडोवरून त्या विंडोत जाऊन बसा. अगदी 'गोविंडो' होऊन गेला साऱ्यांचा! कधी रेंज बेपत्ता तर कधी कॉल ड्रॉप. ऑफिस असताना डोके वर उंचावून 'ए ब्रो' अशी हाक मारून काही विचारण्याची सवय. ती गेली ती गेलीच. त्यातला वेळ अन यातला वेळ याची जाणीव झाली. बाहेर लॉकडाऊन, आत लॉकअप.

पोरगा अन पोरगी घरी आल्याचा आनंद वीज गेल्यावर संगणकाची जशी हतबल अवस्था होते, तसा आईबापांचा झाला. इनव्हर्टर अथवा बॅकअप म्हणून मातृत्व-पितृत्व तरी किती वेळ तजेलदार ठेवावे? मुले घरात परतल्याची सारी टवटवी मावळली. दोस्तांची गजबज, मैत्रिणींची लगबग नि गप्पा, आरडाओरडा, गाणी-बजावणी तो सारा कल्लोळ निमाला म्हणजे निमालाच. सगळे जण पुन्हा एकटे एकटे.

काय म्हणायचे या अवस्थेला? तुटलेपण, दुरावा, अलिप्तता, अंतरणे, अलगता, अनोळख की परात्मता? कार्ल मार्क्सने १८४४ साली 'इकॉनॉमिक अँड फिलॉसॉफिक मॅन्युस्क्रिप्टस' या नावाचे एक चोपडे लिहून ठेवले होते. ते उजेडात आले १९३२ साली. त्यात 'एलिनेशन' अर्थात 'परात्मता' याचा सिद्धान्त त्याने मांडला आहे. भांडवली उत्पादन व्यवस्थेचा अभ्यास करताना त्याला असे आढळले की, कामगार जे उत्पादन करतो, ते त्याचे न होता दूर जाते. त्यावर त्याचा काही अधिकार राहत नाही. उलट ते उत्पादन श्रमिकावरच वर्चस्व गाजवू लागते. नुसते तेवढेच नाही, तर ते श्रमिकाला निसर्गापासून तोडते अन माणसांपासूनही. सरतेशेवटी उत्पादन अती झाले व बाजारात पडून राहिले, तरीही श्रमिकाला म्हणजे उत्पादकाला त्यापासून दूर गेल्याचा भाव येत राहतो. हा भाव म्हणजे 'परात्मभाव'.

आपले स्वत्व काढून नेणारे ते उत्पादन आणि ती उत्पादनप्रक्रिया आपल्याला निवळ अमानवी, शुष्क व यांत्रिक बनवते; एखादी क्रयमूल्य असलेली वस्तूच बनवते आणि जीत आपण आपले थोडेफार स्वत्व ओतले ती आपल्यावर अशी वेळ आणते या प्रक्रियेत कामगार त्या उत्पादनापासून परात्म होतो. परका होतो. **श्रम ही आनंदाची व नवनिर्मितीची अत्यंत नैसर्गिक कृती असते, ही जाणीव नष्ट होते. श्रम नेहमी समुदायातूनच आकार घेतात. श्रम म्हणजे सामूहिक कृती. पण या उत्पादन व्यवस्थेत ही मानवी अवस्थाच गायब केलेली.**

मार्क्सने त्याच्या तारुण्यात परात्मतेचा विचार केलेला. तो हेगेल या तत्त्वज्ञाने आधी केला तरी मार्क्स म्हणतो की, मी तो डोक्यावर उभा असलेला पायावर उभा केला. मालक, श्रमिक, भांडवल, खाजगी मालमत्ता, स्वातंत्र्य, सर्जनशीलता अशा काही बाबी मार्क्सने त्याच्या 'इकॉनॉमिक अँड फिलॉसॉफिक मॅन्युस्क्रिप्टस'मध्ये आणल्या. भांडवली उत्पादन व्यवस्था खाजगी मालकीच्या आधाराशिवाय उभी होत नाही, हे सांगून मार्क्स टोटल मॅन, ह्यूमॅनिझम अशा नव्या मुद्द्यांचाही विचार मांडतो. ही शोषण करणारी उत्पादनव्यवस्था नको आहे. तिच्या जागी समाजवादी उत्पादन्व्यवस्था आणायची आहे, असे त्याने १८४४ मध्येच सांगून ठेवले आहे. त्यानुसार १८४८मध्ये 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' प्रकाशित झाला. तत्त्वज्ञ, समाजशास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ की मानसशास्त्रज्ञ अशी विविधांगे मार्क्सच्या विचारविश्वात एकत्र येत. पण शेवटी आर्थिक विचारांनी सर्वांवर मात केली. त्यामुळे परात्मता मार्क्सला नंतरच्या आयुष्यात विस्तार करून मांडता आली नाही.

सोव्हिएत रशिया, पोलंड, हंगेरी, युगोस्लाव्हिया, अल्बानिया, रुमेनिया, ऑस्ट्रिया, पूर्व जर्मनी आदी देशांत समाजवादी अर्थव्यवस्था राजकीय सत्तेमुळे अवतरली. तिथे कामगारांना परात्मता जाणवत होती काय, असा वाद निर्माणही झाला. पण तोही फार वाढला नाही.

आता इलेक्ट्रॉनिक क्रांतीचे एक अपत्य म्हणून परात्मतेची चर्चा करायला हवी. जवळपास ४० वर्षांपासून हा विषय जगभर वर्ज्य झालेला होता. कारण उत्पादन तंत्र, उत्पादनाची साधने, उत्पादन पद्धती, उत्पादनामागील प्रेरणाशक्ती यांत झपाट्याने होणारे बदल. या बदलांत श्रमिकाचे स्थान गौण झाले. संगणक, यंत्रमानव, तंत्रप्रणाली विखरून केले जाणारे उत्पादन, अत्याधुनिक यंत्रे अशा अनेक घटकांचा प्रभाव या मागे होता. 'मॉडर्न टाइम्स'मध्ये चार्ली चॅप्लीनने ज्या 'असेंब्ली लाईन' उत्पादन पद्धतीची भेदक थट्टा केली, ती अद्यापही चालते. पण आता कामगारच कमी लागतात. डिजिटलायझेशन होताच उत्पादन पद्धती बदलली. पण माणूस वा श्रम लागतातच. म्हणून आज संगणकापुढ्यात बसलेला सुशिक्षित, उच्चशिक्षित तज्ज्ञ, अभियंता, संशोधक अथवा तंत्रज्ञ परात्मभावापासून बचावला असे नाही. श्रम, कल्पकता, स्वेच्छा आणि आनंद यांचा अतूट संबंध असतोच. स्वत:ची अवस्था यंत्रवत आणि वस्तुगत झाल्याची भावना १८४४च्या आसपासही होती आणि २०२१मध्येही आहे.

'वर्क फ्रॉम होम' ही संकल्पना वा योजना मालक वर्गासाठी फायदेशीर आहे. मात्र ती फार मोठे एलिनेशन करते, हे फार लवकर कळाले. सबब ती नसावी, अशी मागणी अनेक सर्वेक्षणे व चाचण्या यांमधून पुढे येत आहे. परस्परांपासून शिकता येण्याची प्रक्रिया थांबली. संवादामधून काम सोपे होत जाण्याची व्यवस्था खोळंबली. अनुभवी व हुशार सहकाऱ्यांकडून ऐनवेळी वा संकटकाळी येणाऱ्या सूचना आटल्या. खेळीमेळी आणि हलकेफुलके वातावरण संपले. मन मोकळे करता येणे थांबले. नवे विचार, मित्र, अनुभव यांचा पुरवठा घटला. **'घरात काम' की 'कामात घर'** हा पेच सुटेनासा झाला.

महिलांना तर व्यावसायिक व वैयक्तिक जीवन इतके त्रासदायक होऊन बसले की बस्स! मातृत्व, पालकत्व, जबाबदाऱ्या यांच्या चिंध्या होऊ लागल्या. महिलांचा स्वतंत्र परात्मभाव एक श्रमिक या नात्याने नसतो. पण त्यांची परात्मता अधिकच त्रासदायक ठरली. 'वर्क फ्रॉम होम'च्या काळात सांसारिक हिंसा, दुरावा, कटुता,

घटस्फोट इत्यादी समस्यांत भारतही सापडला. एकाकी, तुसडा, चिडका, किरकिरा आणि अनुत्साही असा श्रमिक वर्ग भांडवलशाही कसा सहन करील? आधीच भांडवलदारांनी कारस्थाने करून श्रमिकांच्या संघटना संपवून टाकलेल्या. त्यांचा विचारही न करण्याचे वातावरण निर्माण केले. अशा वेळी गाऱ्हाणे व दाद यांचा विचार कसा करणार? सरकार मालकांच्या बाजूचे, कायदेही तसेच. तक्रार करताच नोकरीवरून काढून टाकले जाणार. बरे, घरात राहून घरातल्यांसमोर भांडणे, वाद अथवा संघर्ष कसा अन किती करायचा?

बहुतेक घरांत 'वर्क फ्रॉम होम' गुणगुण चालू असल्याचा भास होतो, पण प्रत्यक्षात हे वर्कर्स फार अस्वस्थ, असंतुष्ट आणि असहाय आहेत. त्यांचे तुटलेपण या नव्या रोगराईने आणून ठेवले असले तरी कामाची पद्धती बदलल्यामुळे उजळ झालेली परात्मता फार जिव्हारी लागलेली आहे. भांडवलशाहीचे शोषण, नफेखोरी, श्रमविभागणी अशा कित्येक गोष्टी कोण्याही समाजवाद्याच्या वा साम्यवाद्याच्या भाषणांवाचून प्रत्येकाला समजलेल्या आहेत. मार्क्सही कोणी वाचलेला नाही. परात्मभाव ही काय चीज असते, याचीही त्यांना जाण नाही. मात्र 'अनुभव हाच खरा शिक्षक' हे शाळेत शिकलेले एक वाक्य त्या साऱ्यांना आज नवे ज्ञान देत आहे. ना संप करता येतो, ना धरणे देता येते, ना युनियन करता येते, ना सरकारकडे तक्रार! ही कोंडी आणि कामाचे बदलेलेले स्वरूप, यांमुळे त्यांचा लोकशाहीवरचा विश्वास उडू लागला आहे.

भांडवलशाही व लोकशाही यांचे विशेष सख्य नसते. भांडवलशाहीला नेहमीच नरेंद्र मोदींसारख एकाधिकारशाहीवादी नेता आवडतो. परंतु एकीकडे कोविडचा प्रकोप आणि दुसरीकडे 'वर्कर्स फ्रॉम होम' यांचा कोप भांडवलशाहीला परवडणारा नाही. त्यामुळे ७० टक्के मालक पुन्हा कारखाने, कार्यालये सुरू करून जुनीच पद्धत ठेवण्याच्या विचारात आहेत. शिवाय प्रचंड मोठा समुदाय घरात कोंडला गेल्याने त्याचे ग्राहकपण संपुष्टात आल्याचा तोटा भांडवलदारच सहन करत आहेत.

लोकशीहीची गरज भांडवलशाहीला असण्याचे कारण अभिव्यक्ती. नव्या कल्पना, योजना, उत्पादने, सेवा यांचा जन्म मोकळ्या वातावरणात होत असतो. मोदींचा काळ या भांडवलदारांसाठी अत्यंत भाकड. 'मेक इन इंडिया', 'आत्मनिर्भर भारत', 'स्मार्ट इंडिया' आदी सारे प्रकल्प हुकूमशाही राज्यव्यवस्थेने जन्माला घालून मारूनही टाकले. कोविडच्या काळात अनेकांना कल्पकता, एकी व सहयोग दाखवून वातावरण सुसह्य केले. हुकूमशाही विचारसरणीच्या संघाला व भाजपला तसे काही जमले नाही.

परात्मतेमधून सुटका होण्याचा मार्ग म्हणजे सर्जनशील श्रमाची हमी, स्वातंत्र्याची खात्री देणारी उत्पादनप्रणाली! म्हणून राजकीय अर्थव्यवस्था अशी हवी, जी श्रम व व्यक्ती यांचा मान राखणारी असेल. मात्र विद्यमान राज्यकर्ते असे होऊ देतील का? मुळीच नाही. त्यांनी म्हणजे भाजपने व त्याच्याआडून राज्य करणाऱ्या संघाने सत्तेच्या राजकारणाचे अत्यंत घातक मिश्रण पिऊ घातले आहे. धर्म, राष्ट्रवाद, भय आणि द्वेष या चार पायांवर आपली सत्ता प्राप्त केलेली आहे. मुसलमान, दलित, आदिवासी आणि स्त्रिया यांच्याविषयी खास चीड व नाराजी उत्पन्न करून उर्वरित नागरिकांना त्यांच्यापासून अलग केलेले आहे. म्हणजे 'एलिनेट' केलेले आहे. भयंकर अफवा, गैरसमज, असत्य यांची निर्मिती करून ती अलगतावादी बारूद बनवली आहे. सोशल मीडियावर ताबा मिळवणारा हा पक्ष व्यवस्थितरीत्या या चार घटकांना आणि त्या निमित्ताने काँग्रेस पक्षाला या समूहाजवळ येउ देईनासा झाला आहे.

आता गंमत अशी की, सोशल मीडियामुळे आपण कनेक्टेड, कमिटेड आणि कन्व्हिन्स्ड आहोत, असा भास झालेल्यांना उर्वरित समाजाने आपल्याला कटाप केले आहे, ते लक्षात येत नाही. अन्यथा बंगाली, तमिळी, मल्याळी मतदारांनी धर्म-राष्ट्र-सेवा-द्वेष यांचे रसायन फेकून दिल्याचे त्यांना समजले असते. ही अलगता व तुटलेपण, त्यात 'वर्क फ्रॉम होम'मुळे निर्माण झालेली विलगावस्था. यांचा फार गंभीर परिणाम राजकारणावर पडू लागला आहे. स्पष्टच सांगायचे झाले तर भारतीय नागरिकांत, श्रमिकांत फूट पाडण्याचे अघोरी व समाजद्रोही कृत्य सत्ताधारी पक्षाने केले आहे. शिवाय हा पक्ष भांडवलशाहीचा प्रखर पाठीराखा आहेच.

हा जो आपला वर्कर आहे, तो काही वर्षांपूर्वी मोदींच्या प्रेमात बुडून गेला होता. आज स्वत:ची अवस्था त्याला ओंगळवाणी वाटते आणि त्यासाठी तो मोदींची कार्यपद्धती जबाबदार धरतो. जी भांडवलशाही उत्पादनव्यवस्था सध्या अनिर्बंध बोकाळली, ती राज्यकर्त्यांच्या सहकार्यावाचून व मान्यतेशिवाय अमलात आलेलीच नाही, हे या 'होम वर्कर'ला पटले आहे. त्याला आता या पुढच्या संकटांसाठी ऐक्य करण्यावाचून उपाय नाही.

एकेकटा कुणी लढू शकत नसतो. एक भारतीय म्हणून एकमेकांपासून परके केले गेलेले असताना त्यात या कोविडकालीन परात्मतेची भर पडली. तसे पुन्हा होऊ नये यासाठी संघटन, एकी, युती, आघाडी यांची फार गरज आहे.

बघू या, काही बदल म्हणजे परात्मतेकडून आत्मीयतेकडे हे वर्कर्स वळतात का ते...

('अक्षरनामा' आणि साप्ताहिक युगांतर वरून साभार...)

# अन्नपूर्णा वार्तापत्र

■ **अंजली पाटील**

नमस्कार, माझ्या अन्नपूर्णा परिवार मधील कर्मचारी व सभासद बंधु भगिनींनो...

भाषण नाही करत नेहमीप्रमाणे, मार्च नंतर आपल्या परिवारामध्ये गेल्या तीन महिन्यात ज्या काही महत्त्वाच्या घडामोडी झाल्या, त्याचा लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न करते आहे.

गेल्या तीन महिन्यांपूर्वी म्हणजे एप्रिल मधे कोरोनाची दुसरी लाट आली व एप्रिल, मे महिन्यात लॉकडाऊनमुळे परत सगळे बदलले. थोडे थोडे सावरत होतो आपण सगळेच!

अन्नपूर्णाच्या सभासदांचे तर दुसऱ्या लाटेने परत सर्व होत्याचे नव्हते झाले.

अन्नपूर्णा कडून बचत घेऊन, स्पेशल लोन/टॉप अप लोन घेऊन सभासद आपला व्यवसाय, काही घरगुती गरजा पूर्ण करत होते, तर दुसऱ्या लाटेने, लॉकडाऊनमुळे परत सगळे अस्थिर होऊ लागले. काम धंदा बंद, तर घर कसे चालवायचे, कर्जाचे हफ्ते कसे भरायचे असा मोठा प्रश्न निर्माण झाला. सी. आर. ताईकडून सभासदांचे प्रश्न समजले. हफ्ता भरायचा नाही असे नक्कीच नाही पण व्यवसाय थोडा थोडा चालू आहे तर हफ्ता थोडा कमी, लहान रकमेचा भरता येईल का अशी विचारणा होत होती. आधीच कोरोना परिस्थिती मध्ये अन्नपूर्णा परिवारने सभासदांना कर्ज घेण्याचा आग्रह केला नाही. ज्यांना पाहिजे असतील त्यांनाच कर्ज दिले त्यामुळे कर्ज कमी होत आहेत.

रिकव्हरी सुद्धा पहिल्या लाटेत खूप कमी येत होती, ती थोडी सुधारू लागली होती, ती दुसऱ्या लाटेमुळे परत बिघडू लागली. चालू कर्जाचे हफ्ते, टॉप अप लोनचा हफ्ता, सभासद डिफॉल्टर होण्याचा मार्गाला लागू लागले. त्यामुळे अन्नपूर्णा आर्थिक धोक्यात जाऊ लागते की काय अशी शंका निर्माण झाली.

मेधाताई, उज्वलताई, आरतीताई यांच्या सोबत चर्चा केली, सगळे रिपोर्ट्स तपासले. काहीतरी उपाय काढणे भाग होते. आणि ह्यातूनच rescheduled लोन म्हणजेच 'कर्जाचे हफ्ते लहान करून देणे' हे उदयास आले. त्याचे नियम पुढील गोष्टींवर अवलंबून आहेत. हे कर्ज कोणत्या काळातील आहे, म्हणजे लॉकडाऊनच्या आधीचे की लॉकडाऊ काळातील आहे, सभासदाने moretorium मध्ये म्हणजे मार्च २० ते ऑगस्ट २० मध्ये हफ्ते भरले होते की नव्हते, moretorium नंतर हफ्ते मूळ हफ्त्याच्या रकमे नुसार भरले की कमी भरले इ. इ. ह्यावरून सभासदांना किती रकमेच्या हफ्ता परवडत आहे, ह्याचा अंदाज मेधा ताईंनी घेतला व त्यानुसार "rescheduled लोन" करण्याचा निर्णय दिला. उज्वला ताईंनी अन्नपूर्णाच्या सॉफ्टवेअर टीमच्या मदतीने हे करून घेतले. "rescheduled लोन" झाल्यावर ही काही सभासदांना मोठे हफ्ते भरता येणार असतील तरी त्यांना तसे करता येईल व व्याजात सूटही मिळेल असे केले. ह्या कर्जाना processing फी पुन्हा द्यावी लागणार नाही. सभासदांचे अकाऊंट स्वच्छ दिसणार आहे., डिफॉल्टर दिसणार नाही अशी सगळी सिस्टीम केली गेली. सर्व फील्ड स्टाफला ही संकल्पना मेधाताईंनी सामाजिक विषय द्वारे समजावून

दिली. त्यामुळे सभासद आणि अन्नपूर्णा दोन्ही कोविडच्या चक्रातून बाहेर पडू शकतील. थोडे जास्त कष्ट सर्वांनाच पडणार आहेत परंतु सभासदच आपले महत्त्वाचा घटक आहेत. त्याच्यासाठी उपयुक्त जे आहे ते मेधाताईंनी करवून घेतले. फील्ड मधेही सर्वांना सूचना आहेत, सभासद आधीच गांजलेले आहेत, प्रेमाने, गोड बोलूनच हफ्ता घ्यायचा आहे. हफ्ता वेळेत भरला तर त्यांना पुढील कर्ज सुकर पद्धतीने मिळून व्यवसाय सुरू ठेवण्यास कशी मदत होणार आहे हेच समजावून सांगणे गरजेचे आहे. त्यामुळे अन्नपूर्णाचे कर्ज वाटप व कर्ज वसूली दोन्ही परत सुधारू लागली आहेत.

ह्याच सोबत आपल्या इन्शुरन्स पॉलिसी मध्येही काही बदल केले आहेत. मागील संपूर्ण वर्षी कोरोनामुळे आजारपणं खूप वाढल, त्याचे दावे पण खूप आले. जवळ जवळ दुप्पट दावे ह्या वर्षात आले आहेत. त्यामुळे आरोग्य निधी, जीवन सुरक्षा निधी, कुटुंब सुरक्षा निधीचा फंड कमी पडू लागला. कर्ज कमी झाल्यामुळे नुतीकरण कमी झाले आणि त्यामुळे निधी मधे रक्कम कमी आली आणि HMF, LMF चे दावे ही जास्त आल्यामुळे निधी कमी पडू लागला. निधी पुरला पाहिजे आणि सर्व सभासदांना HMF, LMF,FMF ची मदत मिळाली पाहिजे ह्या दृष्टीने बदल केले गेले. आजाराच्या कॅटेगरी पैकी दोन च कॅटेगरी ना हफ्ते नियमित भरले का, ह्यानुसार झळ लागणार आहे. स्वत:च्या चुकीने किंवा गटाच्या चुकीमुळे नियमित हफ्ते भरले गेले नाहीत अश्या कॅटेगरीला, काही प्रमाणात झळ लागणार आहे. २.५%, ७% पासून ५०% पर्यंत अशी झळ लागणार आहे. ह्यामुळे निधीचे पैसे जपून वापरले जातील. व कोणालाही दावा नाकारावा लागणार नाही.

मेधाताईंनी सामाजिक विषयामध्ये हा विषय सविस्तर समजावून सांगितला आहे.

Asset loss म्हणजे मालमत्ता हानी ह्यासाठी अन्नपूर्णा परिवार सभासदांकडून वर्गणी न घेता मदत देत होती. हल्ली नैसर्गिक आपत्ती वाढल्या आहेत, त्यामुळे मालमत्ता हानीचे दावे ही वाढले आहेत. यासाठी सभासदांकडून एप्रिल २०२१ पासून थोडी वर्गणी घ्यायला सुरूवात केली आहे. मालमत्ता हानी साठी कर्ज सायकल नुसार, रकमेनुसार एक किंवा दोन हफ्ते माफ केले जातील. आणि काही रक्कम त्यांना मदत म्हणून दिली जाईल. हे बदल ह्या एप्रिल पासून आहेत.

स्टाफने नीट समजून उमजून घेवून ते सभासदांना सांगणे अपेक्षित आहे. सभासद नाराज न होता त्यांना ह्या कठीण काळात अन्नपूर्णाकडून आर्थिक मदत कशी मिळते आहे हे सांगणे स्टाफकडून अपेक्षित आहे.

यंदाच्या एप्रिलमध्ये सर्व फील्ड स्टाफला विशेषत: ब्रांच मॅनेजर ना एक नवीन गोष्ट हाताळायला मिळाली. TAB... ज्यामुळे त्यांची खूप कामे सोपी होणार आहेत. ॲपपूर्णा हे नवीन तंत्रज्ञान आपण विकसित करून घेत आहोत. ज्यामुळे LSO म्हणजे कर्ज देणारी ताई, आणि सभासद दोघांनांही सोपे जाणार आहे. ५ सभासदांचा गट तयार करण्यापासून ते कर्ज वितरण पर्यंतचे तंत्रज्ञान ॲपपूर्णा मधे पूर्ण करून झाले आहे. बहुधा एप्रिल २०२२ पासून तुम्ही ते वापरू शकाल असे नियोजन झाले आहे.

एस ई म्हणजे सेवा देणाऱ्या ताईसाठी सुद्धा क्लेम दाखल करण्यापासून ते क्लेम सेटल होईपर्यंत सर्व गोष्टी ह्या ॲप मध्ये विकसित केल्या जात आहेत. साधारणपणे सप्टेंबर २१ पासून वापरता येईल असे नियोजन सुरू आहे.

त्यामुळे वेळ वाचणार आहे. क्लेम ३ दिवसात सेटल होवू शकेल. कागदपत्रे तयार करण्यामध्ये वेळ जाणार नाही. ॲपपूर्णाच्या वापरामुळे 'कागद रहित कार्यालय' ह्या दिशेने अन्नपूर्णाचे पाऊल पडणार आहे. सह्याद्री कंपनी ॲपपूर्णा तंत्रज्ञान विकसित करत आहेत.

यावेळी HR मीटिंग ७ आणि ८ जुलैला झाली. त्यात स्टाफला देणाऱ्या फॅसिलिटी व स्टाफसाठी लागू नियम-नियमावली ह्यात स्टाफसाठी नवीन ERP सॉफ्टवेअर बनवले जात आहे. हेही काम सह्याद्री कंपनी करत आहे ह्याची माहिती स्टाफला दिली गेली.

सर्व स्टाफसाठी management ट्रेनिंग सध्या झूम ने घेतली जात आहेतच. स्वत:च्या कामाचे नियोजन कसे करावे, management कसे करावे ह्यावर श्री. प्रमोद देशमुख स्टाफला मार्गदर्शन करीत आहेत. नवीन जॉईन झालेल्या स्टाफ साठीही क्रॅश कोर्स घेतला जातो. स्टाफला नक्कीच त्याचा उपयोग होईल आणि अन्नपूर्णालाही.

ॲपपूर्णा प्रमाणेच साधारण सप्टेंबर पासून अन्नपूर्णा मधे ऑफिस कामकाज सुलभ व्हावे, यासाठी ERP Software वापरले जाणार आहे. तयारी चालू आहे. ज्यमुळे पगार, दररोजची हजेरी घेणे, भरणे वगैरे सहज सुलभ होणार आहे. सर्वच कामे, रिपोर्ट्स मिळणे सोपे जाईल. कामाचे नियोजन चांगले करता येईल. सर्वांना नक्कीच त्याचा खूप उपयोग होईल.

Covid काळात ऑफिस आणि पाळणाघरे आपण नियमित Fumigate करवून घेतली आहेतच. मास्क, Sanitizer, स्वच्छता बाळगणे, अंतर ठेवून काम करणे हे सर्व नियम आपण strictly पाळले आहेत. Vaccine घेणे साठीही सतत महानगर पालिकाचे संपर्कात राहून आपण अन्नपूर्णा पुणे आणि मुंबई दोन्ही कडे पहिला डोस सर्वांना दिला आहे. सर्वांची Covid test ही त्यावेळी केली

आहे. सर्व स्टाफची खूप काळजी घेतली आहे. कोणी आजारी असेल तर ताबडोतब टेस्ट करणे, डॉ. चा सल्ला घेणे, उपचार घेणे याबाबत वरिष्ट टीम असतेच पण मेधा ताई यावर जातीने लक्ष घालतात. ह्याचा खूप जणांना अनुभव नक्कीच आहे. ताई म्हणजे अन्नपूर्णा परिवाराच्या कुटुंब प्रमुख आहेत. चौफेर लक्ष असते त्यांचे. सभासद जसा अन्नपूर्णा चा पाया. तो डळमळता कामा नये. तसेच कर्मचारी, आरोग्य उत्तम कसे राहील, शारीरिक आणि मानसिक ही ह्याकडे डोळ्यात तेल घालून ताई लक्ष देतात. कोणीच हे नाकारणार नाही. फिल्ड वरचा कर्मचारी तर जास्त लक्ष ताईचे. उन्हात पावसात ती फिरते, तिचे आरोग्य आधी जपा. असे सांगणे असते त्यांचे.

यावर्षी अजून एक गोष्ट ताईंनी सर्वानुमते केली. उज्वलाताई आणि आरतीताई यांचे प्रमोशन करून ताईंनी अन्नपूर्णाचे पुढील नेतृत्त्व त्यांच्यावर सोपवले. उज्वलताईंना CEO आणि आरतीताईंना COO असे प्रमोशन देवून ताईंनी हेही दाखवून दिले की स्टाफने Capacity, कामातील निष्ठा आणि शिकण्याची जिद्द दाखवली तर अन्नपूर्णा परिवारात तुम्ही उच्च स्थानी पोहोचू शकता व अन्नपूर्णाच्या पुढील विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकता.

ह्या दोघी जणी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ताई आणि आम्हां सर्वांचा विश्वास नक्कीच पुरा करावा.

अन्नपूर्णा स्थापना दिन ११ जुलै १९९३. कोणीच तो विसरणार नाही. पूर्वी मेधाताई दरवर्षी ११ जुलै ला शेवंता बाई, जहिदाबी यांना भेटायला जात. घरी जात. वस्तीमध्ये जाऊन गळा भेट घेत. अन्नपूर्णा मंदिराचा पायाचा दगड ह्या पहिल्या कर्ज घेणाऱ्या सभासद आहेत. आज त्या सभासद नसल्या तरीही मेडिकल फॅसिलिटी, एफडीवरील व्याज हे पेन्शन सारखे मिळावे अशी सुविधा अन्नपूर्णा त्यांना देते. त्यांचे थोडेसे ऋण व्यक्त करून त्यांना ऑफिस ला बोलावतो. सुख दु:खाची गोष्टी बोलतो. हसतो मनसोक्त, शेवंता बाई प्रचंड दु:ख सोसून मस्त हसू शकतात, का नाही आपण त्यांच्या कडून हे गुण घ्यावेत. त्यांनाही मेधा ताईंना भेटून खूप बरे वाटते. साळेकर मावशी, ढोक बाई, सर्व जणी आवर्जून येतात. सर्वांना भेटतात, सर्वजणी मेधा ताईंकडून ऊजा घेतात व देतात, पुढील वाटचाली साठी.

अन्नपूर्णा परिवाराने आपली सामाजिक बांधिलकी कधीच सोडली नाही. अन्नपूर्णा परिवार स्वत: आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण झाला आहे. अन्नपूर्णा महिला को. क्रेडिट सोसायटीच्या वार्षिक नफ्यातून अन्नपूर्णा परिवारातील विद्यापूर्णा, वात्सल्यपूर्णा ह्या प्रकल्पांना आर्थिक मदत केली जातेच. त्याच बरोबर आपल्या प्रमाणेच प्रामाणिक पणाने समाजात काही काम करणाऱ्या, बदल घडवू इच्छिणाऱ्या सामाजिक संस्थांना आपण फूल नाही तर फुलाची पाकळी नेहमी देत असतो. यावर्षी ''सलाम पुणे'' मधे आपण देणार आहोत. मासिक वस्ती पातळीवर वितरीत होणार आहे. अन्नपूर्णा कडे असे सभासद खूप आहेत. ज्यांनी कष्टातून दिवस काढले पण अन्नपूर्णाचे मदतीने उंच भरारी घेतली. व्यवसाय वाढवला. मुलांना शिकवलं. सामाजिक उंची थोडीतरी गाठण्याचा त्यांचा प्रयत्न आपण 'यशोगाथा' मधून केला तर अनेकींना ह्या गोष्टी प्रेरणादायी ठरतील. असे हीरे हुडकून काढून त्यांना पैलू पाडून समाजासमोर आणणे आपले काम आहे. सभासद व स्टाफ ने नक्की सुंदर रीतीने ह्या गोष्टी मांडाव्यात अशी अपेक्षा आम्ही करतो आहोत.

सा-धन मायक्रो फायनान्स शिखर संस्थेच्या मेधाताई बोर्ड मेंबर आहेत हे सर्वांना माहीत आहेच. Microfinance institutions साठी चे नियम कसे सुकर असावेत ह्यासाठी साधन कडून सरकार व RBI कडे निवेदन दिले जातात. कोरोना काळात moretorium साठी ही निवेदन दिले होते आणि तो आपण मिळवला आहे.

ताई मागील २ वर्ष साधनच्या बोर्ड मेंबर होत्या. यावर्षी साधना ची Annual Genral Body Meeting १७, १८ जून ला झाली. आणि पुन्हा पुढील २ वर्ष म्हणजे २०२१ ते २०२३ ह्या दोन वर्षांसाठी ताई बोर्ड मेंबर म्हणून निवडून आल्या आहेत. अन्नपूर्णा साठी ही खूपच अभिमानास्पद गोष्ट आहे. मेधाताईंना ह्यासाठी वेळ मात्र मिळाला पाहिजे. जो आपण आपली कामे छान करून नक्कीच देवू शकू.

अन्नपूर्णाचा कामाचा सुवास दूरवर दरवळत असतो. यावर्षी रोटरी क्लब पुणे ह्यांची तर्फे मेधाताईंना सामाजिक कामासाठी पुरस्कार जाहीर झाला. जून मध्ये ताईंचा सत्कार केला गेला. त्या कार्यक्रमात ताईंनी अन्नपूर्णाचे कामकाज, कोरोनाचे कठीण काळात ही उभी असणारी अन्नपूर्णा, त्यांचे स्वत:चे अन्नपूर्णा स्थापन करण्या मागील उद्दिष्ट अश्या खूप गोष्टी भाषणात नमूद केल्या.

आपला हा अंक २१ ऑगस्ट रोजी, आपल्या संस्थापक दिनी (Founder's Day) दिवशी प्रकाशिथ होईल. पुस्तक प्रकाशन सुद्धा होणार आहेच. प्रत्यक्ष नाही तरी झूमने आपण नक्की भेटणार आहोत. सरावलो ना आपण झूम मीटिंगला.

तुम्ही संवाद वाचता ना ग, सगळे जण प्रतिक्रियाची खूप वाट पहात असतात.

माहीत आहे का ग अन्नपूर्णा नो, तुम्हाला.

चला तर लागा कामाला, मी सुद्धा वाट पहाते आहे.

❖❖❖







# भारतनगर चेंबूर येथे मुसळधार पावसाने उद्ध्वस्त केलेले सभासदाचे संसार - अन्नपूर्णातर्फे मदतकार्य



अन्नपूर्णा परिवारातर्फे श्री सुरेश धोपेश्वरकर यांनी ''संवाद त्रैमासिक'' न्यू एज प्रिंटींग प्रेस,
८५ सयानी रोड, प्रभादेवी ४०००२५ येथे छापून घेतले.